Osmania University Library

Call No M 923.1 V34K

Name Of Book वत्सराज उदयन

Name Of Authur कादद्रे

UNIVERSAL LIBRARY
OU_184426
UNIVERSAL LIBRARY

# वत्सराज उदयन

" लोके हारि च वत्सराजचरितम्। "

—रत्नावली.

: लेखक :

माधव केशव काटदरे

किंमत १ रुपया.

: प्रकाशक :

नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई ४.

प्रकाशक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशनसंस्था,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

CHECKED. 1957

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

Checked 1965

प्रथमावृत्ति आक्टोबर १९४१

Checked 1969

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई नं.

परलोकवासी

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर,

एम्. ए., पीएच्. डी.

यांच्या

**स्फूर्तिदायक स्मृतीस**

ॐ सह नाववतु ।
सह नौ भुनक्तु ।
सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु मा विद्विषावहै ॥
ॐ शांतिः शांतिः शांतिः

*    *    *    *    *

व्हावें वास्तव्य एकत्र, व्हावें एकत्र सेवन,
सामर्थ्यवंत दोघांनीं व्हावें एकत्र राहुन; १

अध्याय आमुचा आम्हां तेजस्वी उभयां करो,
विद्वेष एकमेकांचा आम्हांकडुनि ना घडो. २

सर्वत्र शांतता नांदो,
शांति राज्य करो सदा;
शांतिचें धर्मसाम्राज्य
वाढवो ज्ञानसंपदा. ३

# प्रस्तावना

खिस्तपूर्व सहाव्या शतकामध्यें बावेरूचें म्हणजे बाबिलोनचें असुरराज्य धुळीस मिळून असुर लोक नामशेष झाले आणि इराणांतले पारसीक लोक बलिष्ठ होऊन त्यांची सत्ता झपाट्यानें चौफेर वाढूं लागली. पारसीकसत्तेनें पूर्वेकडे सिंधुनद गांठला होता. सिंधुनद ओलांडून भारत–वर्षांत पाय पसरण्याच्या उद्योगामध्यें ही सत्ता असतांना ज्या पराक्रमी भारतपुत्रानें तिला थप्पड लगावून आल्या वाटेनें पुन्हा माघारी जावयाला लावलें तो पराक्रमी भारतपुत्र म्हटला म्हणजे वत्सराज उदयन होय. वत्सराज उदयन हा पौरव घराण्यांतला होता.

सोमवंशांतील पुरूरव्याचा पणतू ययाति, आणि वृषपर्वा नामक असुरराजाची कन्या शर्मिष्ठा, यांची कथा पुराणप्रसिद्ध आहे. ययातीला शर्मिष्ठेपासून तीन पुत्र झाले. त्यांतील तिसऱ्या पुत्राचें नांव 'पूरु' असें होतें. शर्मिष्ठेचा हा धाकटा पुत्र पूरुच ययाति राजाच्या मागून सिंहासनारूढ झाला आणि इतर राजांना आपल्या वर्चस्वाखालीं आणून त्यानें 'चक्रवर्ति' ही पदवी संपादन केली.

पूरूच्या वंशजांना 'पौरव' असें म्हणतात. प्रसिद्ध कौरव–पाण्डव हे पौरवच होते. पौरवराजघराणें वेदकाळापासून खिस्तपूर्व पांचव्या शतकाच्या अखेरीपर्यंत अस्तित्वांत होतें. पौरवघराण्यांतील शेवटला राजा 'क्षेमक' नांवाचा होता असें आपणाला पुराणांवरून कळतें. क्षेमकाचा अंत कसा झाला आणि क्षेमकानंतर पौरवराज्याचे मालक कोण झाले हें पुराणें सांगत नाहींत.

पुराणें जें सांगू शकत नाहींत तें सांगण्याचा प्रयत्न मराठेशाहीच्या काळांतील आपल्या मराठी लेखकांनीं केलेला आहे!

'श्रीशिवदिग्विजय' या बखरीचा कर्ता असें सांगतो कीं पौरवघराण्यांतला शेवटला राजा क्षेमक यानें आपलें राज्य प्रद्योताला दिलें आणि स्वस्त्रीसह कलापग्रामीं हिमालयाचे ठायीं तपश्चर्येसाठीं गमन केलें.

'राजवाडे खंड ८' आणि 'पंत अमात्य बावडा दप्तर–भाग १' यांमध्यें बावडेकर पंत अमात्यांच्या दप्तरांतील एक जुनी यादी छापलेली आहे. ( रा. खं. ८ लेखांक ४९ आणि पं. अ. बा. द. भाग १ लेखांक ४२ ) या यादीमध्यें

राजा युधिष्ठिरापासून औरंगजेबापर्यंत कोण कोण दिल्लीपती झाले व त्यांनीं किती वर्षे राज्य केलें तें दिलेलें आहे. यादीकारानें हिंदुधर्मी दिल्लीपतींचीं नांवें भाट लोकांकडून मिळविलेलीं असावींत असें वाटतें. तो पौरवराजांचीं जीं नांवें सांगतो तीं पुराणांतील पौरवराजांच्या नांवांहून वेगळीं आहेत. तथापि तो सांगतो आहे ते पौरवराजे आणि पुराणांत सांगितलेले पौरवराजे हे एकच असले पाहिजेत असें पूर्ण विचारांतीं आमचें मत झालेलें आहे. हा यादीकार शेवटल्या पौरव राजाला ‘ लखमीदेव ’ ( लक्ष्मीदेव ) असें म्हणतो आणि लखमीदेवाचा प्रधान वीरसेन यानें आपल्या स्वामीचा वध करून त्याचें राज्य बळकावलें असें सांगतो.

मराठेशाहीच्या काळांतील या दोन लेखकांनीं केलेलीं हीं विधानें दिसण्यांत परस्परविरुद्ध अशीं दिसतात. तथापि दोघांच्याहि विधानांत कमी अधिक प्रमाणामध्यें सत्य असल्याचें आढळून येतें.

पौरवराजघराणें आर्यावर्तांतून निघून हिमालयांत खरोखरच जाऊन राहिलेलें होतें. पण तिकडे तें तपश्चर्येसाठीं गेलेलें नसून तिकडे संपादन केलेल्या नवीन मुलखावर स्वतः राज्य करावें या हौसेनें तें तिकडे गेलें. उज्जयिनीचे प्रद्योत राजे हे पौरवांचे जवळचे नातलग होते. पौरवांना हिमालयांत जाऊन राहण्याची हौस असल्यामुळें त्यांनीं आर्यावर्तांतील आपल्या राज्याचा कारभार प्रद्योतांकडे खरोखरच सोंपविलेला होता. पौरव हे त्या वेळीं सार्वभौम होते. ते हिमालयांत जाऊन राहिल्यामुळें त्यांच्या इकडील राज्याची व्यवस्था पहाणें आणि सार्वभौम या नात्यानें त्यांचे इकडे जे हितसंबंध होते त्या हितसंबंधाचें रक्षण करणें हीं कामें त्यांचे प्रतिनिधि म्हणून प्रद्योत करूं लागले. हीं कामें करीत असतांना प्रद्योतांचा मगधाच्या शैशुनागांशीं तंटा उद्भवला. शैशुनाग हे देखील पौरवांचे नातलगच होते. <u>पौरवांनीं आपले प्रतिनिधि केल्यामुळें</u> पौरवांवर ते रागावले होते आणि पूर्वेकडे आपल्या राज्याचा विस्तार करून सार्वभौम पौरवांच्या हितसंबंधाला बाध आणीत होते. <u>सार्वभौम पौरवांचे नात्यानें</u> शैशुनागांचें पारिपत्य करणें हें प्रद्योतांचें कर्तव्य होतें. प्रद्योत आणि शैशुनाग यांचा तंटा पुढें कित्येक पिढ्या चालू होता. त्यांत अखेरीस शैशुनागांची सरशी झाली व शैशुनागांनीं प्रद्योतांचा पार उच्छेद करून त्यांच्या ताब्यांतला सर्व मुलुख आपल्या राज्यांत सामील केला.

हिमालयांत जाऊन राहिलेल्या पौरवांनीं वास्तविक पाहिलें तर या तंट्यांत प्रद्योतांना साह्य करणें अवश्य होतें. परंतु पौरव हे हिमालयांत जातांना जसे प्रबळ

---

अधोरेखीत केलेलीं वाक्यें अशीं वाचावीं. १ पौरवांनीं प्रद्योतांना आपले

होते तसे हिमालयांत जाऊन राहिल्यावर प्रबळ राहिले नाहींत. तिकडे गेल्यावर ते दुर्बळ बनले. त्यामुळें त्यांचे तिकडे जे अधिकारी होते त्यांना पौरवांचें हिमालय प्रदेशांतलें राज्य हस्तगत करण्याची इच्छा होऊं लागली. आर्यावर्तात शैशुनागांनीं प्रद्योतांचा उच्छेद केला त्याच सुमारास हिमालयप्रदेशामध्यें शेवटल्या पौरव राजाचा वीरसेनानें खून करून त्याचें राज्य बळकावलें व तो आपणाला वीरशाह असें म्हणवूं लागला. पुढें खिस्तपूर्व ३२६ या वर्षी ज्यानें अलेक्झांडरला झेलम-नदीच्या कांठीं अडविण्याचा प्रयत्न केला तो इतिहासप्रसिद्ध ' पोरस ' राजा म्हणजे याच वीरसेनाचा निपणतू होय. त्याचें नांव पर्वतराज असें होतें. मुद्रा-राक्षस नाटकांत त्याला ' पर्वतेश्वर ' असें म्हटलें आहे, आणि कल्हण पंडिताच्या राजतरंगिणींत ' कुशेशय ' असें म्हटलें आहे. कुशेशय हा ' कुशीशाह ' या पैशाची भाषेतील नांवाचा अपभ्रंश आहे, आणि कुशीशाह हें पैशाची भाषेतील नांव म्हणजे ' पर्वतराज ' या नांवाचें केवळ भाषान्तर आहे.

" ज्याच्यापासून ब्राह्मण व क्षत्रिय उत्पन्न झाले, आणि देव व ऋषि यांच्या-कडून जें सत्कारलें गेलेलें होतें " अशी पौरवघराण्याची थोरवी पुराणकारांनीं वर्णिलेली आहे.

" पौरव म्हणजे विपद्ग्रस्तोद्धारसत्रांतले दीक्षितच होत " असे महाकवि कालिदासानें आपल्या अभिज्ञानशाकुंतल नाटकांत पौरवराजांसंबंधीं उद्गार काढलेले आहेत.

पौरवराजांची जुनी राजधानी हस्तिनापुर. पूरुवंशांतील ' हस्ति ' नांवाच्या एका राजानें हें नगर वसवून त्याला आपलें नांव दिलें अशी कथा आहे. हें नगर हल्लींच्या दिल्ली शहराच्या इशान्येस सुमारें ५७ मैल अंतरावर गंगातीरीं होतें.

प्राचीन काळचें इंद्रप्रस्थ नगर सांप्रतच्या दिल्ली शहराजवळ होतें. दिल्ली शहर यमुनेच्या पश्चिमतीरीं आहे आणि इंद्रप्रस्थ हें यमुनेच्या पूर्वतीरीं होतें. इंद्रप्रस्थ नगर पांडवांनीं वसविलें. कौरवसभेमध्यें द्यूतांत आपलें राज्य गमावीपर्यंत पांडवांची राजधानी इंद्रप्रस्थ ही होती.

कौरव–पांडवांच्या घनघोर युद्धांत पांडव विजयी झाल्यानंतर धर्मराज युधिष्ठि-राला पुन्हां जो राज्याभिषेक झाला तो हस्तिनापुर येथें झाला. कौरवांबरोबरच्या युद्धांत पांडवांचे सर्व पुत्र मरण पावले होते. त्यांतील अर्जुनपुत्र अभिमन्यु यालाच तेवढी संतति होती. अभिमन्यूचा पुत्र परीक्षित् हा युधिष्ठिराच्या मागून राजा

झाला. परीक्षित् राजाच्यानंतर १ जनमेजय २ शतानीक ३ सहस्रानीक ४ अश्वमेधदत्त, ५ अधिसीमकृष्ण ( धर्म ) आणि ६ निमिचक्र, उर्फ निचक्षु ( मनजीत ) इतके पौरवराजे हस्तिनापुर येथें सिंहासनारूढ झाले. निमिचक्राच्या कारकीर्दीत गंगानदीला महापूर येऊन हस्तिनापुर वाहून गेलें. त्यामुळें निमिचक्र राजाला आपली राजधानी दुसरीकडे नेणें भाग पडलें. त्यानें कौशाम्बी नगरी ही आपली राजधानी केली. हस्तिनापुर पुन्हा वसविण्याचा प्रयत्न पुढील काळांत कोणीं केल्याचें दिसत नाहीं.

विश्वामित्र ऋषि हा प्रथम कान्यकुब्ज देशाचा राजा होता हें प्रसिद्धच आहे. या विश्वामित्राचा आजा कुशिक या नांवाचा होता. त्यालाच ‘ कुशाम्ब ’ असेंहि म्हणत. कौशाम्बी नगरी या कुशिक उर्फ कुशाम्ब राजानें वसविली अशी कथा आहे. ही नगरी ज्या प्रदेशांत होती त्या प्रदेशाला ‘ वत्सदेश ’ असें नांव होतें. यामुळें कौशाम्बीला ‘ वत्सपत्तन ’ म्हणजे वत्सदेशांतलें शहर असेंहि कोणी म्हणत. ही कौशाम्बी नगरी प्रयागच्या नैऋत्येस सुमारें तीस मैल अंतरावर यमुनेच्या उत्तरतीरीं होती. आजला या ठिकाणीं ‘कोसाम’ नांवाचें एक लहानसें खेडें आहे.

पौरव राजे हस्तिनापुर सोडून कौशाम्बी येथें रहावयास आले त्यावेळीं त्यांच्या ताब्यांत गंगा आणि यमुना यांमधील बहुतेक प्रदेश असावा. पुढील काळांत या प्रदेशाच्या उत्तर भागावर त्यांचें वर्चस्व राहिलेलें नसावें. तथापि पुढील काळांत त्यांनीं यमुनेच्या दक्षिणेस विन्ध्यारण्यापर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केलेला होता असें दिसतें.

पांडव सार्वभौम होते. मगधदेशचा राजा जरासंध हा पांडवांच्या पूर्वी सार्वभौम होता. पांडवांनीं त्याचा वध करून आणि त्या वधानंतर दिग्विजय करून सार्वभौमत्व संपादिलें होतें. पांडवांनीं संपादन केलेला सार्वभौमत्वाचा मान पौरव घराण्याकडे पुढें बराच काळपर्यंत चालत होता.

पौरवघराणें कौशाम्बी येथें राहूं लागल्यानंतर भारतवर्षावर परकीय लोकांचीं मुख्यत्वेंकरून तीन आक्रमणें झालेलीं दिसतात. पहिलें असुर लोकांचें आक्रमण, दुसरें तुराणी अथवा तुरुष्क लोकांचें आक्रमण, आणि तिसरें पारसीक लोकांचें आक्रमण, हीं तीं आक्रमणें होत. पारसीकांच्या आक्रमणानंतर सुमारें दोनशें वर्षांनीं यवन अथवा ग्रीक लोकांचें आक्रमण भारतवर्षावर झालें. परंतु त्यावेळीं कौशाम्बी येथील पौरवघराणें अस्तित्वांत नव्हतें.

असुरांनीं प्रथम पंजाबांतील मद्र नामक देश हस्तगत करून तेथें आपलें राज्य स्थापलें. शाकल नगर म्हणजे सांप्रतचें सियालकोट ही त्यांची राजधानी होती. मद्रांत राहून ते भारतीय बनले तरी आपल्या असुरत्वाची त्यांना पूर्णपणें जाणीव होती आणि असुरसंस्कृतीचा त्यांना अभिमानहि वाटत होता. त्यांचे आचारविचार बाह्य वळणाचेच होते. आपणावर इकडे तसेंच मोठें संकट आलें तर पश्चिमेकडील आपले संस्कृतिबांधव आपलें या बाजूकडे वर्चस्व टिकवून धरण्याचे कामीं आपणांला मदत करतील अशी त्यांची खात्री होती. भारतवर्ष आपल्या वर्चस्वाखालीं आणून येथें आपलें साम्राज्य स्थापण्याची महत्त्वाकांक्षा त्यांनीं धरली आणि त्या उद्योगाला ते लागले. आसुरी संस्कृतीचा अभिमानी असणारा एक मग उपाध्याय या कामीं त्यांना उत्तेजन देत होता. पश्चिमेकडील असुरांत त्याचें चांगलें वजन होतें.

भारतवर्षांतील राजांच्या मुलींशीं लग्नें करून त्या राजांना आपले मांडलिक बनविणें, आणि ते राजे अगर त्यांचे पुत्र यांना त्यांच्या सैन्यानिशीं आपल्या स्वारींत हजर रहावयास लावणें, ही साम्राज्यविस्ताराच्या बाबतींत शाकलच्या या असुरराजांनीं योजिलेली मुख्य युक्ति होती. अर्वाचीन काळांतील मोंगल बादशहा अकबर यानें आपलें साम्राज्य वाढवितांना याच युक्तीचा अवलंब केलेला होता हें प्रसिद्ध आहे.

असुरसाम्राज्याची भारतवर्षांत स्थापना करणाऱ्या व्यक्तींचीं नांवें सुनीथ अथवा चन्द्रप्रभ, आणि सुमुंडि अथवा सूर्यप्रभ अशीं होतीं. सुनीथ हा शाकलचा राजा असून सुमुंडि हा युवराज होता. स्थूलमानानें यांचा काळ ख्रिस्तपूर्व अकरावें शतक हा दिसतो. यांच्या वेळीं कौशाम्बी येथें जनमेजय नांवाचा पौरवराजा होता. तो मोठा शूर, उदार, पंडित व अश्वमेधयाजी असा राजा होता. ( पुराणें ज्याला ‘ सुषेण ’ असें म्हणतात, आणि यादीकार मराठी लेखक ज्याचें ‘ सुरसेन ’ असें नांव सांगतो तो हा राजा असावा. ) या जनमेजयाला परपुष्टा म्हणजे कोकिला नांवाची कन्या होती. ती त्यानें हिमालयप्रदेशांतील आषाढपुरच्या राजपुत्राला देऊं केलेली होती. परंतु जनमेजयावर थोड्याच काळांत वायव्येकडून सुनीथ व सुमुंडि यांचें दडपण येऊन त्याला ती कन्या सुमुंडीला देणें भाग पडलें. आप्त झालेल्या शाकलाधिप सुनीथाला युद्धप्रसंगीं ससैन्य मदत करण्यालाहि जनमेजय बांधला गेला. याचा अर्थ शाकलाधिपतीचा तो ताबेदार बनला. पांडवांच्या वेळे-

पासून पौरव–घराण्याकडे चालत असलेला सार्वभौमत्वाचा मान पौरवराजे या वेळीं गमावून बसले.

हिमालय प्रदेशांतील एका राजपुत्राला देऊं केलेली पौरव राजाची कन्या शाकलच्या असुरांनीं हरण केली म्हणून हिमालयप्रदेशांतले सर्व सत्ताधारी खवळले. त्यांच्यांतील प्रमुख सत्ताधारी श्रुतशर्मा नांवाचा होता. त्यानें सैन्याची मोठी जमवाजमव केली आणि हिमालयांतून खालीं उतरून तो सुनीथाच्या मुलखांत शिरला. सुनीथानें आपले सर्व आप्तराजे आपल्या मदतीसाठीं ससैन्य बोलावले होते. सुनीथ आणि श्रुतशर्मा यांची इरावती ( रावी ) व चन्द्रभागा ( चिनाब ) या नद्यांच्या संगमाजवळ गांठ पडून निकराची लढाई झाली. तींत सुनीथ मारला गेला आणि असुर व त्यांच्या मदतीला गेलेले भारतीय राजे यांचा मोड झाला. त्या प्रसंगीं युवराज सुमुंडि हा आपल्या मग उपाध्यासह पश्चिमेकडे पळून गेला आणि तिकडील असुरसत्ताधाऱ्यांकडे मदतीची याचना करीत फिरूं लागला. त्याच्याबरोबर असलेल्या मग उपाध्यायाच्या खटपटीनें त्याला तिकडे चांगली मदत मिळाली. आपणाबरोबर मोठें सैन्य घेऊन तो परत आला आणि त्या सैन्याच्या जोरावर त्यानें श्रुतशर्म्याचा पराभव करून कैलासाच्या दक्षिणेकडील सर्व हिमालय प्रदेश आपल्या ताब्यांत घेतला. हा कैलास म्हणजे आजच्या काश्मिर संस्थानांतील कैलास नांवाची पर्वतश्रेणी होय.

सुनीथ व सुमुंडि यांचें हिमालयांतील ज्या सत्ताधाऱ्यांशीं युद्ध झालें ते सत्ताधारी आपणाला देवपुत्र असें म्हणवीत. हिमालयांतील त्यांचा मुलूख विद्याधरभूमि अगर विद्याधरवेदि म्हणून प्रसिद्ध होता. या विद्याधरभूमीलाच ऐतरेय ब्राह्मणामध्यें वैराज्य असें म्हटलेलें आहे. विद्याधरभूमींत अनेक लहान लहान सत्ताधारी असत. जो पराक्रमी पुरुष त्या सर्वांना आपल्या ताब्यांत आणण्याचे कामीं यशस्वी होई तो आपणाला वैराज् किंवा विद्याधरचक्रवर्ति असें म्हणवीत असे. विद्याधरभूमींतील सत्ताधाऱ्यांवर विजय संपादन करून सुमुंडि हा विद्याधरचक्रवर्ति झाला. शाकल नगर सोडून तो विद्याधरभूमींतच राहूं लागला. शाकलच्या सिंहासनावर दुसऱ्या राजपुत्राची स्थापना झाली.

या घराण्यांतील राजे आपणाला शाकलाधिप असें म्हणवीत. परदेशांत ते 'शांगलदीप' म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्यामध्यें आरंभीं तरी पश्चिमेकडील असुरांप्रमाणेंच मृतांचीं शरीरें औषधी लेप लावून भूगर्भांत सुरक्षित ठेवण्याची

चाल होती. या घराण्यानें सुमारें चार शतकें साम्राज्योपभोग घेतला असें दिसतें. आपल्या सैन्यांत तें मुख्यत्वें करून भारतवर्षाबाहेरील वाळवंटमय प्रदेशांतील लोकांचा भरणा करीत होतें आणि त्या काळांत वाळवंटमय प्रदेशांतील लोकांपैकीं अत्यंत सुधारलेले असे जे असुर लोक, त्यांच्याशीं आपलें नातें जोडीत होतें. यामुळें त्या घराण्याला येथें आपलें साम्राज्य दीर्घकाळ टिकवितां आलें. बाह्य लोक जोंपर्यंत या घराण्याच्या आश्रयानें आपलें पोट भरण्यासाठीं इकडे येत होते तोंपर्यंत त्यांच्या साह्यानें या घराण्याचें साम्राज्य चाललें. परंतु ज्या वेळीं ते या घराण्याला जिंकण्याच्या इराद्यानें इकडे चाल करून आले त्यावेळीं मात्र या घराण्याचें साम्राज्य ढांसळलें.

तुराणी अथवा तुरुष्क लोकांचें भारतवर्षांवरील आक्रमण हें शाकलाधिपाच्या पारिपत्यानिमित्त झालेलें होतें. तुराणचा सम्राट् आफ्रासियाब ( आफ्रासियाब म्हणजे सूर्य. आफ्रासियाब हें त्या सम्राटाचें नांव नसून बिरुद असावें असें वाटतें. ) याच्या साम्राज्याची दक्षिणसीमा आणि शाकलाधिपाच्या साम्राज्याची

---

१ आफ्रिसियाबच्या वेळीं आलेला तुराणी आणि भारतीय यांचा संबंध हा पहिला संबंध नसून आफ्रासियाबच्या पूर्वींदेखील तुराणी आणि भारतीय यांचा संबंध होता असें दिसतें. प्राचीन काळांतील भारतीय राजे इंद्राच्या बोलावण्यावरून इंद्राला असुरांविरुद्ध मदत करण्यासाठीं जात असल्याचे उल्लेख पुराणांतून अनेक आहेत. ज्याच्या मदतीला हे राजे जात होते तो इंद्र दिवस्पति नसून कोठला तरी भूपतीच असला पाहिजे हें उघड आहे. विद्याधर, यक्ष आणि गंधर्व हे लोक त्याला अनुकूल होते आणि असुर लोक हे त्याच्या विरुद्ध होते. ही परिस्थिति लक्ष्यांत घेतां त्या भूपति इंद्राचा मुलुख भारतवर्षाच्या उत्तरेस आणि वायव्येस असा दोन्ही दिशांकडे असला पाहिजे. असा मुलुख म्हणजे मध्य आशियांतील तुर्कस्थान हाच एक दिसतो. प्राचीन काळांतले भारतीय राजे ज्याच्या मदतीला जात तो इंद्र म्हणजे या तुर्किस्थानचा पुरातन काळांतील प्रभु असणें शक्य वाटतें. इंद्राला जीं अनेक नांवें आहेत त्यांमध्यें ‘ तुरासाह् ’ असें एक नाव आहे. या नांवाची व्युत्पत्ति कशीहि लावण्यांत येत असली तरी या नांवाचा सरळ अर्थ तुराणचा शहा म्हणजे राजा असा दिसतो आणि तो प्राचीन काळांतले भारतीय राजे ज्या इंद्राला मदत करण्यासाठीं जात तो इंद्र कोणता असला पाहिजे हें सूचित करतो यांत संशय नाहीं.

उत्तरसीमा या परस्परांना भिडून सीमेवरून त्या दोघांत प्रथम तंटा उद्भवलेला असावा. त्यांत शाकलाधिपाला हार खावी लागली आणि आफ्रासियाबनें त्याच्या-वर वार्षिक खंडणी लादली. आपणाला खंडणी भरावी लागते हें शाकलाधिपाच्या मनाला न साहून तो आपलें सैन्यबळ वाढवूं लागला. चार हजार हत्ती, एक लक्ष घोडदळ आणि पांच लक्ष पायदळ एवढा सेनासंभार त्याजपाशीं होतांच आफ्रा-सियाबला खंडणी देण्याचें त्यानें बंद केलें. आफ्रासियाबला त्यामुळें राग आला आणि आपला मुख्य सेनापति पिरान विसह याजबरोबर मोठी फौज देऊन त्याची त्यानें शाकलाधिपाच्या पारिपत्यासाठीं रवानगी केली. हा प्रकार ख्रिस्तपूर्व सातव्या शतकाच्या अखेरीस अगर सहाव्या शतकाच्या आरंभीं घडलेला असावा. तुरा-ण्यांच्या या स्वारीमुळें शाकलाधिपाच्या साम्राज्याची इमारत कोसळली आणि भारतीयांना डोकें वर करण्यास अवसर मिळाला. तुराण्यांच्या स्वारीचा दुसरा एक असा परिणाम झाला कीं सिंधुनद आणि चन्द्रभागा नदी ( चिनाब ) यांमधील प्रदेशांत तुरुष्क लोकांचा भरणा होऊन लवकरच त्यांचीं तेथें राज्यें थाटलीं. या तुरुष्कांचा राजा मरण पावला म्हणजे थडग्यांत त्याचें प्रेत पुरतांना त्या प्रेताच्या शेजारीं दुसरीं जिवंत माणसें पुरीत. असें करणारांचा हेतु हा कीं त्या राजाला परलोकामध्यें हीं माणसें नोकर म्हणून उपयोगीं पडावींत !

तक्षशिला नगरीचा विद्यांचें माहेर म्हणून ज्या काळांत लौकिक होता तो काळ, आणि शाकलाधिपांच्या अमदानीचा काळ हे एकच दिसतात. शाकलाधिपांचें साम्राज्य नष्ट झालें तसे आर्यावर्तांतले विद्यार्थि तक्षशिला येथें विद्या आणि शिल्प शिकण्यासाठीं जाण्याचे बंद झाले.

शाकलाधिपांच्या अमदानींत आर्यावर्तामध्यें काशीराज्य हेंच एक सुस्थितींत असलेलें राज्य दिसतें. शाकलाधिपांना उतरती कळा लागली त्याच सुमारास काशीराज्यालाहि उतरती कळा लागलेली दिसते.

शाकलाधिपांच्या साम्राज्याची इमारत कोसळल्यानंतर भारतवर्षांत आपणाला असुर अगर असुरांचे नातलग समजणारे जे सत्ताधारी राहिलेले होते त्यांजविरुद्ध भारतीयांची उठावणी झाली. भारतवर्षांत येऊन राहिलेले तुरुष्कहि या उठावणींत सामील झालेले असावेत. या उठावणीमुळें भारतवर्षांतील असुरसत्ताधाऱ्यांची इतिश्री झाली. यानंतर थोड्याच वर्षांत इराणमधील हुवज ऊर्फ सुशिएना येथील हखामणी नामक घराण्यांतला राजा कुरु ( सायरस ) हा बलाढ्य होऊन देशां-

मागून देश जिंकीत चालला आणि त्यानेंहि तिकडील, म्हणजे इराणच्या आखाताजवळील असुरांवर शस्त्र उपसलें. बावेरूचें वैभवशाली असुरराज्य त्यानेंच ख्रिस्तपूर्व ५३८ या वर्षी बुडविलें.

पारसीकांचें आक्रमण म्हणजे इराणी लोकांचें आक्रमण होय. इराणांतील निरनिराळ्या जातींचे लोक एकत्र करून हखामणी घराण्यांतील कुरु उर्फ सायरस राजानें त्यांचें एक बलाढ्य राष्ट्र बनविलें. कुरु हा तुराणच्या आफ्रासियाबचा नातु, म्हणजे मुलीचा मुलगा होता असें कोणी म्हणतात, तर कोणी तो माद म्हणजे मीडिया येथील राजाच्या मुलीचा मुलगा होता असें म्हणतात. त्याचा बाप कंबुजिय हा हुवज उर्फ सुशिएना येथें राज्य करीत असून मादभूपतीचा मांडलिक होता. कुरु हा ख्रिस्तपूर्व ५५९ या वर्षी सिंहासनारूढ झाला आणि ख्रिस्तपूर्व




५२९ या वर्षी मध्य आशियांत शत्रूंशीं लढत असतां मारला गेला. आपल्या ३० वर्षांच्या कारकीर्दीत तो मांडलिकाचा स्वतंत्र राजा आणि स्वतंत्र राजाचा सम्राट् (क्षायथिय क्षायथियानाम्=क्षत्रियः क्षत्रियाणाम्=राजाधिराज, सम्राट्.) होऊन त्यानें ईजीयन समुद्रापासून सिंधुनदापर्यंत आणि कश्यप समुद्र (कास्पियन समुद्र) व वंकू नदी (ऑक्सस) यांपासून खालीं इराणचें आखात व सिंधुसागर येथवर आपलें साम्राज्य वाढविलें. कुरूच्या पश्चात् त्याचा ज्येष्ठ पुत्र कंबुजिय (कॅम्बीसिस) हा इराणचा सम्राट् झाला. त्यानें मुद्राय म्हणजे मिसर देश जिंकला. कंबुजिय

क्रूर होता. मिसर देशांत त्यानें अनेक क्रूरपणाचीं कृत्यें केलीं. लिबियांतील अॅमोनियन लोकांवर पाठविलेल्या सैन्याची वाताहात आणि इथिओपिया जिंकण्याचे कामीं आलेलें अपयश, यांमुळें कंबुजियाला वेड लागलें. वेडाच्या भरांत त्यानें आपला धाकटा भाऊ बर्दिय याचा वध केला. बर्दियाच्या वधाची बातमी सैन्याला नसल्यामुळें बर्दियाचा तोतया उभा राहिला. गौमात नांवाचा एक मग उपाध्याय होता. कुरुपुत्र बर्दिय तो मीच असा त्यानें पुकार केला. कंबुजियाच्या क्रूरपणामुळें कंबुजियावर नाराज असलेलें इराणी सैन्य त्या तोतयाला जाऊन मिळालें. तोतयानें साम्राज्यांतले अनेक प्रांत भराभर हस्तगत केले आणि तो सम्राट् या नात्यानें सिंहासनारूढ झाला ! कंबुजिय त्या वेळीं सूर्या ( सिरिया ) नामक देशांत होता. त्याला हें वृत्त कळतांच त्यानें आत्महत्या केली. ( ख्रिस्तपूर्व ५२२ ).

गौमात मगानें बर्दियाचें सोंग घेऊन राज्य मिळविलें खरें, पण त्याचें तें सोंग फार दिवस टिकलें नाहीं. हा कुरुपुत्र बर्दिय नसून तोतया आहे असें सरदार मंडळीला लवकरच समजून आलें. या मंडळीनें एके दिवशीं राजवाड्यांत घुसून गौमाताला ठार मारलें. गौमाताला मारणाऱ्यांमध्यें विश्तास्पपुत्र दारयवहु (डरायस) नांवाचा एक सरदार कुरु व कंबुजिय यांच्याप्रमाणेंच हखामणी घराण्यांतला होता. गौमाताच्या वधानंतर तोच इराणचा सम्राट् झाला. ( ख्रिस्तपूर्व ५२१ ).

साम्राज्यामध्यें ठिकठिकाणीं उद्भवलेलीं बंडें मोडण्यांत दारयवहूला आपल्या कारकीर्दीचीं पहिलीं तीन वर्षें खर्च करावीं लागलीं. या तीन वर्षांत त्यानें एकंदर आठ बंडखोरांचीं बंडें मोडून त्या बंडखोरांना जिवंत धरलें आणि ठार मारलें. या आठहि बंडखोरांचा एक विशेष म्हटला म्हणजे हा कीं गौमात मगासारखे ते सगळे तोतये होते ! बंडखोरांची वाट लावल्यानंतर दारयवहु भारतवर्षाकडे वळला. त्यानें सिंधुनद समुद्राला कोठें मिळतो याचा शोध लावला आणि सिंधूच्या सप्तमुखांजवळील सैंधवांना जिंकून त्या भागांतील समुद्राचा उपयोग केला. त्यानंतर त्याचा आरुणि नांवाचा एक सेनापति आपणाबरोबर मोठी फौज घेऊन गांधारदेशांतून पंजाबांत शिरला, आणि पंजाबांतून पुढें सरकून यमुना व गंगा या नद्यांमधील पौरवराज्याचा कांहीं भाग त्यानें जिंकला.

औरंगजेबानें संभाजीचा ज्या पद्धतीनें वध केला तसल्याच पद्धतीनें दारयवहु हादेखील युद्धांत पकडून आणलेल्या आपल्या शत्रूंचा वध करीत असे. फ्रवर्ति आणि चित्रतोक्म या त्याच्या दोन शत्रूंना पकडून त्याच्यापुढें आणण्यांत आलें


तेव्हां दारयवहूनें प्रथम त्यांचे नाक कान व जीभ हे अवयव कापून नंतर त्यांचे डोळे फोडले आणि डोळे फोडल्यावर मग त्यांना सुळी दिलें ! आपल्या सेनापतींना स्वारीवर रवाना करते वेळीं तो आज्ञा करी, " असेच जा आणि जे आपणाला माझे म्हणवीत नाहींत अशा अमित्रांना कापून काढा ! " आरुणीला भारतवर्षावर रवाना करतांना त्यानें अशीच आज्ञा केलेली असली पाहिजे. ही आज्ञा पाळण्यांत आरुणी बिलकुल कसूर करीत नव्हता; आणि त्यामुळेंच इकडील लोकांना तो ' दारुणकर्मदक्ष ' वाटला. या दारुणकर्मदक्ष आरुणीला वत्सराज उदयनानें मारलें आणि पारसीकांची स्वारी मागें परतवून लावली. यानंतर पारसीकांनीं भारतवर्षावर पुन्हा स्वारी केली नाहीं. सिंधुनद हीच त्यांच्या साम्राज्याची पूर्वसरहद्द मानली गेली.

पांडवांच्या पश्चात् पौरव घराण्यांतील विशेष प्रसिद्ध अशी व्यक्ति म्हटली म्हणजे वत्सराज उदयन हीच होय. खिस्तोत्तर आठव्या शतकापर्यंत वत्सराज उदयनाच्या कथा भारतवर्षांत लोकप्रिय होत्या असें दिसून येतें.

उदयन चरित्राविषयीं लोकांना वाटणाऱ्या प्रेमामुळें अनेक लेखकांनीं उदयन विषयक छोट्या मोठ्या कथा लिहिल्या आणि कवींनीं नाटकें रचलीं. उदयनविषयक कथांमध्यें सर्वांत मोठी कथा लिहिणारा लेखक म्हटला म्हणजे वररुचि हा होय. हा नवनंदांतील शेवटल्या नंदराजाचा कांहीं काळ अमात्य होता. तो मूळचा कौशाम्बी नगरींतला असल्यामुळें वत्सराज उदयनाविषयीं त्याला आपलेपणा वाटून त्यानें उदयनविषयक एक विस्तृत कथा लिहिली. वररुचीनें लिहिलेल्या कथेचें पुढील काळांत काणभूति नांवाच्या मनुष्यानें पैशाचींत भाषांतर केलें. शातवाहनकाळांतील गुणाढय पंडितानें त्या पैशाची भाषांतराला पद्यरूप दिलें आणि बृहत्कथा नामक कथासंग्रहाची ती आवरणकथा बनविली.

उदयन विषयक नाटकांपैकीं १ प्रतिज्ञायौगंधरायण २ स्वप्नवासवदत्त, ३ प्रियदर्शिका आणि ४ रत्नावली हीं नाटकें उपलब्ध आहेत.

**माधव केशव काटदरे**


उदयनकालीन
भारतवर्ष.
मगध
सुराष्ट्र
सिंधु सागर
(पश्चिमसमुद्र)
गंगासागर
(पूर्वसमुद्र)
भारत महोदधि
(दक्षिण समुद्र.)

# वत्सराज उदयन

## १—अडीच हजार वर्षांपूर्वी

पवित्र गंगा आणि यमुना यांचा संगम प्रयाग नामक क्षेत्राजवळ झालेला आहे. प्रयागच्या पश्चिमेकडील भूप्रदेशाला प्राचीन काळीं वत्सदेश असें म्हणत असत. या देशाची कापसाच्या उंची वस्त्रांविषयीं प्रसिद्धि होती. या देशाच्या राजधानीचें नांव कौशाम्बी असें होतें. ही नगरी यमुनेच्या उत्तरतीरीं असून मोठी शोभिवंत आणि धनाढ्य अशी होती. तेथें सुमारें अडीच हजार वर्षांपूर्वी पौरव या नांवाचें घराणें राज्य करीत होतें. त्या घराण्यांतील राजे आपणाला पंडुपुत्र अर्जुनाचे वंशज म्हणवीत. हस्तिनापुर येथील पौरवांच्या नांवांसारखींच भीष्म, भीमसेन, अभिमन्यु, जनमेजय वगैरे नांवें या कौशाम्बीच्या पौरवांतहि होतीं.

कौशाम्बीच्या पौरवांचें राज्य गंगा आणि यमुना यांमधील दुआबांत होतें, त्याचप्रमाणें यमुनेच्या दक्षिणेकडील प्रदेशांतहि होतें. त्यांच्या राज्याच्या दक्षिण सीमेवर विन्ध्यारण्य होतें. विन्ध्यारण्यांत भिल्ल वगैरे आटविक, म्हणजे जंगली लोक रहात. कौशाम्बीच्या पौरवांनीं या आटविकांशीं स्नेहभावानें वागण्याचें धोरण ठेवलेलें होतें. त्यामुळें पौरवराज्यांतील लोकांचा फायदा होता आणि आटविकांचाहि फायदा होता. आटविकांशीं पौरव राजांचा स्नेह असल्यामुळें पौरवराज्यांतले सार्थवाह अथवा लमाण हे व्यापारी—मालाची नेआण विन्ध्यारण्यांतून निर्भयपणें करूं शकत, आणि आटविकदेखील अरण्यांत मिळणाऱ्या

वस्तु पौरवराज्यांत विकावयास आणीत. जंगली जीवनामुळें काटक, चपळ आणि धाडसी बनलेल्या आटविकांचा पौरवांच्या पायदळांत बराच भरणा होता. शिवाय पौरवराजांच्या पदरीं शिकारी म्हणून नोकरी मिळण्याचीहि त्यांना सोय होती.

पौरवराज्यांतील अगदीं पूर्वेकडील प्रांताचें नांव लावाणक असें होतें. या प्रांताचा अधिकारी लावाणक नामक गांवीं रहात असे. हें गांव पौरवराज्याच्या पूर्वसीमेपाशीं असल्यामुळें सीमेवरील जंगलांत शिकार करण्यासाठीं म्हणून पौरवराजे केव्हां केव्हां या गांवीं येऊन रहात असत. लावाणक गांवीं स्वतःला रहाण्यासाठीं त्यांनीं एक वाडा बांधलेला होता. लावाणक प्रांताच्या पलीकडे मगधराज्याचा मुलुख होता.

मगधराज्य म्हणजे मुख्यत्वेंकरून हल्लींचा बिहार प्रांत होय. भारतवर्षाच्या प्राचीन इतिहासांत मगधदेशाला महत्त्वाचें स्थान आहे. मगधावर पूर्वीं सम्राट् जरासंधाचे वंशज राज्य करीत होते. त्यांच्या घराण्याला बार्हद्रथ घराणें असें म्हणत. मगधाचें राज्य या बार्हद्रथ घराण्यापासून शैशुनाग घराण्यानें नुकतेंच जिंकून घेतलेलें होतें. अडीच हजार वर्षांपूर्वीं या शैशुनाग घराण्याची राजधानी गिरिव्रज ऊर्फ राजगृह ही होती. पुढील काळांत या घराण्यानें पाटलीपुत्र ऊर्फ कुसुमपुर ही आपली राजधानी केली. गिरिव्रज अथवा राजगृह हें ठिकाण हल्लींच्या पाटणा जिल्ह्याच्या दक्षिणसीमेवर होतें. सांप्रत त्याला राजगीर असें म्हणतात.

पौरवराज्याच्या उत्तरेला कोसलराज्य होतें. हें कोसलराज्य म्हणजे सामान्यतः आजचा अयोध्या प्रांत होय. कोसलवर इक्ष्वाकु घराण्यांतले राजे राज्य करीत होते. ते आपणाला दाशरथी रामाचा पुत्र कुश याचे

वंशज म्हणवीत. त्यांच्या राजधानीचें नांव श्रावस्ती नगरी असें होतें. ही श्रावस्ती नगरी कोसलराज्याच्या उत्तर भागांत हिमालयाच्या पायथ्याजवळ होती. इक्ष्वाकु राजांची दुसरी राजधानी अयोध्या ही होती.

कोसल, वत्स आणि मगध या तीन राज्यांच्या मध्यें काशीराज्य होतें. सुप्रसिद्ध काशी ऊर्फ वाराणसी नगरी ही या राज्याची राजधानी होती. काशीचे राजे ब्रह्मदत्त या नांवानें प्रसिद्ध होते. ब्रह्मदत्त हें त्यांच्या घराण्याचें नांव होतें.

पौरवराज्याच्या नैऋत्येला अवंतिराज्य होतें. अवंतिराज्य म्हणजे सांप्रतच्या माळव्याचा पश्चिमभाग होय. माळव्याच्या पूर्व भागाला प्राचीन काळीं दशार्ण असें नांव होतें. अवंति येथील पूर्वींच्या राजघराण्याचा उच्छेद करून प्रद्योत नामक घराण्यानें अवंतीवर नुकतीच आपली सत्ता प्रस्थापित केलेली होती. प्रद्योतांनीं ज्या राजघराण्याचा उच्छेद करून अवंतिराज्य काबीज केलें, त्या घराण्याचें नांव वीतिहोत्र असें होतें. वीतिहोत्र आणि प्रद्योत या दोन्ही नांवांचा अर्थ अग्नि किंवा सूर्य असा होतो. प्रद्योतांची राजधानी उज्जयिनी ही होती.

अडीच हजार वर्षांपूर्वींचा काळ म्हणजे ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकाचा काळ होय. पुराणप्रसिद्ध असुर लोक या शतकामध्यें पृथ्वीतलावरून कायमचे नष्ट झाले. पश्चिमेस इराणच्या आखाताजवळ जे असुर सत्ताधारी होते त्यांचा उच्छेद इराणी लोकांनीं केला आणि भारतवर्षांत जे असुर अगर असुरांशीं आपलें नातें जोडणारे सत्ताधारी होते त्यांचा उच्छेद भारतीयांनीं केला. कौशांबी येथील पौरव राजानें

या कार्यांत भाग घेतलेला होता. परंतु भारतीयांना विजय मिळालेला पहाण्यास तो जिवंत राहिला नाहीं. शत्रूबरोबर युद्ध चालू असतांना युद्धांतच तो मारला गेला. आसुरी वर्चस्वाला कायमची मूठमाती मिळावी म्हणून ज्या पौरव राजानें आपल्या प्राणांचें मोल दिलें त्या पौरव राजाचाच वत्सराज उदयन हा नातू होय.

पौरवांनीं वत्सदेशांतील कौशांबी नगरी आपली राजधानी केल्यापासून कौशांबीच्या सिंहासनावर आरूढ झालेला प्रत्येक पौरव राजा हा वत्सराजच होता. तथापि उदयनालाच तेवढें 'वत्सराज' असें म्हणण्याचा प्रघात पडून गेलेला असल्यामुळें 'वत्सराज' हें उदयनाचें दुसरें नांवच बनलें आहे !

## २—उदयनाचें पूर्ववृत्त

पांडवांच्या वेळेपासून चक्रवर्तित्वाचा मान पौरव घराण्याकडे चालत आलेला होता. परंतु खिस्तपूर्व अकराव्या शतकामध्यें एका परकीय घराण्यानें पौरवांपासून तो मान हिरावून घेतला आणि पौरवांना आपले मांडलिक बनविलें. पंजाबांतील चंद्रभागा ( चिनाब ) आणि इरावती ( रावी ) या नद्यांमधील रेचना दुआबाला पूर्वी मद्रदेश असें म्हणत. पौरवांपासून चक्रवर्तित्वाचा मान हिरावून घेणारें परकीय घराणें या मद्रदेशांत येऊन स्थायिक झालेलें होतें. हें घराणें पश्चिमेकडील असुरांशीं आपलें नातें सांगणारें होतें. शाकल नगर ( सियालकोट=शैलकूट ) ही त्याची राजधानी होती. या घराण्यांतील राजे शाकलाधिप या नांवानें प्रसिद्ध होते. आर्यावर्तांतील सर्व राजे या शाकलाधिपांचे अंकित बनलेले होते, आणि शाकलाधिप हे इच्छेस येईल त्याप्रमाणें राजांचे उदयास्त

घडवून आणण्याला समर्थ असे सर्वशक्तिमान् प्रभु होऊन बसलेले होते. भारतवर्षांत ते बाह्य लोकांच्या साह्यानें आपलें वर्चस्व राखीत असल्याकारणानें त्यांच्या अमदानींत भारतवर्षाबाहेरील वाळवंटमय प्रदेशांतले शस्त्रजीवी लोक भारतवर्षांत सारखे लोटत होते. पंजाब हा भारतवर्षाचा उत्तरभाग त्यामुळें म्लेच्छमय बनून गेला आणि भारतीयांना उत्तर दिशा दूषित झालेली दिसूं लागली. कौरव-पांडवांच्या वेळीं यमुना आणि चर्मण्वती ( चंबळा ) या नद्यांच्या पश्चिमेकडील प्रदेशांत सिंधुनदापर्यंत जीं राष्ट्रें होतीं तीं सगळीं नष्ट होऊन पुढील काळामध्यें त्या प्रदेशांत जिकडे तिकडे नवीं राज्यें थाटलीं होतीं; आणि हा सारा शाकलाधिपांचा प्रभाव होता. खिस्तपूर्व सातव्या शतकाच्या अखेरीपर्यंत शाकलाधिप प्रबल होते. त्यानंतर त्यांच्यावर तुराणी लोकांची स्वारी होऊन ते दुर्बळ बनले. शाकलाधिपांच्या दुर्बळतेचा फायदा घेण्याला भारतीय लोक उद्युक्त झाल्यास नवल नाहीं. आपलें गमावलेलें चक्रवर्तिपद पुन्हां संपादन करण्याची संधि आतां आलेली आहे असें पौरवांना वाटूं लागलें आणि तेहि चक्रवर्तिपद प्राप्त करून घेण्याच्या कामीं अवश्य असलेल्या पूर्वतयारीला लागले.

खिस्तपूर्व सहाव्या शतकाच्या आरंभीं कौशाम्बी येथें जो पौरव राजा राज्य करीत होता त्याचें पौरवपरंपरेंतील नांव जनमेजय असें होतें. वत्सराज उदयनाचा हा पणजा होय. शाकलाधिप दुर्बळ होतांच या जनमेजयानें आपलें सैन्यबळ आणि राज्य वाढविण्याला सुरवात केली. आपल्या राज्याची सीमा त्यानें एका बाजूस अवंतिराज्याला आणि दुसऱ्या बाजूस मगधराज्याला नेऊन भिडविली. त्याच्या पराक्रमामुळें लोक त्याला बृहद्रथ किंवा नरहरि असें म्हणूं लागले.

बृहद्रथ म्हणजे महान् योद्धा आणि नरहरि म्हणजे पुरुषसिंह. लोकांत याच नांवानीं तो प्रसिद्धीस आल्यामुळें त्याचें स्वतःचें जनमेजय हें नांव मागें पडलें.

कोसलचा इक्ष्वाकुवंशी राजा कृतंजय ऊर्फ कृतवर्मा आणि मगधाच्या शैशुनागांचा मूळपुरुष शिशुनाग हे जनमेजय बृहद्रथाशीं समकालीन होते.

जनमेजय बृहद्रथाचा पुत्र, आणि उदयनाचा आजा याचें नांव वसुदान असें होतें. याच्यावेळीं पौरवांचें लष्करी सामर्थ्य पुष्कळच वाढलेलें होतें. पूर्णबल, आणि सहस्रानीक हीं त्याचीं बिरुदें होतीं. सहस्रानीक या त्याच्या बिरुदावरून असें वाटतें कीं त्याच्या गजदळांत एक हजार हत्ती होते. त्या वेळीं चेदिदेशांतील जंगलांत उत्तम प्रतीचे हत्ती सांपडत असत आणि दशार्णदेशांतील जंगलांमध्यें मध्यम प्रतीचे हत्ती पुष्कळ होते. वसुदानाच्या पित्यानें हे दोन्ही देश जिंकून पौरव राज्यांत सामील केलेले होते. त्यामुळें वसुदानाला आपलें गजदळ वाढवितां आलें. वसुदानानें ही सर्व तयारी असुरांच्या उच्छेदासाठीं केलेली होती.

वसुदानाच्या राणीचें नांव मृगावती ऊर्फ कौसल्या असें होतें. मृगावती ही कोसलचा राजा कृतंजय ऊर्फ कृतवर्मा याची कन्या होय. मृगावतीचा भाऊ कोसलराज रणंजय, मगधाचे काकवर्ण, व क्षेमधर्मा ऊर्फ प्रसेनजित्, आणि अवंतीचा पुलिक प्रद्योत हे राजे वसुदानाशीं समकालीन होते.

आर्यावर्ताच्या पश्चिमेकडील आणि वायव्येकडील असुरपरंपरेचे सत्ताधारी व आर्यावर्तांतील सत्ताधारी यांचा संग्राम वसुदानाच्याच

कारकीर्दींत झाला. आर्यावर्तांतील सत्ताधाऱ्यांनीं हा संग्राम जिंकला खरा; पण तो जिंकण्यापूर्वीं पौरवसैन्यावर शत्रूंचा एकाएकीं जोर होऊन पौरव राजा वसुदान हा मारला गेला आणि त्याच्या सैन्याचा संहार झाला. पौरवांच्या आकांक्षांना हा एक मोठाच धक्का बसला.

वसुदानाच्या पुत्राचें नांव शार्ङ्गदेव असें होतें; आणि शार्ङ्गदेवाच्या राणीचें नांव विष्णुमती ऊर्फ वैदेही असें होतें. विष्णुमती ही विदेह देशांतील मिथिलानगरीच्या राजाची कन्या होती. मिथिला नगरी म्हणजे नेपाळांतील घाटी टेंकड्यांजवळचें सांप्रतचें जनकपूर होय. विष्णुमती आणि शार्ङ्गदेव हींच वत्सराज उदयनाचीं मातापितरें होत.

शार्ङ्गदेवाच्या कारकीर्दींत पौरवांचें लष्करी सामर्थ्य कमी झालेलें होतें. शार्ङ्गदेव हा केवळ शतानीक म्हणून प्रसिद्ध आहे. त्याच्या वेळीं अवंतीचे प्रद्योत आणि मगधाचे शैशुनाग हे विशेष जोरांत होते. काशीचे राजे जरी जोरांत नव्हते तरी लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत खालीं आलेल्या पौरवांना संधी साधून चिमटे घेण्याला ते कमी करणारे नव्हते.

शार्ङ्गदेव शतानीकाच्या अमात्याचें नांव युगंधर असें होतें. सेनापतीचें नांव सुप्रतीक असें होतें आणि एक विनोदी ब्राह्मण त्याचा नर्मसचिव होता. या मंडळीला पौरवघराण्याची पूर्वपरंपरा अवगत असून पौरवघराण्याविषयीं अभिमान वाटत होता. कसाहि बिकट प्रसंग आला तरी ही मंडळी आपल्या राजाला सोडून जाणारी नव्हती.

चक्रवर्तिपदाची आकांक्षा आतां अवंतीचे प्रद्योत आणि मगधाचे शैशुनाग यांच्या ठिकाणीं उत्पन्न झालेली होती. दोघांच्या मध्यें पौरव हे ‘ अंतर्धि ’ म्हणजे बफर स्टेटच्या राजासारखे होते. पौरवांना आपल्या

वर्चस्वाखालीं आणून संधि सांपडतांच पलीकडच्या जबरदस्ताला मर्मी तडाखा द्यावयाचा आणि ‘ कुंडलें हिमविंध्यांचीं, सागरांता अशी मही ’ आपल्या अमलाखालीं आणावयाची, हा त्या दोघांच्याहि मनांतला डाव होता. पौरवांवर आपलें शक्तिसर्वस्व लोटून पौरवांना जिंकतां येणें त्यांना अशक्य नव्हतें. परंतु पौरवांवर शक्तिसर्वस्व लोटल्यास पौरवहि प्राण पणाला लावून अखेरपर्यंत लढतील आणि त्याच्यामुळें आपली जी हानी होईल तिचा फायदा पौरवांपलीकडचा जबरदस्त ताबडतोब घ्यायला चुकणार नाहीं हें त्या दोघांतला प्रत्येक जाणून होता; आणि त्यामुळें पौरवांवर शक्तिसर्वस्व न घालतां कधीं थोडासा धाक दाखवून, कधीं गोडीगुलाबीची भाषा वापरून तर कधीं कसलें तरी आमिष पुढें करून पौरवांना आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचा उद्योग त्यांनीं चालविला होता. परंतु पौरवांनीं त्यांना दाद न देतां आपलें स्वातंत्र्य कायम राखलें. युगंधर अमात्यानें त्यांचीं कारस्थानें हाणून पाडलीं आणि सुप्रतीक सेनापतीनें त्यांच्या स्वाऱ्या परतवून लावल्या.

शतानीकपुत्र वत्सराज उदयन याचा जन्म उदयपर्वतावर झाला व त्यामुळेंच त्या राजपुत्राचें नांव ‘ उदयन ’ असें ठेवण्यांत आलें. उदयपर्वत म्हणजे उदयगिरि[१] होय.

---

१ भारतवर्षांत अनेक उदयगिरि आहेत. त्यांतील सांप्रतच्या भेलशाजवळचा उदयगिरि हें कदाचित् उदयनाचें जन्मस्थान असूं शकेल. कथालेखक उदयनाचा उदयगिरिवर जन्म होण्याचें कारण म्हणून एक अद्भुत प्रकार वर्णन करतात. तो एखाद्या परीकथेंतच शोभणारा आहे. उदयनाच्या मातेला प्रसूतीसाठीं उदयगिरि येथें गुप्तपणें ठेवण्यांत आलेलें असावें आणि त्याचें कारण पौरवांची त्यावेळीं झालेली बिकट परिस्थिति हें असावें.

उदयन हा अतिशय देखणा होता. त्यामुळें रूपदेव असें एक नांव त्याला मिळालेलें होतें.

उदयनाचें शिक्षण उदयगिरि येथेंच झालें. त्याला धनुर्विद्या शिकविणारा आचार्य जमदग्नि होता. जमदग्नि हें त्या आचार्याचें नांव असेल अगर कदाचित् गोत्रहि असूं शकेल.

उदयन हा गांधर्वविद्यानिपुण म्हणून प्रसिद्ध होता. गांधर्वविद्या म्हणजे संगीत होय. ही विद्या त्यानें उदयगिरि येथें असतांनाच संपादन केली आणि पुढें अभ्यासानें वाढविली.

उदयगिरिजवळ जंगल असून त्या जंगलांत भिल्ल लोक रहात असत. धनुर्विद्येचें शिक्षण संपल्यावर उदयन हा धनुष्यबाण घेऊन त्या जंगलांत शिकारीसाठीं जात असे. एके दिवशीं तो त्या जंगलांतून फिरत असतां एक भिल्ल एका नाग जातीच्या पुरुषाला पकडून नेत असलेला त्यानें पाहिला. तो नाग गायन आणि वीणावादन या कलांमध्यें निष्णात असून त्याचें नांव वसुनेमी असें होतें. त्याच्यापाशीं घोषवती नांवाची एक उत्कृष्ट वीणा होती. तो कलावंत एका जंगली भिल्लाच्या तावडींत सांपडलेला पाहून उदयनाला त्याची दया आली. आपल्या हातांतलें सोन्याचें कडें त्या भिल्लाला देऊन उदयनानें वसुनेमीला सोडविलें. वसुनेमीनें या उपकाराबद्दल उदयनाला गांधर्वविद्या शिकविली आणि आपली उत्कृष्ट घोषवती वीणाहि त्या राजपुत्राला अर्पण केली.

घोषवती वीणेची प्राप्ति झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं उदयनाला उदयगिरीहून कौशाम्बी येथें नेण्यांत आलें आणि तेथें त्याला युवराजाचा अधिकार मिळाला. उदयनाचें वय त्यावेळीं सुमारें सोळा वर्षांचें असावें.

युवराज झालेल्या उदयनाला जे सहाय्यक देण्यांत आले ते शतानीकाच्या मंत्र्यांचे पुत्र होते. त्यांचीं नांवें यौगंधरायण, रुमण्वान् आणि वसंतक अशीं होतीं. वयानें ते उदयनाहून थोडे मोठे असावेत.

यौगंधरायण हा युगंधर अमात्याचा पुत्र होता. त्याला यौगंधरायण हें नांव त्याच्या बापाच्या नांवावरून पडलें; आणि याच नांवानें तो प्रसिद्धीस आल्यामुळें त्याचें स्वतःचें नांव लुप्त झालें. यौगंधरायण या नांवाचा अर्थ युगंधरपुत्र असा होतो. यौगंधरायण हा लहानपणापासून आपल्या बापाच्या तालमेंत तयार झालेला होता. संकटामध्यें तो खिन्न होऊन बसणारा नव्हता. कसाहि अडचणीचा प्रसंग आला तरी तो स्वस्थ रहाणारा नव्हता. कपटाच्या पाशांत सांपडला तरी तो निरुत्साह होणारा नव्हता आणि शत्रूनें कितीहि प्रत्याघात केले तरी प्राण जाईपर्यंत प्रयत्न म्हणून सोडावयाचा नाहीं असा त्याचा बाणा होता. सार्वभौमपद पौरवांचें आहे, आणि पौरवांना तें मिळालें पाहिजे असें त्याला वाटत होतें.

रुमण्वान् हा सुप्रतीक सेनापतीचा पुत्र होता. पौरव सार्वभौम व्हावेत अशी यौगंधरायणाप्रमाणेंच रुमण्वानाचीहि इच्छा होती. यौगंधरायण आणि रुमण्वान् हे दोघेहि एकमेकांना चाहणारे आणि एकमतानें चालणारे असून कोणतेंहि काम एकदां करावयाचें ठरल्यावर तें पार पाडतांना पडतील ते प्रायास आणि लागतील तीं साहसें करावयाला बिलकुल डगमगणारे नव्हते.

वसंतक हा शतानीकाच्या नर्मसचिवाचा पुत्र होता. याचें मुख्य काम म्हटलें म्हणजे विनोदपर भाषणें करून आणि कथा सांगून

उदयनाची करमणूक करणें हें होतें. उदयनविषयक नाटकांत वसंतक हा विदूषक म्हणून दाखविलेला असतो.

उदयनाला यौवराज्याभिषेक झाल्यानंतर वास्तविक पहातां त्याचा विवाह व्हावयाचा; परंतु पौरवराज्याचें हिताहित उदयनाच्या विवाहाशीं निगडित झालेलें असल्यामुळें तो विवाह त्वरित उरकून घेतां येण्यासारखा नव्हता. पौरवराज्याचें जेणेंकरून हित होईल अशा रीतीनें तो विवाह जुळण्याचा योग येण्यापूर्वींच राजा शतानीक मृत्यु पावला. अकालीं मृत्यु पावलेल्या पित्याच्या पश्चात् अविवाहित उदयन सिंहासनारूढ होऊन 'वत्सराज उदयन' झाला. वत्सराज उदयनाच्या राज्यारोहणाचा काळ आणि इराणच्या हखामणी घराण्यांतील विश्तास्पपुत्र दारयवहु अथवा डरायस याच्या राज्यारोहणाचा काळ यांमध्यें फारसें अंतर नव्हतें.

## ३—उदयन आणि त्याचे शेजारी

ज्याचा पवित्र वेदग्रंथांत उल्लेख केलेला आहे, ज्यांत 'राजर्षि' पद धारण करणारे अनेक विख्यात राजे होऊन गेले, अशा आपल्या पौरवघराण्याचा वत्सराज उदयनाला मोठा अभिमान वाटत होता.

उदयन राज्यारूढ झाला त्यावेळीं कोसलदेशांत रणंजयपुत्र संजय राजा राज्य करीत होता. त्याला प्रसेनजित् नांवाचा पुत्र होता. तो वयानें उदयनाहून थोडा मोठा होता. मगधदेशांत शैशुनाग घराण्यांतला क्षत्रौजा ऊर्फ महापद्म राज्य करीत होता. त्याचा ज्येष्ठपुत्र बिंबिसार नांवाचा होता. उदयन आणि बिंबिसार हे दोघे एकाच दिवशीं जन्मले. क्षत्रौजाला बिंबिसाराखेरीज आणखीं जीं अपत्यें होतीं त्यांत पद्मावती

नांवाची एक कन्या होती. अवंतिदेशांत प्रद्योत घराण्यांतला चण्डमहासेन राज्य करीत होता. त्याला गोपालक आणि पालक असे दोन पुत्र आणि वासवदत्ता या नांवाची एक कन्या मिळून तीन अपत्यें होतीं. गोपालक हा उदयनापेक्षां दोन तीन वर्षांनीं लहान होता. काशीराष्ट्रांत ब्रह्मदत्तघराण्यांतला राजा राज्य करीत होता. तो मोठा कपटी असल्यामुळें उदयनाचा त्याच्यावर विशेष राग असे.

शैशुनाग हे मूळचे काशीराष्ट्रांतले होते. त्यांचा मूळपुरुष शिशुनाग हा काशीराज्यांतला सरदार किंवा सेनापति असावा. ख्रिस्तपूर्व ६०० च्या सुमारास त्यानें बार्हद्रथांपासून मगधदेश जिंकून घेतला. हें मगधदेश जिंकण्याचें काम जें त्यानें केलें तें काशीराजाचा अधिकारी या नात्यानें केलें. नवीन जिंकलेल्या मुलखाच्या बंदोबस्तासाठीं तो काशीराजाच्या अनुमतीनें मगधदेशांतच गिरिव्रज येथें राहिला आणि आपला पुत्र काकवर्ण याला त्यानें काशींत आपल्या अधिकाराच्या जागीं ठेवलें. काकवर्ण यानें आपल्या बापाच्या पश्चात् मगधाच्या बंदोबस्ताचें काम आपणाकडे घेण्यांत यश मिळविलें. हा काकवर्ण काशीराजाचा सुभेदार या नात्यानें न वागतां स्वतंत्र राजासारखा वागूं लागला आणि त्यामुळें काशीचे राजे आणि शैशुनाग यांच्यांत युद्धें सुरू झालीं. कोसलचे इक्ष्वाकु आणि कौशांबीचे पौरव हे काशीराजांचे जुने शत्रु होते. त्यांनींहि काशीराजांवर शस्त्र धरून काशीराज्य खच्ची करण्याला हीच संधि साधली. त्यामुळें काशीराजे व काशीराज्य यांना उतरती कळा लागली आणि शैशुनाग हे मगधाचे स्वतंत्र राजे बनून दिवसेंदिवस बळावत चालले.

काकवर्ण याचा कोणीं अज्ञात मनुष्यानें खून केला. त्याच्या मागून

त्याचा पुत्र क्षेमधर्मा ऊर्फ प्रसेनजित् हा मगधाचा राजा झाला. हा क्षेमधर्मा अवंतीच्या पुलिक प्रद्योताचा जांवई होता. असुरांविरुद्ध झालेल्या उठावणींत हा क्षेमधर्मा, कोसलचा रणंजय आणि अवंति येथील पुलिक प्रद्योताच्या वतीनें त्याचा पुत्र युवराज जयसेन हे सामील झालेले होते. असुरांबरोबर झालेल्या युद्धांत वसुदान पौरव मारला गेला. परंतु ही मंडळी विजयश्री संपादून परत आली. परत आल्यानंतर आपण सार्वभौम व्हावें असें प्रत्येकाला वाटूं लागलें आणि त्या धोरणानें प्रत्येकाच्या उद्योगाला सुरवात झाली.

क्षत्रौजा ऊर्फ महापद्म हा क्षेमधर्म्याचा पुत्र होय. त्यानें बापाच्या वेळेपेक्षांहि मगधराज्याचें सामर्थ्य आणि ऐश्वर्य वाढविलें. अवंतीच्या पुलिक प्रद्योताप्रमाणेंच क्षत्रौजानें प्रद्योत हें बिरुद धारण केलेलें होतें. तो पुलिक प्रद्योताचा नातू, म्हणजे मुलीचा मुलगा होता. मातामहाचें बिरुद त्यानें धारण केल्यामुळें आणि तो मगधाचा राजा असल्यामुळें पुढील काळांतील कित्येक मंडळीचा गैरसमज झाला. तो असा कीं, बार्हद्रथांनंतर प्रद्योतघराणें मगधावर राज्य करीत होतें व शैशुनागांनीं त्या घराण्यापासून मगधराज्य काबीज केलें !

क्षत्रौजाचा पुत्र बिंबिसार याचीं सिंहवर्मा, श्रेणिक आणि दर्शक अशीं दुसरीं नांवें होतीं.

चंडमहासेन हा अवंति येथील प्रद्योतघराण्यांतला तिसरा पुरुष व दुसरा राजा होय. त्याच्या आजाचें नांव पुलिक किंवा पुरिक असें होतें. पुलिक हा प्रथम अवंतीमधील वीतिहोत्र घराण्यांतील राजाचा सेनापती होता. तथापि त्याचे विचार हे, लष्करी डावपेंच लष्करी हालचाली आणि युद्ध एवढ्यांपुरतेच मर्यादित झालेले नव्हते.

त्याला मुत्सद्याचें डोकें होतें. तो धूर्त होता, महत्त्वाकांक्षी होता आणि साहसी होता. अवंतिराजाचें सर्व सैन्य त्याच्या ताब्यांत असल्यामुळें त्याला आपली महत्त्वाकांक्षा सिद्धीस नेतां आली. संधी साधून अवंतीच्या राजाचा त्यानें वध केला आणि अवंतीचा राजमुकुट स्वतःच्या मस्तकावर ठेवला. पूर्वीच्या राजघराण्याचें 'वीतिहोत्र' हें ज्या धर्तीचें बिरुद होतें, त्याच धर्तीचें त्यानें 'प्रद्योत' हें बिरुद धारण केलें. त्यानंतर त्यानें पश्चिमेकडे आपलें राज्य वाढविण्यास सुरवात केली. पश्चिमेकडे त्यानें साबरमती नदीपर्यंत आपल्या राज्याचा विस्तार केला. नर्मदा ऊर्फ रेवा ही त्याच्या राज्याची दक्षिणसीमा असून महीसागर (खंबायतचें आखात) व साबरमती ही पश्चिमसीमा होती. त्यानें जिंकलेल्या मुलखांत मही ही मुख्य नदी होती; आणि भरुकच्छ (भडोच) हें बंदर होतें. पश्चिमेकडील अनेक सत्ताधारी त्याचे मांडलिक बनले होते. त्यामुळें पुलिक प्रद्योत हा आपणाला महेंद्र आणि राजाधिराज असें म्हणवूं लागला.

पुलिक प्रद्योत म्हातारा होऊन मरण पावला. त्याच्या म्हातारपणांत त्याचा पुत्र जयसेन हाच सर्व राज्यकारभार पहात होता. परंतु जयसेन हा आपल्या पित्याच्या हयातींतच कालवश झाल्यामुळें जयसेनपुत्र महासेन हा पुलिक प्रद्योताच्या मागून अवंतीचा राजा झाला. महासेन हा चंडिकादेवीचा भक्त होता. म्हणून लोक त्याला चंडमहासेन असें म्हणूं लागले. चंडिकादेवीला प्राचीनकाळीं मदिरादेवी असेंहि म्हणत असत. चंडिकाभक्त चंडमहासेनानें पन्नास वर्षे राज्य केलें.

असुरांविरुद्ध झालेल्या उठावणींतून जे असुर वांचले, त्यांच्यावर पुढें लपून छपून दिवस काढण्याची पाळी येणें हें स्वाभाविक होतें.

ते गुहा, अडचणीच्या जागा अशा ठिकाणांतून राहूं लागले आणि निर्वाहासाठीं त्यांनीं दरोडेखोरांची निशाचरी वृत्ति स्वीकारली. तरुण चंडमहासेनानें अशा असुरांपैकीं अंगारक नामक एका असुराचें निवासस्थान हुडकून काढलें आणि लोकांना उपद्रव देणाऱ्या अंगारकाला ठार मारलें. अंगारकाला शिवा ऊर्फ अंगारवती नांवाची एक सुंदर कन्या होती. तिला उज्जयिनीस नेऊन चंडमहासेनानें तिच्याशीं विवाह केला. अवंतीची महाराणी झालेली ही असुरकन्या शिवादेवीच गोपालक, पालक आणि वासवदत्ता यांची माता होय.

चंडमहासेनाच्या मुख्य अमात्याचें नांव भरतरोहक असें होतें. पिशुन नांवाचा एक राजनीतीनिपुण आचार्य चण्डमहासेनाच्या पदरीं होता. तो राजपुत्रांना नीतिशास्त्र शिकवीत असे. राजपुत्र गोपालकाचें मन अर्थशास्त्रांत रमत असे. राजपुत्र पालकाला संगीताचा तिट्कारा असून मल्लविद्येचा छंद होता. राजकन्या वासवदत्ता ही आपल्या आईप्रमाणें सुंदर असून तिला ललित विषयांची आवड होती.

वत्सराज उदयनाच्या कारकीर्दीच्या आरंभीं त्याचे जे शेजारी राजे होते त्यांत अवंतीचा चंडमहासेन हाच फार प्रबळ असा राजा होता. तो भारतचक्रवर्ति नसला तरी भारतवर्षाच्या पश्चिम भागांत तो चक्रवर्तीच होता. त्याचें सैन्य अफाट होतें. त्यांत पश्चिमेकडील अनेक देशांतील लढवय्यांचा भरणा होता. त्याच्या आधिराज्यानें पश्चिमेकडे पश्चिमसमुद्र गांठलाच होता. आपल्या आधिराज्याची पूर्वसीमा पूर्व-समुद्राला नेऊन भिडविण्याची त्याची इच्छा होती. त्यासाठीं कौशांबीच्या पौरवांना आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचे प्रयत्न त्यानें चालविले होते. पण अजुनपर्यंत तरी त्याचे ते प्रयत्न सफळ झालेले नव्हते.

# ४—चंडमहासेनाचें कारस्थान

उदयनाचें राज्यारोहण झालें त्यावेळीं अवंतीच्या चंडमहासेनाचें वय सुमारें पंचेचाळीस ते अठ्ठेचाळीस वर्षांचें असावें. त्याची कारकीर्द सुरू झाल्याला सुमारें चोवीस वर्षे लोटलेलीं होतीं.

उदयनानें आपल्या राज्यारोहणप्रसंगीं यौगंधरायणाला पौरव-राज्याच्या मुख्य प्रधानाचीं वस्त्रें दिलीं आणि रुमण्वानाला पौरवसैन्याचा सरसेनापति केलें. शतानीकाच्या वेळचा मुख्य प्रधान युगंधर आणि सरसेनापति सुप्रतीक हे उदयनाच्या राज्यारोहणप्रसंगीं सेवानिवृत्त झाले.

पौरवराज्याचा कारभार सर्व तरुण मंडळीच्या हातीं आलेला आहे असें पाहून चंडमहासेनानें पौरवराज्यावर आपलें वर्चस्व स्थापन करण्याच्या उद्योगाला पुन्हां नेटानें आरंभ केला. या उद्योगांत असतांना पौरवराज्यावर त्यानें एक स्वारीदेखील केली. परंतु ती यशस्वी झाली नाहीं. या स्वारीला तोंड देतांना यौगंधरायणाला जे अनुभव आले त्यांवरून चंडमहासेनाच्या सैन्याविषयीं त्याचें असें मत झालें कीं तें सैन्य ऐदी आहे; त्याच्यांत कर्तव्यनिष्ठा नाहीं; आणि जे कांहीं खरेखुरे लढवय्ये लोक त्यांत आहेत त्यांच्या ठिकाणीं स्वामिभक्तीचा अभाव आहे. चंडमहासेनाच्या विचारांनाहि या स्वारीमुळें थोडी वेगळी दिशा लागली. युद्धामध्यें तो आणि उदयन हे समोरासमोर आलेले असतांना उदयनाचें तरुण वय आणि पराक्रम अवलोकन करून उदयनाविषयीं त्याचें अनुकूल मत झालें. आपण एका उपवर मुलीचा पिता असल्याची त्याला जाणीव झाली आणि आपणापुढें शत्रु म्हणून उभा असलेला हा तरुण राजबिंडा जर

जांवई म्हणून आपलासा करतां आला तर किती चांगलें होईल असें त्याच्या मनांत आलें.

ज्याला मुलगी द्यावयाची, त्याच्याकडून मुलीला प्रथम मागणी येणें निदान त्या काळांत तरी अवश्य होतें. पण प्रद्योत आणि पौरव यांच्यांत युद्ध चालू असतांना पौरवांकडून प्रद्योतांच्या मुलीला मागणी कशी येणार ? युद्ध चंडमहासेनानें सुरू केलेलें होतें. परंतु तो राजाधिराज असल्यामुळें त्यानें तहाची भाषा काढणें हें त्याच्या इभ्रतीला कमीपणा आणणारें होतें; आणि पौरव हे जोंपर्यंत युद्धांत पराभूत झालेले नव्हते तोंपर्यंत त्यांच्याकडूनहि तहाची याचना होणें शक्य नव्हतें. या परिस्थितींतून वाट कशी काढावी याचा चंडमहासेन विचार करूं लागला.

चंडमहासेन मोठें सैन्य घेऊन पुन्हा पौरवराज्यावर स्वारी करील असें यौगंधरायण आणि रुमण्वान् यांना वाटत होतें. परंतु बरेच दिवस लोटले तरी चंडमहासेनाची स्वारी पौरवराज्यावर झाली नाहीं. चंडमहासेन हा मोठा कारस्थानी पुरुष आहे, तो स्वस्थ बसणारा नव्हे, हें यौगंधरायण जाणून होता. त्याच्या हालचालींचा सुगावा काढण्यासाठीं त्यानें हेरांची योजना केली. पण हेरांच्या द्वारेंदेखील त्याला धड सुगावा लागेना.

अशा स्थितींत चंडमहासेनाकडून एके दिवशीं पौरवांच्या दरबारीं एक दूत आला. त्यानें अवंतीच्या राजाधिराजांचा म्हणून वत्सराजाला असा निरोप सांगितला कीं " वत्सराज हे गांधर्वविद्यानिपुण असल्याचें आम्हीं ऐकतों. अवंतिराजकन्या वासवदत्ता हिला ती विद्या शिकण्याची इच्छा आहे. तरी त्या विद्येंत निपुण असलेल्या वत्सराजांनीं राजकन्येला

ती विद्या शिकविण्याचें पतकरल्यास आम्हांला संतोष होईल."

हा निरोप ऐकतांच उदयन रागानें लाल झाला. उज्जयिनीचा राजा मला आपल्या मांडलिकांपैकींच एक समजतो असें त्याला वाटलें. दूताला त्यानें सांगितलें कीं "अवंतिराजकन्येला गांधर्वविद्या शिकण्याची इच्छा असल्यास पाहिजे तर तिनेंच इकडे यावें असें तुमच्या राजाला माझें उत्तर कळवा."

आपण केवळ बचावाचेंच धोरण स्वीकारून राहिल्यामुळें प्रद्योत चढेलपणानें वागूं लागले असें उदयनाच्या मनानें घेतलें. बचावाचें धोरण सोडून आपणदेखील चढाईचेंच धोरण स्वीकारावयाचें असें त्यानें ठरविलें.

चढाईच्याच पोटीं आपला बचाव असतो हें खरें, पण चढाई करावयाला जवळ सैन्यबळ भरपूर असावें लागतें. सैन्यासाठीं लागणारे घोडे त्यावेळीं व्यापारी लोक सिंधुनदाच्या कांठचे देश व सिंधुनदाच्या पलीकडील देश यांतून आर्यावर्तांत आणीत असत. संस्कृत भाषेमध्यें घोडा या अर्थाचे जे शब्द आहेत त्यांतले बरेचसे शब्द देशवाचक आहेत. उदाहरणार्थ, अर्वन् म्हणजे आरबी घोडा, तुरग म्हणजे तुराणी घोडा, वाजिन् म्हणजे बाजिस्तानकडील घोडा, हय म्हणजे सीस्तानकडील घोडा, आणि वनायुज म्हणजे बन्नूकडील घोडा. हल्लींच्या अफगाणिस्तानांत त्यावेळीं उत्तर, पूर्व आणि पश्चिम या दिशांकडील व्यापारीमार्ग परस्परांना मिळत होते. तेथेंच भिन्न भिन्न देशांतले व्यापारी आपल्या देशांतील माल दुसऱ्या देशांतील व्यापाऱ्यांना देऊन त्यांच्यापासून त्यांच्या देशांतला आपणाला हवा असलेला माल घेत. भारतवर्षांतील व्यापारी तिकडे सुती वस्त्रें, मसाले, मोतीं,

हिरे, साखर, हत्ती वगैरे नेत व तिकडून सुका मेवा, नाना प्रकारचे धातु, सुगंधी द्रव्यें, माणकें, प्रवाळ, रेशमी कापड, लोकरीचीं वस्त्रें आणि घोडे वगैरे इकडे आणीत. घोड्यांना त्यावेळीं इकडे चांगली मागणी होती. परंतु उदयनाला अश्वदळ वाढविण्याच्या बाबतींत चंडमहासेनाशीं स्पर्धा करतां येण्यासारखी नव्हती. चंडमहासेनाचें आधिराज्य पश्चिमेकडे असल्यामुळें घोड्यांच्या देशांतून इकडे येणारे घोडे चंडमहासेनालाच आधीं निवड करून घेतां येण्यासारखे होते. त्याला नको असलेले असे, म्हणजे अर्थातच कमी प्रतीचे घोडे उदयनाला मिळण्यासारखे होते. म्हणून अश्वदळावर भर न देतां आपल्या आजाप्रमाणेंच गजदळावर भर देण्याचें उदयनानें ठरविलें आणि गजदळाच्या जोरावर चंडमहासेनाला जिंकण्याचा त्यानें निश्चय केला. चंडमहासेनापाशीं नलागिरि नांवाचा एक मोठा बळकट हत्ती होता. पण तो अशिक्षित होता. आपल्या गजदळांतील हत्तींना योग्य शिक्षण देण्याचें उदयनानें ठरविलें होतें.

नागवनांतून हत्ती धरून आणण्याचें काम उदयनानें दुसऱ्यांवर न सोंपवितां स्वतःच्याच हातीं घेतलें. “ महाराजांनीं स्वतः हत्ती पकडण्यासाठीं जाणें धोक्याचें आहे, हत्ती पकडण्याच्या कामीं कुशल असे लोक आपल्यापाशीं कांहीं थोडे नाहींत, त्यांच्यावर हें काम सोंपवावें.” असें यौगंधरायण अमात्यानें त्याला आपणाकडून पुष्कळ सांगितलें. पण उदयनानें तें ऐकलें नाहीं. आपल्या वीणावादनकौशल्यावर त्याचा विश्वास होता; आणि वीणावादनाच्या योगानें आपण पाहिजे तितके रानहत्ती सहज वश करूं अशी त्याला उमेद होती.

बरोबर मोठें सैन्य घेतल्यास आपल्या आगमनाचा हत्तींना सुगावा

लागेल व ते रान सोडून दूर निघून जातील म्हणून उदयनानें आपणाबरोबर बेताचेच सैनिक घेतले. हत्तींचीं निवासस्थानें हेरण्यासाठीं आणि वश केलेल्या हत्तींना ताब्यांत घेण्यासाठीं मात्र त्यानें पुरेसे लोक आपणाबरोबर घेतले होते. आपली घोषवती वीणा त्यानें आपणाबरोबर घेतली, सुंदरपाटल नांवाचा आपला आवडता घोडा बरोबर घेतला आणि नीलबलाहक नांवाच्या हत्तीवर आरूढ होऊन तो नागवनांकडे निघाला. राज्याचा सर्व कारभार त्यानें यौगंधरायणावर सोंपविला होता.

त्याच्या वीणावादनानें रानहत्ती खरोखरच मोहित होऊं लागले ! आणि त्याच्याबरोबरचे लोक त्या मोहित झालेल्या हत्तींना ताब्यांत घेऊं लागले. हातीं घेतलेल्या उद्योगांत यश येऊं लागलेलें दिसतांच अधिकाधिक हत्तींना वश करण्याचा हव्यास सुटून वत्सराज उदयन दूर दूर जाऊं लागला.

उदयनाच्या हालचालींवर चंडमहासेनानें हेर ठेवलेले होते. त्यांनीं चंडमहासेनाला कळविलें कीं वीणाविहारी वत्सराज अलीकडे गजवशीकरणाच्या उद्योगांत असून आपल्या राजधानीपासून दूर दूर जात आहे. त्याच्या सांप्रतच्या रोंखावरून थोड्याच दिवसांत तो दक्षिणेकडील विंध्यारण्यांत प्रवेश करील असें दिसतें.

“ वत्सदेशाचा हा रूपधारी, तरुण, आणि राजकुलीन वीणाचार्य आपण होऊनच आमच्याकडे चालत येतो आहे ! ” चंडमहासेन मनांत म्हणाला; “ विंध्यारण्यांत हा आलेला असतांना याला जर आम्हीं पकडूं शकलों तर काय मौज होईल ! स्वतःला अगदीं निर्धास्त समजून रानावनांतून वीणावादन करीत फिरणाऱ्या या धाडशी पोराला पण खाशी अद्दल घडेल ! याचा आजा असाच धाडशी होता ! ”

चंडमहासेनाच्या पदरीं असलेला पिशुन आचार्य असें म्हणत असे कीं अमात्यांनीं राजाचीं कामें राजाच्या कल्पनेहूनहि अधिक सरसपणें करून दाखविलीं पाहिजेत. चंडमहासेनाचा अमात्य भरतरोहक हा अशा प्रकारचा अमात्य होता.

त्या वेळीं सिंधुनदाच्या पश्चिमेस असलेल्या हखामणीसाम्राज्यांत देशोदेशींचे शस्त्रजीवी लोक सैनिक म्हणून भरले होते. हखामणी सम्राटांच्या पदरीं पूर्वेकडील भारतीय सैनिक होते तसे पश्चिमेकडील ग्रीक अथवा यवन सैनिकहि होते. सिंधुनदाच्या पश्चिमेकडील मुलखांत यवन लोक वस्तीदेखील करूं लागलेले होते. या यवनांतले कांहीं लोक भारतवर्षांत येऊन चण्डमहासेनाच्या पदरीं राहिलेले असावेत, आणि भरतरोहकानें त्यांच्याकडून ट्रोजनयुद्धाची कथा ऐकलेली असावी असें वाटतें. कारण विंध्यारण्यांत वत्सराज आलाच तर त्याला पकडण्यासाठीं काय युक्ति योजावी असें चंडमहासेनानें भरतरोहकाला एकांतांत विचारलें असतां भरतरोहकानें त्याला जी युक्ति सुचविली ती ट्रोजनयुद्धांत योजिल्या गेलेल्या एका युक्तीशीं सदृश अशी होती.

ट्रोजनयुद्ध हें आशिया मायनरच्या वायव्य कोपऱ्यांत एका काळीं राहत असलेले ट्रोजन लोक आणि ग्रीसमधील ग्रीक लोक यांजमध्यें झालेलें युद्ध होतें. त्या युद्धांत ग्रीकांनीं ट्रोजन लोकांना जिंकण्यासाठीं लांकडांचा एक प्रचंड घोडा तयार केला व त्याच्या पोटांत सशस्त्र सैनिक लपवून ठेवले अशी कथा आहे. भरतरोहकानें चंडमहासेनाला सुचविलेली युक्ति या युक्तीसारखीच होती. ती अशी कीं लांकडांचा खरोखरीच्या हत्तीएवढा एक हत्ती तयार करावा, दुरून तो खरोखरीच्या हत्तीसारखाच दिसेल असा त्याला रंग द्यावा, त्याच्या पोटांत सशस्त्र

सैनिकांना बसतां येईल अशी सोय करावी आणि तो हत्ती विंध्यारण्यांतील नागवनामध्यें सोयीस्कर अशा एखाद्या दाट झाडींत नेऊन ठेवावा. वत्सराज त्या हत्तीला वीणावादनाच्या योगानें वश करण्यासाठीं हटकून येईल अशी तजवीज करावी आणि हत्तीजवळ येऊन तो वीणावादन करीत असतांना हत्तीच्या पोटांतील सशस्त्र सैनिकांनीं चटकन् बाहेर पडून त्यालाधरावें.

चंडमहासेनाला ही युक्ति पसंत पडली. युक्ति यशस्वी होण्यासाठीं तींत कोण कोणत्या सुधारणा कराव्या लागतील याचा त्या दोघांनीं नंतर विचार केला.

भारतवर्षामध्यें घोडा हा बाहेरून आलेला प्राणी आहे. पण भारतवर्षांतला हत्ती हा भारतमातेचाच पुत्र आहे. भारतवर्षांतील पुष्कळ ठिकाणच्या जंगलांतून हत्तींची पूर्वीं वस्ती असे. जंगलांतील हत्तींना पकडून त्यांच्याकडून शक्तीचीं कामें करून घेण्याला भारतीय लोकांनीं प्राचीनकाळींच सुरवात केलेली होती. हत्तींचा युद्धामध्यें विशेष उपयोग होत असे; व त्यामुळें भारतीय राजे आपल्या पदरीं पुष्कळ हत्ती बाळगीत; आणि त्यांना युद्धाचें शिक्षण देऊन तरबेज करीत. आग लावणें, आग विझवणें, तट, बुरुज व वेशी यांचा भंग करणें, शत्रुसैन्याची फळी फोडणें, सोंडेंत पट्टा घेऊन शत्रूंची कत्तल उडविणें वगैरे अनेक कामें हत्तींकडून करविलीं जात. उपयुक्ततेच्या दृष्टीनें हत्तींच्या प्रतीहि लावण्यांत आलेल्या होत्या. कलिंग ( गंजम, विजगापट्टण आणि गोदावरी हे जिल्हे ), अंग व त्याच्या पूर्वेकडील देश ( पूर्व बंगाल आणि आसाम ), चेदि आणि करुष ( बुंदेलखंड व वाघेलखंड ) येथील हत्ती उत्तम प्रतीचे गणले जात. दशार्ण आणि अपरांत ( पूर्व माळवा व उत्तर कोंकण ) या ठिकाणचे हत्ती मध्यम

प्रतीचे मानण्यांत येत. सुराष्ट्र ( काठेवाड ) आणि पंजाब येथील हत्ती कनिष्ठ प्रतीचे होत असें समजलें जाई. हत्तींचे निरनिराळे प्रकार, त्यांचा रंग व इतर लक्षणें यांची चर्चा करणारे आणि हत्तींना योग्य शिक्षण देऊन त्यांची उपयुक्तता कशी वाढवावी हें सांगणारे ग्रंथ निर्माण झालेले होते. चंडमहासेन आणि त्याचा अमात्य भरतरोहक यांनीं आपली युक्ति यशस्वी व्हावी म्हणून या ग्रंथांतील माहितीचा उपयोग करून घेण्याचा बेत केला.

हस्तिशिक्षा नांवाच्या ग्रंथांत चक्रवर्ति हत्ती नामक एका दुर्मीळ हत्तीचीं लक्षणें सांगितलेलीं होतीं. आपला कृत्रिम हत्ती त्या लक्षणांनीं युक्त असाच बनवावयाचा असें चंडमहासेन व भरतरोहक यांनीं ठरविलें.

चंडमहासेनाच्या सेनापतीचें नांव शालंकायन असें होतें. वत्सराज उदयनाला पकडून आणण्याचें काम शालंकायनावर सोंपविण्यांत आलें. त्याला कृत्रिम हत्तीची युक्ति समजावून देण्यांत आली व वत्सराजाला पकडून आणण्याचें काम बिनबोभाट पार पडलें पाहिजे असें पुन्हा पुन्हा बजावून सांगण्यांत आलें.

## ५—उदयनाला पकडलें !

उदयन दशार्णदेशाला लागून असलेल्या विंध्यारण्यांत शिरला आणि त्या अरण्याच्या दक्षिणसीमेजवळ जाऊन पोंचला. तेथें एके दिवशीं तो आपल्या लोकांसह हत्ती टेहळीत चाललेला असतांना त्याला कांहीं अंतरावर हत्तींचा एक कळप दिसला. हा कळप सगळाच्या सगळा धरतां येईल कीं नाहीं या विषयीं उदयन आपल्या लोकांजवळ बोलत उभा असतां तेथें जंगली भिल्लासारखा दिसणारा

एक मनुष्य आला. त्यानें उदयनाला सांगितलें कीं, "येथून सुमारें एक कोस अंतरावर एक सालवन असून त्यांत आज एक नवाच हत्ती आलेला मला दिसला. एवढा मोठा आणि इतका देखणा हत्ती आजवर मीं कधींच पाहिलेला नव्हता. नखें आणखीं दांत खेरीजकरून त्याचें शरीर एक जात निळ्या रंगाचें आहे! या समोरच्या कळपांतील हत्तींच्यासारखें काळें नाहीं!"

"काय म्हणतोस?" उदयनानें विचारलें, "त्याचें शरीर एक जात निळ्या रंगाचें आहे?"

"होय देवा! निळ्या रंगाचें आहे!" त्या मनुष्यानें उत्तर दिलें.

"हस्तिशिक्षा नांवाच्या ग्रंथांत चक्रवर्ति हत्ती म्हणून जो सांगितला आहे तो हाच!" उदयन मनांत म्हणाला, "हा दुर्मीळ हत्ती कसेंहि करून आपण हस्तगत केलाच पाहिजे. हा आपण हस्तगत करून घेतला म्हणजे आपले युधिष्ठिरादि पूर्वज ज्या चक्रवर्तिपदाचा उपभोग घेत होते तें चक्रवर्तिपद याच्या मागोमाग आपल्याकडे चालत येईल!"

"तुम्हीं येथेंच रहा आणि या कळपावर नजर ठेवा!" उदयनानें आपल्या लोकांना सांगितलें, "मी सालवनांतील त्या निळ्या हत्तीला वश करून आणतों. सुंदरपाटलाला सांभाळण्यासाठीं एकटा हंसक तेवढा माझ्याबरोबर येऊं दे."

"महाराजांनीं सालवनांत एकटेंच जाऊं नये. आम्ही सगळेच महाराजांबरोबर सालवनाकडे येतों." सैनिकांचा नायक हात जोडून उदयनाला विनंति करता झाला.

"तुम्ही सगळे माझ्याबरोबर आलांत तर तो हत्ती पळून जाण्याचाच संभव अधिक." उदयन म्हणाला; "तो चक्रवर्ति हत्ती आहे. त्याला पळून

जाऊं देतां कामा नये. त्याला वश करणेंच अवश्य आहे. वीणारवाला लुब्ध होऊन माझ्या मागोमाग तो येथपर्यंत चालत येईल असें मी करीन! तुम्हीं माझ्याबरोबर न येतां येथेंच रहावें अशी माझी तुम्हांला आज्ञा आहे."

उदयन सुंदरपाटल घोड्यावर स्वार झाला. घोषवती वीणा त्यानें आपणाबरोबर घेतली. त्याच्यापाशीं त्यावेळीं हत्यार म्हटलें म्हणजे एक तलवार होती. ती त्याच्या कमरपट्ट्याला लटकत होती.

"पुलिंदा!" निळ्या हत्तीची बातमी सांगणाऱ्या मनुष्याला उदयन म्हणाला, "चल, दाखीव आम्हांला कोठें आहे तो सालवनांतील निळा हत्ती."

"असें इकडून, इकडून यावें देवांनीं." तो मनुष्य म्हणाला, आणि चालूं लागला. त्याच्या मागून उदयन चालला आणि उदयनाच्या मागून हंसक चालूं लागला.

ते तिघे सालवनापाशीं जाऊन पोंचले त्यावेळीं सायंकाळची वेळ झालेली होती. वाटाड्यानें चोर पावलांनीं पुढें जाऊन एकदां येथें, एकदां तेथें, असें निरखून पाहिलें. तो चोर पावलांनींच मागें आला आणि उदयनाला हलकेच म्हणाला, "देव, त्या तिथें ती वेलींची दाटी झालेली दिसते आहे ना, तिथें तो हत्ती आहे!"


उदयन घोड्यावरून खालीं उतरला. घोषवती वीणा त्यानें हातांत घेतली. घोडा सांभाळण्यासाठीं हंसकाला मागें ठेवून वाटाड्याबरोबर तो एकटाच निघाला. वाटाड्यानें सालवनांतील एका मोठ्या वृक्षापाशीं त्याला नेलें.

"देव, निळा हत्ती तो पहा त्या तिथें उभा आहे." असें म्हणून वाटाड्यानें एका बाजूकडे बोट दाखविलें.

उदयनानें पाहिलें. सुमारें अडीचशें पावलांच्या अंतरावर तो हत्ती असावा असें त्याला वाटलें. हत्ती सावटांत असल्यामुळें आणि वेळ संध्याकाळची असल्यामुळें त्या हत्तीचा रंग व आकृति हीं स्पष्ट दिसत नव्हतीं. तथापि दुरून त्याचे सुळे स्पष्ट दिसत होते.

उदयनानें वाटाड्याला वृक्षापाशींच रहावयाला सांगितलें आणि आपण वीणा वाजवीत वाजवीत त्या हत्तीजवळ जाऊं लागला. वीणा वाजवीत एकेक पाऊल पुढें टाकीत असतांना त्यानें गावयाला देखील सुरवात केली.

उदयन वीणावादन आणि गायन करीत त्या हत्तीकडे जात असतां वाटाड्यानें आपली जागा सोडली आणि वृक्षांच्या आश्रयानें लपत छपत तो कोणीकडेसा निघून गेला !



उदयन त्या हत्तीच्या जवळ जाऊन पोंचण्यापूर्वीच त्या हत्तीची कूस एखादें दार उघडावें तशी एकाएकीं उघडली आणि आंतून नागव्या तलवारी हातांत घेतलेले लोक पटापट उड्या मारून बाहेर आले !

ते सर्व उदयनावर धांवले. त्यांना येतांना पाहून उदयन मनांत समजला कीं हें सगळें शत्रूचें कपट आहे. त्यानें हातांतली वीणा खालीं ठेवली आणि कमरेला लटकत असलेली तलवार मेणांतून सर्कन् बाहेर काढली.

" वत्सराज ! " उदयनावर धांवून आलेल्या लोकांपैकीं एक जण म्हणाला, " आपण शूर आहांत, परंतु आपल्या शौर्याचा येथें कांहीं उपयोग नाहीं ! शौर्य गाजविण्याच्या व्यर्थ भरीस न पडतां निमूटपणें शरण येण्यांतच शहाणपणा आहे ! "

" पौरव कधीं कोणाला शरण जात नसतात ! " उदयन म्हणाला, " पौरवांना अनेकवार पाठ दाखवून पळालेल्या प्रद्योताचें हें सर्व कपट आहे हें मी जाणतों, आणि हें सरळ कसें करावें हें पण मला ठाऊक आहे ! "

असें म्हणून शत्रूंवर तो तुटून पडला. परंतु शत्रूंची संख्या अधिक असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. शत्रूंतील कांहीं जण समोर त्याच्याशीं लढत राहिले आणि कांहींनीं त्याच्या पाठीमागें जाऊन पाठीमागून त्याला धरलें ! त्याच्या हातांतील तलवार काढून घेण्यांत आली आणि वेलींनीं त्याचे हातपाय बांधण्यांत आले ! अशा रीतीनें उदयनाला पकडणारे हे लोक म्हणजे अर्थातच चंडमहासेनाचा सेनापति शालंकायन याचे सैनिक होते.

शालंकायन सालवनाच्या जवळच येऊन राहिलेला होता. तें सालवन अवंतिराज्याच्या सीमेपासून दूर नव्हतें. हेरांकडून मिळणाऱ्या बातम्यांवरून वत्सराज उदयन हा त्या सालवनाच्या आसपास कोठें ना कोठें तरी येईलच असा तर्क करून शालंकायनानें आपल्याबरोबरचें बहुतेक सैन्य सीमेपाशींच ठेवलें आणि शेलके शेलके असे सुमारें शंभर

सैनिक, कित्येक कामकरी व तीन चार कसबी सुतार यांच्यासह सालवनाजवळच्या एका वृक्षपरिवेष्टित जागेंत येऊन तळ दिला. सालवनाच्या जवळपास मनुष्यवस्ती नव्हती हें शालंकायनाच्या पथ्यावरच पडलें. चंडमहासेनाच्या सूचनेप्रमाणें सुतारांकडून त्यानें खरोखरीच्या हत्तीएवढा एक लांकडी हत्ती तयार करविला. तो हत्ती आंत पोकळ होता. त्याच्या पोटांत बसून बाहेर काय चाललें आहे हें पहातां यावें अशी व्यवस्था केलेली होती. आपल्या सैनिकांतून शालंकायनानें अत्यंत चपळ आणि खड्गयुद्धांत प्रवीण असे कांहीं लोक निवडून काढले आणि त्यांच्याकडून हत्तीच्या पोटांत बसणें, हत्तीच्या पोटांत बसून बाहेरील मनुष्याच्या हालचाली हेरणें, पटापट उड्या मारून बाहेर पडणें व बाहेरील मनुष्यावर धांवून जाऊन त्याला पकडणें या कार्यक्रमाची अनेकवार तालीम करविली. या तालमेमध्यें त्यानें स्वतः कित्येक वेळां पकडल्या जाणाऱ्या उदयनाची भूमिका घेतली आणि पकडावयास येणाऱ्या सैनिकांबरोबर युद्ध केलें. असें करण्यांत त्याचा हेतु इतकाच होता कीं उदयनाला पकडण्याच्या वेळीं आपल्या लोकांकडून कोणत्याहि प्रकारची चूक होऊं नये. आपले लोक चांगले तरबेज झालेले आहेत अशी खात्री होतांच लांकडाचा तो कृत्रिम हत्ती सालवनामध्यें त्यानें एका गर्द छायेच्या ठिकाणीं नेऊन उभा केला. तो हत्ती दुर्मीळ असणाऱ्या चक्रवर्ति हत्तीसारखा दिसावा म्हणून त्याला निळा रंग देण्यांत आला. त्या सालवनांतहि उदयनाला पकडण्याच्या एकंदर कार्यक्रमाची चार पांच वेळां तालीम करण्यांत आली. इतकें करून शालंकायन हा वत्सराज इकडे कधीं येतो याची वाट पहात राहिलेला होता.

वत्सराज सालवनापासून तीन चार कोसांच्या अंतरावर आलेला आहे असें एके दिवशीं शालंकायनाला कळलें. त्याच्या सैन्यांतहि कित्येक आटविक लोक होतेच. त्यांतील एका हुशार आटविकाला चांगला पढवून आणि वनचर भिल्लाचा वेष देऊन त्यानें उदयनाकडे पाठविलें.

चक्रवर्ति हत्तीच्या लोभानें उदयन सालवनांत बहुतकरून येईल असा शालंकायनाचा तर्क होता, आणि उदयन आलाच तर बरोबर दोन तीन मनुष्यांहून अधिक मनुष्यें तो आणणार नाहीं असेंहि शालंकायनाला वाटत होतें. तो येतो आहे कीं नाहीं हें आधीं कळावें म्हणून शालंकायनानें एका उंच ठिकाणीं तीक्ष्ण दृष्टीचा एक टेहळ्या बसवून ठेवला आणि उदयनाला पकडण्याच्या कामावर नेमलेल्या सैनिकांना सालवनांत कृत्रिम हत्तीपाशीं ठेवलें. आपण उदयनाकडे पाठविलेल्या आटविकाबरोबर उदयन येतो आहे असें दुरून दिसतांच टेहळ्यानें धांवत येऊन प्रथम कृत्रिम हत्तीजवळच्या सैनिकांना हत्तीच्या पोटांत शिरून बसण्याची सूचना द्यावी आणि नंतर तसेंच पुढें येऊन उदयन येत असल्याचें आपणाला कळवावें अशी त्या टेहळ्याला शालंकायनाची आज्ञा होती.

शालंकायनाच्या आज्ञेप्रमाणें सायंकाळच्या सुमारास टेहळ्या शालंकायनाकडे आला व त्यानें वत्सराज येत असल्याचें आणि सैनिक कृत्रिम हत्तीच्या पोटांत शिरून बसल्याचें शालंकायनाला कळविलें. तें ऐकून शालंकायन पुढील कार्यासाठीं तयार होऊन राहिलेला होता.

शालंकायनाच्या आटविक सैनिकानें वत्सराजाला सालवनांत आणून तो कृत्रिम हत्ती त्याला दाखवून दिला आणि नंतर आपण त्या

सालवनांतून हलकेच निसटून तो सैनिक शालंकायनाकडे गेला. शालंकायनाला त्यानें सर्व हकीगत सांगितली. ती ऐकतांच शालंकायन आपल्या लोकांसह मोठ्या त्वरेनें निघाला. उदयनाचा घोडा सांभाळणाऱ्या हंसकाला त्यानें पकडलें आणि सालवनांत प्रवेश केला. कृत्रिम हत्तीच्या पोटांतून बाहेर पडलेल्या लोकांनीं तोंपर्यंत उदयनाला धरून बद्ध केलेलें होतें. शालंकायनानें उदयनाचीं बंधनें ताबडतोब दूर करविलीं, त्याला झालेल्या जखमा बांधल्या आणि त्याला शिबिकेंतून आपल्या शिबिरांत नेलें. तेथें शस्त्रवैद्यांकडून उदयनाच्या जखमांची त्यानें तपासणी करविली, त्यांच्यावर योग्य ते उपचार केले आणि रातोरात विंध्यारण्यांतून आपला तळ हालविला व उज्जयिनीची वाट धरली ! वत्सराजाला पकडल्याची बातमी उज्जयिनीस जाऊन पोंचण्याच्या आधींच चंडमहासेनापुढें वत्सराजाला नेऊन हजर करावयाचें असें त्यानें योजिलें. उदयनाला खेचरांच्या गाडींत घालून आणि स्वतः घोड्यावर स्वार होऊन गाडीबरोबर तो पुढें झाला. हंसकाला त्यानें सोडून दिलें. कारण त्याची आतां त्याला गरज नव्हती.

पकडून आणलेल्या उदयनाला चंडमहासेनानें एका मजबूत इमारतींत बंदोबस्तानें ठेवलें, तथापि त्याच्या जखमांवर त्यानें काळजीपूर्वक उपचार चालविले होते. उदयनाच्या जखमा बऱ्या होतांच चंडमहासेनानें राजकन्या वासवदत्ता उदयनाच्या दृष्टीस पडेल आणि ती कोण हें त्याला कळेल अशी व्यवस्था केली. आपणाला कपटानें पकडल्याबद्दल वत्सराज उदयन चंडमहासेनावर मनांतून खूप संतापलेला होता. परंतु अवंतिराजकन्या दृष्टीस पडतांच त्याच्या संतापाचा जोर ओसरला. त्याच्या मनांत वेगळेच विचार येऊं लागले. " पौरव आणि

प्रद्योत हे वैरभाव सोडून जर परस्परांचे आप्त बनले तर " असें म्हणून तो आपल्या अंतश्चक्षूंपुढें मोहक अशीं अनेक चित्रें उभीं करूं लागला. अशा स्थितींत तो असतांना एके दिवशीं चंडमहासेनाचा वृद्ध कांचुकीय बंधनगृहांत त्याजकडे आला. त्यानें उदयनाला आपल्या स्वामीचा असा निरोप कळविला कीं, " गांधर्वविद्या आपलीशी करावी अशी आमची प्रियकन्या वासवदत्ता हिची फार फार इच्छा आहे. वत्सराज गांधर्वविद्यानिपुण आहेत. त्यांनीं अवंतिराजपुत्रीचा शिष्या म्हणून स्वीकार करून तिला ती विद्या शिकविल्यास तिला तर धन्यता वाटेलच पण वत्सराजांमुळें आपल्या प्रिय कन्येचें प्रिय करतां येणें शक्य झालें म्हणून आम्हांलाहि समाधान वाटेल. शिष्या म्हणून अवंतिराजपुत्रीचा स्वीकार करण्याचें वत्सराज नाकारणार नाहींत अशी आशा आहे."

उदयनानें या प्रसंगीं पूर्वींसारखें रागानें लाल न होतां राजकन्या वासवदत्ता हिला गांधर्वविद्या शिकविण्याचें कबूल केलें.

राजकन्येनें संगीतशाळेंत गांधर्वविद्येचें शिक्षण घ्यावें आणि त्या वेळीं राजकन्येची सखी कांचनमाला हिनें राजकन्येबरोबर संगीतशाळेंत असावें असें चंडमहासेनानें ठरविलें.

अग्नीच्या साक्षीनें राजकन्या वासवदत्ता शिष्या म्हणून वत्सराजाच्या स्वाधीन करण्यांत आली आणि संगीतशाळेंत तिच्या शिक्षणाला सुरवात झाली.

## ६—उदयनाची सुटका

उदयनानें हत्तींच्या कळपावर नजर राखण्यासाठीं मागें ठेवून दिलेले लोक आपले महाराज अजुन परत कसे येत नाहींत म्हणून

चिंता करूं लागले. कळपाला त्यांनीं जाऊं दिलें आणि रात्रीची वेळ झालेली होती तरी त्या जंगलांत त्यांनीं आपल्या राजाचा शोध चालविला. सारी रात्र ते वत्सराज आणि हंसक यांना शोधीत राहिले. परंतु त्यांना त्या दोघांचा पत्ता लागला नाहीं.

शालंकायनानें सोडून दिलेला हंसक दुसऱ्या दिवशीं त्यांना भेटला. त्यानें त्या लोकांना सर्व हकीगत सांगितली. ती ऐकून ते लोक प्रद्योतांना शिव्याशाप देत मोठमोठ्यानें शोक करूं लागले !

" नुसतें शिव्या देऊन आणि शोक करून काय होणार ? " हंसक म्हणाला, " घडलेला हा अनिष्ट प्रकार आधीं आर्य यौगंधरायणांच्या कानावर घातला पाहिजे. मला एक घोडा द्या ! त्यावर बसून मी पुढें होतों ! तुम्हीं सगळे मागाहून कौशांबीस या."

थोड्या वेळानें हंसक एका घोड्यावर स्वार होऊन कौशांबीस जाण्यासाठीं निघाला.

चंडमहासेन कांहीं तरी कपट करून आपल्या महाराजांना पकडण्याच्या उद्योगांत आहे अशी बातमी यौगंधरायणाला हेरांच्या द्वारें समजली. पण ती फार उशीरानें समजली. उदयनाला सावध राहण्याची सूचना लागलीच देण्यासाठीं विंध्यारण्याकडे तो जासूद पाठविणार तोंच विंध्यारण्याकडून उदयनसेवक हंसक आला आणि प्रद्योताच्या लोकांनीं महाराजांना धरून नेल्याची हकीगत त्यानें यौगंधरायणाला सांगितली ! हंसकाच्या मागून कांहीं दिवसांनीं उदयनाबरोबरची इतर मंडळी कौशाम्बीस परत आली. ती मंडळी परत येतांच वत्सेश्वराला प्रद्योतानें धरून नेल्याची बातमी सर्व राजधानींत आणि आजूबाजूलाहि पसरली. लोक क्षुब्ध झाले. सेनापति रुमण्वानाच्या

वाड्यापुढें त्यांची गर्दी होऊं लागली. “ प्रद्योताच्या राजधानीला तुम्हीं अजुन वेढा कां घालीत नाहीं ? सैन्याचा तुटवडा असेल तर आम्हीं सैन्यांत येतों ! ” अशा ते आरोळ्या मारूं लागले. “ आपले महाराज प्रद्योताच्या हातीं सांपडलेले असल्यामुळें प्रद्योताला चिडविणें शहाणपणाचें होणार नाहीं. तो महाराजांना अपाय करील. महाराजांची सुटका करण्याच्याच उद्योगांत आम्हीं आहों. हें काम युक्तीनेंच केलें पाहिजे. ” इत्यादि प्रकारें सांगून रुमण्वान् त्या लोकांना कसेबसे शांत करीत होता.

आपण स्वत: एवढे जागरूक असतां प्रद्योतानें आपणाला चकविलें, आपल्या हेरांनादेखील त्याच्या कारस्थानाचा वेळींच सुगावा लागला नाहीं, म्हणून यौगंधरायणाच्या चित्ताला प्रथम थोडासा खेद वाटला; परंतु खेदाला आपल्या चित्तांत फार वेळ थारा न देतां उदयनाची सुटका करण्याच्या उद्योगाला तो उत्साहानें लागला. राजमाता विष्णुमती हिनें डोळ्यांत पाणी आणून यौगंधरायणाला सांगितलें कीं माझ्या पुत्राचा तूं मित्र आहेस, त्याचा अमात्य आहेस, आणि मलाहि पुत्रासारखाच आहेस. तेव्हां माझ्या पुत्राला पुत्रानेंच सोडवून आणावें. राजमातेच्या या शब्दांनीं यौगंधरायणाचा उत्साह द्विगुणित झाला.

नानाप्रकारच्या धंद्यांत प्रवीण असलेले असे हेर यौगंधरायणानें अवंतिराज्यांत पाठविले. त्यांतील कित्येकांनीं त्या राज्यांतील, निरनिराळ्या खात्यांत नोकऱ्या मिळविण्यांत यश संपादिलें. कोणीं गजदळांत राहिले. कोणी अश्वदळांत राहिले. कोणीं नगररक्षण खात्यांत नोकरी मिळविली. उज्जयिनी येथें मदिरा आणि जुगार यांचें प्रस्थ बरेंच होतें. मदिरालयांत जुगार खेळण्याचीहि व्यवस्था असे.

मद्यपी आणि जुगारी यांच्याकडून बातम्या काढणें सोपें असल्यामुळें कांहींनीं उज्जयिनींत मदिरालयें उघडलीं.

यौगंधरायणाला हेरांकडून वेळोवेळीं ज्या बातम्या मिळाल्या त्यांचा सारांश असा होता कीं चंडमहासेन हा वत्सराजाला वाईट रीतीनें वागवीत नाहीं. वत्सराजाच्या पायांत शृंखला असली तरी लोकांना त्याचें दर्शन दुर्लभ नाहीं. चंडमहासेनाचे नोकर चाकर वत्सराजाला युवराजाप्रमाणें मान देत असतात. वत्सराजाला चंडमहासेनाच्या लोकांनीं पकडलें त्यावेळीं त्याची घोषवती वीणाहि त्यांनीं उचलली आणि ती चंडमहासेनापाशीं नेऊन दिली. चंडमहासेनानें ती वीणा आपली कन्या वासवदत्ता हिला दिली. चंडमहासेनाच्या संगीतशाळेंत त्याच्याच आग्रहावरून वत्सराज हा वासवदत्तेला वीणावादन आणि गायन शिकवीत असतो. अग्निसमक्ष त्यानें वासवदत्तेचा शिष्या म्हणून स्वीकार केलेला आहे.

या बातम्या ऐकून यौगंधरायणाची खात्री झाली कीं चंडमहासेनाच्या मनांतून आपली कन्या वत्सराजाला द्यावयाची असें आहे. त्या दोघांचें परस्परांवर प्रेम जडावें एवढ्याचसाठीं त्यानें आपल्या मुलीला गांधर्वविद्या शिकविण्याचे कामीं वत्सराजाची योजना केलेली आहे. वत्सराज आणि वासवदत्ता यांचें परस्परांवर प्रेम जडलें आहे असें त्याला दिसून आलें म्हणजे आपल्या लाडक्या कन्येचें प्रिय करण्याच्या मिषानें तो आपली कन्या वत्सराजाला देणार आणि नंतर वत्सराजाला आपल्या कन्येसह कौशाम्बीस पाठविणार. म्हणजे वत्सराज उदयनाला त्याचें हक्काचें राज्य चंडमहासेनाचा केवळ प्रसाद म्हणून पुन्हा उपभोगावयाला मिळणार ! चंडमहासेनाचा हा डाव सिद्धीस जाऊं द्यावयाचा नाहीं असा यौगंधरायणानें निश्चय केला.

वत्सराज उदयनाच्या सुटकेसाठीं आपण स्वतःच उज्जयिनीस जावयाचें असें यौगंधरायणानें ठरविलें. पौरवराज्य त्यानें सेनापति रुमण्वानावर सोंपविलें. काशीराज, मगधराज यांनीं गडबड करूं नये म्हणून पूर्वसरहद्दीवर भरपूर सैन्य ठेवण्याविषयीं रुमण्वानास सूचना केली. ज्यांना ज्यांना म्हणून हत्यार वापरतां येतें त्या सर्वांनीं सैन्यांत दाखल व्हावें असें आज्ञापत्र काढलें. या जादा सैन्याचा उपयोग कोणत्या कामीं करून घ्यावयाचा तें रुमण्वानास त्यानें सांगितलें आणि वसंतकास बरोबर घेऊन तो कौशाम्बीहून निघाला. विंध्यारण्यांतील भिल्ल वगैरे जे आटविक लोक पौरवांशीं स्नेहभावानें वागणारे होते त्यांच्या पुढाऱ्यांच्या भेटी यौगंधरायणानें घेतल्या आणि त्यांना आपापल्या सैन्यासह तयार राहण्यास सांगितलें. अवंतिराज्यांत प्रवेश करण्यापूर्वी यौगंधरायण आणि वसंतक यांनीं आपले वेष पालटले.

यौगंधरायण उन्मत्तकाचें, म्हणजे वेड्याचें सोंग घेऊन उज्जयिनींत शिरला आणि तोंडानें कांहीं तरी असंबद्ध असें बडबडत व वेड्यासारखे चाळे करीत रस्त्यांतून फिरूं लागला. तो मध्येंच हंसे मध्येंच रडे, मध्येंच मोठमोठ्या वल्गना करी, आणि सर्वकाल ज्याला कांहीं ताळमेळ नाहीं असें बोलत राही. पोरें त्याच्या पाठीस लागत, त्याला खडे मारीत; पण तो मात्र त्यांना मारीत नसे. हा वेडा कोणाच्या आंगावर येत नाहीं; नुसता बडबडतो, हंसतो, रडतो आणि हिंडतो असें दिसून येतांच लोक त्याच्या वाटेस जाईनासे झाले. यौगंधरायणाला त्यामुळें कोठेंहि बिनहरकत जातां येऊं लागलें. तोंडानें तो कांहींहि बडबडत असला तरी कोठें काय चाललें आहे व कोठें कोण काय बोलत आहे इकडे त्याचें लक्ष असे.

वसंतकानें डिंडिकाचें, म्हणजे चमत्कारिक वेष आणि गमतींचीं भाषणें यांच्या योगानें लोकांना हंसवून भिक्षा मिळविणाऱ्या भिकाऱ्याचें सोंग घेतलें होतें. त्यानें जो वेष धारण केलेला होता तो इतका विचित्र होता कीं पहाणाऱ्याला हंसूंच यावें. हंसू येईल असें बोलत आणि गात तो उज्जयिनीमध्यें भीक मागत हिंडूं लागला. लवकरच त्यानें राजवाड्याकडे आपला मोर्चा वळविला.

राजकन्या वासवदत्ता हिला तिच्या दासींनीं सांगितलें कीं शहरांत अलीकडे एक विचित्र भिकारी आलेला आहे. तो इतका गमत्या आहे कीं जन्मांत कधीं न हंसलेला मनुष्यदेखील त्याच्या गमती ऐकून हंसेल. त्यावरून राजकन्येला तो गमत्या भिकारी पहाण्याची इच्छा झाली.

एके दिवशीं ती संगीतशाळेंत असतांना बाहेर रस्त्यावर लोक मोठमोठ्यानें हंसत आहेत असें तिला वाटलें. राजमार्गांत लोक ज्या अर्थीं मोठमोठ्यानें हंसत आहेत, त्या अर्थीं तो गमत्या भिकारी इकडे आलेला असावा असा तिनें तर्क केला. आपल्या वीणाचार्यांची परवानगी घेऊन तिनें त्या भिकाऱ्याला बोलावून आणण्यासाठीं कांचनमालेला पाठविलें. थोड्याच वेळांत वसंतकाची स्वारी कांचन-मालेबरोबर संगीतशाळेंत आली.

येतांक्षणींच वसंतकाची दृष्टि संगीतशाळेंत आचार्यांच्या आसनावर बसलेल्या वत्सराजाकडे गेली. आपल्या राजाच्या पायांत शृंखला पाहून वसंतकाची चित्तवृत्ति चमत्कारिक झाली. वसंतकानें जरी वेषांतर केलेलें होतें तरी वत्सराजानें आपल्या नर्मसचिवाला ओळखलें.

"डिंडिका!" वत्सराज वसंतकाला म्हणाला, "आपल्या विरूपतेसंबंधीं तुला खेद वाटत असल्याचें दिसतें! पण येथें माझ्यापाशीं

तूं राहिलास तर तुझी विरूपता मी घालवूं शकेन ! कुरूपाला सुरूप बनविणाऱ्या दिव्य औषधी मला ठाऊक आहेत !"

"दिव्य औषधींच्या योगानें सुरूप बनतां येत असेल, तर कुरूपाला कवटाळून बसणें कोणाला आवडेल ?" वसंतकानें उत्तर दिलें, "पण माझा धन्दा भिकाऱ्याचा असल्यामुळें फिरल्यावांचून मला चैन पडत नाहीं. दिवसाचा मी भीक मागत फिरेन. रात्रींचा आपल्या आश्रयाला येत जाईन !"

"अहो विचित्रवेषधारी बुवा !" राजकन्या वासवदत्ता वसंतकाला म्हणाली, "तुम्हाला पुष्कळ गमती करतां येतात असें आम्हीं ऐकतों ! आम्हाला त्यांतल्या दाखवाना एक दोन गमती करून !"

"अवंतिराजपुत्रि !" वत्सराज उदयन वासवदत्तेला बोलला, "या डिंडिकाच्या गमती काय असतील त्या आपण मग पाहूं. आधीं सरस्वतीपूजन झालें पाहिजे. म्हणून तूं आणि कांचनमाला लवकर पूजासाहित्य घेऊन या."

पूजासाहित्य आणण्यासाठीं राजकन्या आणि तिची दासी निघून गेल्यावर वत्सराजानें वसंतकाला जवळ बोलाविलें आणि तो जवळ येतांच 'मित्रा !' असा शब्द हलकेच उच्चारला.

"महाराजांची सुटका करण्यासाठीं आर्य यौगंधरायण वेषांतर करून उज्जयिनींत आलेले आहेत." वसंतक हळूच बोलला, "योग्य वेळीं ते महाराजांना सूचना देतील. त्यांच्या सूचनेप्रमाणें वागण्याची महाराजांनीं तयारी ठेवावी."

"मित्रा !" वत्सराज उत्तरला, "आर्य यौगंधरायणाला तूं जाऊन सांग कीं केवळ स्वतःची सुटका झाल्यानें मला समाधान वाटणार

नाहीं. प्रद्योताचा दर्पभंग करावा अशी माझी इच्छा आहे. माझी जी विटंबना झाली तिचा सूड मी केव्हां घेईन असें मला झालें आहे. आमचा पराक्रमी पूर्वज धनंजय यानें पूर्वी द्वारकेंतून जशी यादवकन्या सुभद्रा हरण करून नेली, तशीच आतां उज्जयिनींतून प्रद्योताची कन्या वासवदत्ता हरण करून न्यावयाची असें मी ठरविलें आहे. ''

इतक्यांत वासवदत्ता आणि कांचनमाला पूजासाहित्य घेऊन आल्या. सरस्वतीपूजन झाल्यावर वसंतकानें वासवदत्तेला एक दोन गमतीच्या गोष्टी सांगितल्या आणि संगीतशाळेंतून तो बाहेर पडला.

त्यानें यौगंधरायणाची एकीकडे गांठ घेऊन त्याला सर्व हकीगत निवेदन केली. ती ऐकून यौगंधरायण समजला कीं वत्सराज आणि वासवदत्ता यांचें परस्परांवर प्रेम जडलें आहे. वत्सराजाबरोबरच वासवदत्तेलाहि जर येथून कौशांबीस नेतां आलें तर चंडमहासेनाचा खरोखरच दर्पभंग केल्यासारखें होईल असें त्यालाहि वाटलें. हें साधण्यासाठीं काय काय करावें लागेल याचा त्यानें कांहीं वेळ विचार केला. त्याचा कांहीं एक निश्चय ठरला. वसंतकाच्या कानांत हलकेच त्यानें कांहीं सांगितलें आणि नंतर ते दोघे दोन दिशांनीं निघून गेले. वसंतक जातांना "माझे मोदक उन्मत्तकानें खाल्ले!" म्हणून उन्मत्तकाला शिव्या देत होता आणि यौगंधरायण "मी ऐरावण आहें! ऐरावण!" असें म्हणत व फिदी फिदी हंसत जात होता!

संगीतशाळेंतील कार्यक्रम उरकला म्हणजे वत्सराज उदयनाला बंधनगृहाकडे नेण्यांत येत असे. बंधनगृहाचा रखवालदार शिवक याला वत्सराजानें अनुकूल करून घेतलेलें होतें. वसंतक रात्रीचा त्या बंधनगृहापाशीं येई आणि शिवक त्याला आंत घेत असे. उजाडण्यापूर्वी

वसंतक तेथून निघून जाई. वत्सराज आणि यौगंधरायण हे वसंतकाच्या द्वारें आपले बेत व विचार एकमेकांना कळवीत.

एके दिवशीं वत्सराजानें संगीतशाळेमध्यें असतांना आपला स्वदेशीं निघून जाण्याचा विचार वासवदत्तेला कळविला. या प्रयत्नांत मरण आलें तरी पुरवलें, पण हा बंदिवास नको असें तो आवेशानें म्हणाला. त्याचें निर्धाराचें भाषण ऐकून वासवदत्तादेखील प्रेमासाठीं त्याच्याबरोबरच कौशांबीस जाण्याचें साहस करण्याला तयार झाली. वत्सराजाला तिनें तसें सांगूनहि टाकलें.

अवंतिराजपुत्री पितृपक्षापासून विमुख होऊन आपणाबरोबर कौशांबीस यावयाला तयार आहे असें वत्सराजानें वसंतकाच्या द्वारें यौगंधरायणाला कळविलें. तेव्हां यौगंधरायणानें त्यांच्या सुटकेची तयारी चालविली. ती पूर्ण होतांच तो वसंतकाबरोबर रात्रीच्या वेळीं बंधनगृहांत येऊन वत्सराजाला भेटला.

" प्रभो ! " यौगंधरायण वत्सराजाला म्हणाला. " आपल्या पायांतील शृंखला तोडण्याचें हें साधन आपणापाशीं घेऊन ठेवावें आणि उद्यां रात्रीं आपली येथून सुटका करून घ्यावी. प्रद्योतानें राजकन्येला दिलेली भद्रवती नांवाची एक हत्तीण आहे. प्रद्योताचा नलागिरी हत्तीच काय तो एक तिची वेगांत बरोबरी करूं शकतो. पण हत्ती हे केव्हांहि हत्तिणींशीं युद्ध करीत नसल्यामुळें नलागिरीपासून भय बाळगण्याचें कारण नाहीं. भद्रवतीच्या आषाढक महाताला मीं आपलासा केला आहे. आपण उद्यां राजकन्येला चंडिकादेवीच्या पूजेचा समारंभ करावयाला सांगावें. चंडिका ऊर्फ मदिरा देवीचा प्रसाद म्हणून रात्रीच्या दुसऱ्या प्रहरांत राजवाड्यांतील सेवक, पहारेकरी आणि महात यांना

बेशुद्ध पडेपर्यंत मद्य पाजण्याची व्यवस्था राजकन्येनें करावी. मध्यरात्रीं देवीच्या दर्शनासाठीं म्हणून राजकन्येनें घोषवती वीणा घेऊन आपल्या विश्वासू कांचनमाला दासीसह भद्रवती हत्तिणीवर बसून निघावें. हत्तिणीचा महात या बंधनगृहापाशीं हत्तीण आणील. त्यावेळीं आपण आणि वसंतक यांनीं हत्तिणीवरील अंबारींत बसावें. पुढें काय करावयाचें तें सर्व मीं आपाढक महाताला सांगून ठेवलें आहे. आपणाला कोणीं अडविलें अगर आपला कोणीं पाठलाग केला तर स्वसंरक्षणासाठीं उपयोगीं पडावींत म्हणून हत्तिणीवरील अंबारींत धनुष्य, बाणभाते आणि ढाल तलवार हीं ठेवण्याची व्यवस्था मीं करविली आहे. उद्यां सकाळींच मी पुढें जात आहें. कारण प्रद्योताचें सैन्य आपल्या मागोमाग आलेंच तर विंध्यारण्यांत त्याचा प्रवेश होऊं नये म्हणून भिल्लांकडून विंध्यारण्यांतल्या सर्व वाटा अडवून धरण्याची व्यवस्था मला आधींच केली पाहिजे. ”

वत्सराजाला याप्रमाणें सांगून आणि शृंखला तोडण्याचें साधन त्याजपाशीं देऊन यौगंधरायण उजाडण्यापूर्वींच बंधनगृहांतून निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं वत्सराज उदयनानें वासवदत्तेला चंडिकादेवीच्या पूजेचा समारंभ करावयास सांगितलें आणि आपल्या सुटकेसंबंधीं एकंदर व्यवस्था कसकशी करण्यांत आलेली आहे याची तिला कल्पना दिली. आपणाकडे सोंपविण्यांत आलेली कामगिरी बिनचूकपणें पार पाडण्याचें वासवदत्तेनें कबूल केलें आणि कन्यांतःपुरांत जाऊन आपल्या दासींना तिनें पूजासमारंभाची तयारी विलंब न लावतां करा म्हणून आज्ञा केली. चंडिका ऊर्फ मदिरादेवी हें चंडमहासेनाचें दैवतच असल्यामुळें

वासवदत्तेनें चंडिकेच्या पूजेचा समारंभ करण्यांत कांहीं अस्वाभाविक अगर संशयास्पद आहे असें कोणालाच वाटण्यासारखें नव्हतें.

पूजासमारंभाचा एकंदर कार्यक्रम निर्विघ्नपणें पार पडला. देवीचा प्रसाद म्हणून प्राशन केलेल्या मद्याच्या योगानें राजवाड्यांतील सेवक, पहारेकरी आणि महात बेशुद्ध होऊन पडले. महातांमध्यें आषाढक महात यानेंच तेवढा देवीचा प्रसाद ग्रहण केलेला नव्हता. भर्तृदारिका देवीचें दर्शन घेऊन परत आल्यावर आपण प्रसाद ग्रहण करणार असें तो दुसऱ्या महातांजवळ म्हणाला. भद्रवती हत्तीणीवर अंबारी चढवून तिला त्यानें सज्ज केलेली होती.

बन्धनगृहाचा रखवालदार शिवक याला देवीचा प्रसाद देण्यांत आलेला होता. परंतु त्यानें तो प्राशन केलेला नव्हता. वत्सराज निघून गेल्यावर देवीचा प्रसाद सेवन करावयाचा असें त्यानें ठरविलें होतें.

मध्यरात्रीच्या सुमारास बंधनगृहापाशीं भद्रवती हत्तीण येऊन उभी राहिली. तिच्या पाठीवरील अंबारींत राजकन्या वासवदत्ता व तिची सखी कांचनमाला या दोघी बसलेल्या होत्या. हत्तीण आली त्यावेळीं वत्सराज आपल्या पायांतील शृंखला तोडून तयारच होता. शिवकाच्या मदतीनें वत्सराज आणि बसंतक हे दोघे हत्तिणीवरील अंबारींत चढून बसले. वत्सराजानें अंबारींत बसतांच हातांत सज्ज केलेलें धनुष्य घेतलें.

महातानें हत्तीण चालू केली. हत्तीण निघून जातांच शिवकानें देवीचा प्रसाद सेवन केला आणि तोहि बेशुद्ध होऊन पडला !

मदांत आलेल्या एका हत्तीनें उज्जयिनीचा तट एके ठिकाणीं नुकताच फोडला होता. तो अजुन दुरुस्त व्हावयाचा होता. आषाढक

महातानें भद्रवती हत्तीण चंडिका देवीच्या देवळाकडे न चालवितां फुटलेल्या तटाच्या बाजूकडे चालविली.

फुटलेल्या तटापाशीं वीरबाहु आणि तालभट या नांवांचे दोन पहारेकरी होते. ते भद्रवतीला अटकाव करूं लागले. वत्सराजानें लगेच अंबारींतून त्या दोघांच्या छातींत एकेक बाण नेमका मारून त्या दोघांना जमीनीवर लोळविलें ! अशा रीतीनें मार्ग मोकळा होतांच आषाढक महातानें फुटलेल्या तटाच्या वाटेनें हत्तीण उज्जयिनीच्या बाहेर काढली आणि तिला भर वेगानें चालावयास लावलें.

ज्या उज्जयिनी नगरींत वत्सराज उदयन कांहीं काळापूर्वी खेंचरांच्या गाडींतून बंदिवान म्हणून प्रविष्ट झाला, त्याच उज्जयिनी नगरींतून आतां तो हत्तिणीवर आरोहण करून आणि उज्जयिनीच्या राजाची कन्या बरोबर घेऊन बाहेर पडला !

## ७—उदयन—वासवदत्ता—विवाह

उदयन उज्जयिनींतून निघून गेल्यावर कांहीं वेळानें उज्जयिनींतले फिरते रखवालदार फिरत फिरत फुटलेल्या तटापाशीं आले. तेथील दोघे पहारेकरी छातींत बाण लागून मरण पावलेले आहेत असें आढळतांच त्यांची धांवपळ आणि गडबड सुरू झाली. तटाला पडलेल्या खिंडारांतून एक हत्ती बाहेर पडून गेलेला असावा असा भद्रवतीचीं मातींत जीं पावलें उमटलेलीं होतीं त्यांवरून त्यांनीं तर्क केला. पहारेकरी ज्या अर्थी बाण लागून मेलेले आहेत त्याअर्थी त्या हत्तीवर कोणीतरी धनुर्धर असला पाहिजे असें त्यांनीं अनुमान बांधलें. त्यांना हें प्रकरण गंभीर स्वरूपाचें वाटून त्यांनीं आपल्या मुख्य अधि-

काऱ्याला त्याची तत्काल वर्दी दिली. दोन सरकारी कामदारांचे आपलें काम बजावीत असतांना झालेले खून, आणि त्या खुनांशीं एका गजारूढ धनुर्धराचा संबंध, म्हणजे नुसतें गंभीर नव्हे, तर फारच गंभीर असें हें प्रकरण दिसतें आहे; हें महाराजांच्या कानावर ताबडतोब घातलें पाहिजे असा त्या मुख्य अधिकाऱ्यानें विचार केला आणि तेवढ्या रात्रीं राजवाड्यांत जाऊन घडलेला प्रकार चंडमहासेनाला निवेदन केला.

चण्डमहासेनानें लागलीच चवकशीला सुरवात केली. चवकशींत ज्या गोष्टी उघडकीला आल्या त्यांवरून हें कृत्य वत्सराजाचें असलें पाहिजे असें तो समजला. आपला डाव हुकला, आपल्या कन्येला वत्सराज घेऊन गेला, आतां त्याच्याशीं शत्रुत्व धरलें तर न जाणो, आपली कन्या त्याच्या हातीं सांपडली आहे तिच्यावरच त्याचा तो सूड उगवील. तिच्याशीं विवाह करण्याचें देखील टाळील; आणि असें झालें म्हणजे आमच्या प्रद्योत घराण्याची जगांत केवढी अप्रतिष्ठा होईल ? तेव्हां वत्सराजाला न चिडवितां या प्रसंगीं गोंजारणेंच इष्ट आहे. त्याला गोंजारून मुलीचें आणि त्याचें विलंब न लागतां लग्न होईल अशी तजवीज पहिल्या प्रथम करणें हेंच आतां श्रेयस्कर होय. असा चंडमहासेनानें पोक्त विचार केला.

चवकशीची गडबड चालू असतांना राजपुत्र पालक जागा झाला. बाहेर गडबड कशाची आहे तें पहावें म्हणून तो बाहेर आला. त्याला बाहेर नलागिरी हत्तीचा महात दिसला.

नलागिरी हत्तीचा महात हा सर्व महातांचा मुख्य होता. त्याला मद्यामुळें फारशी गुंगी येत नसे आणि आलेली थोडयाच वेळात उतरत असे. देवीच्या प्रसादामुळें त्याला जी थोडी गुंगी आलेली

होती ती आतां उतरली होती. चंडमहासेनापुढें त्याची नुकतीच जबानी झाली होती.

" काय रे, कसली गडबड आहे ? " राजपुत्र पालकानें नलागिरीच्या महाताला प्रश्न केला.

" वत्सराज भर्तृदारिकेला घेऊन पळाले असें म्हणतात ! " महातानें उत्तर दिलें.

" तो पळाला, तुझ्या धन्याच्या लेकीला घेऊन पळाला, नि तूं अजून इथेंच उभा आहेस ? " पालक रागावून म्हणाला, " बेशरम कुठला ! चल, ऊठ, नीघ, धांव, पळ, ठोक धूम ! नलागिरीवर आधीं अंबारी चढव ! तोंपर्यंत मी माझें कवच चढवतों ! माझी गदा आणि मुद्गर घेतों ! तुला तुझ्या धन्याच्या लेकीबद्दल काळजी नसली तरी मला माझ्या बहिणीची काळजी आहे. समजलास ? वत्सराजाचा पूर्वज भीमसेन हा गदायुद्धांत नि मल्लयुद्धांत निपुण असला तरी वत्सराजाला या विद्या अवगत नाहींत ! असत्या तर इथें असतांना एकदां तरी त्यानें माझ्याबरोबर गदायुद्ध अगर मल्लयुद्ध खेळण्याची इच्छा प्रकट केली असती. एक वेळ तरी आमचा तालीमखाना पहावा असें त्याला वाटलें असतें. त्याच्याबरोबर मी गदायुद्ध करीन. गदा त्याच्यापाशीं नसलीच तर मल्लयुद्धांत त्याला मी जिंकीन ! पळ, ठोक धूम ! चढव नलागिरीवर आधीं अंबारी ! "

पालकाची अशी आज्ञा झाल्यामुळें महाताला नलागिरी हत्ती स्वारीसाठीं सज्ज करणें भाग पडलें. पालकानेंहि कवच चढवून आणि गदा मुद्गर घेऊन बहिणीला सोडविण्यासाठीं आणि वत्सराजाला पुन्हा पकडून आणण्यासाठीं निघण्याची तयारी केली. हें चवकशी प्रकरण

आटोपण्याच्या आंत चतुर्भुज केलेल्या वत्सराजाला वडिलांपुढें आणून मी उभा करीन अशा उमेदीनें नलागिरी हत्तीवर आरूढ होऊन राजपुत्र पालक निघाला.

राजपुत्र पालक वत्सराजाच्या पाठलागावर गेल्याचें चंडमहासेनाला थोडयाच वेळांत समजलें.

" नीतिशास्त्र पढवावयास आलेल्या आर्य पिशुनांपुढें आपल्या रथाच्या घोड्यांची प्रशंसा करीत बसून प्रत्यक्ष आपल्या आचार्यांचा अपमान करणारा हा द्वड पोर केवळ भलत्यावेळीं भलतेंच करण्यासाठीं जन्माला आलेला आहे कीं काय समजत नाहीं ! " चंडमहासेन मनांत म्हणाला, " सध्यांच्या प्रसंगीं याला जर वेळींच परतवून आणलें नाहीं तर या नाजूक परिस्थितींतून बाहेर पडण्याची आशाच करावयाला नको ! "

असें म्हणून चंडमहासेनानें पालकाला परत आणण्यासाठीं राजपुत्र गोपालकाची ताबडतोब रवानगी केली.

परंतु गोपालकानें पालकाला गांठण्यापूर्वींच पालक आणि वत्सराज यांची गांठ पडली होती ! कारण नलागिरी हत्ती चालीला होताच तसा !

आषाढक महात भद्रवतीला सारखी पुढें दामटीत होता, आणि मागून पाठलाग करीत येणाऱ्या पालकावर वत्सराज बाणांमागून बाण सोडीत होता. पालकाच्या अंगांत कवच असल्यामुळें वत्सराजाच्या बाणांची पालकाला पर्वा नव्हती.

" तूं त्या पळपुट्या हत्तिणीवर आपला नलागिरी घाल ! वत्सराजाचे केस धरून त्याला मी त्याच्या अंबारींतून ओढून काढतों ! " पालक आपल्या महाताला म्हणाला.

" आयुष्मन् ! " महातानें नम्रपणानें म्हटलें, " आपला नलागिरी हा हत्तिणीवर केव्हांहि चाल करून जाणार नाहीं ! "

" बडबड पुरे कर ! " पालक दरडावून म्हणाला, " निमूटपणें त्या हत्तिणीवर आपला हत्ती घाल ! "

" जशी आयुष्मंतांची आज्ञा ! " असें म्हणून महातानें नलागिरीला अंकुश टोंचून भद्रवतीवर चाल करून जाण्याचा इशारा दिला.

पण नलागिरीनें तो इशारा मानला नाहीं. महातानें पुन्हा अंकुश टोंचला. त्याबरोबर तो गजराज चिडला; त्यानें मोठ्यानें शब्द केला आणि वाट सोडून तो सैरावैरा धांवत सुटला. हत्ती भडकलेला पाहून पालक घाबरला ! हा आपणाला आतां एखाद्या खड्ड्यांत तरी पाडील नाहीं तर जंगलांत तरी नेऊन टाकील असें त्याला भय पडलें.

नलागिरी भडकल्यामुळें वत्सराजाला पुढें निघून जाण्याला संधि मिळाली. महातानें नलागिरीला कसाबसा शांत करून पुन्हा वाटेवर आणलें त्यावेळीं वत्सराज पुष्कळच पुढें निघून गेलेला होता.

आतां काय करावें याचा पालकाला विचार पडला. इतक्यांत राजपुत्र गोपालक तेथें येऊन पोंचला, त्यानें वडिलांची आज्ञा पालकाला कळविली आणि पालकाला तो आपणाबरोबर परत उज्जयिनीस घेऊन गेला.

मध्यरात्रीं उज्जयिनीहून निघालेली भद्रवती दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं पौरवराज्याच्या सीमेवरील विंध्यारण्यापाशीं जाऊन पोंचली. एवढा काळ सारखें चालत राहिल्यामुळें ती बिचारी अगदीं थकून गेली. तिला फार तहान लागली. तिला विसावा देणें अवश्य झाल्यामुळें वत्सराज, वासवदत्ता, कांचनमाला आणि वसंतक ही मंडळी खालीं

उतरली. महातानें हत्तिणीला पाणी पाजण्यासाठीं नेलें. श्रमांमुळें अतोनात तान्हावलेलें तें जनावर पाणी दिसतांच पी पी पाणी प्यालें आणि थोड्याच वेळांत त्यानें प्राण सोडला !

विंध्यारण्यांतील भिल्लांच्या नायकाला आपण आल्याचें वर्तमान कळविण्यासाठीं वत्सराजानें वसंतकाला पुढें पाठविलें आणि आपण वासवदत्ता, कांचनमाला आणि आषाढक महात यांसह पायींच हळू हळू वाट चालावयास सुरवात केली.

वसंतक भिल्लांच्या पल्लीला जाऊन पोंचतांच भिल्लांच्या नायकाला त्यानें वत्सराज येत असल्याचें वर्तमान कळविलें. यौगंधरायण आणि कित्येक प्रमुख भिल्ल अशी मंडळी लगेच वत्सराजाला सामोरी जाण्यासाठीं निघाली. त्या मंडळीबरोबर वत्सराज, वासवदत्ता, कांचनमाला आणि आषाढक हीं भिल्लांच्या पल्लीला गेलीं.

दुसऱ्या दिवशीं यौगंधरायणानें रुमण्वानाकडे दूत पाठवून वत्सराज बंधमुक्त होऊन परत आल्याचें त्याला कळविलें. रुमण्वानानें ती आनंदाची वार्ता लगेच कौशांबीच्या लोकांना कळविली आणि आपल्या राजाला राजधानींत घेऊन येण्यासाठीं विंधारण्याकडे हत्ती, घोडे, छत्र, चामरें आणि सैन्य यांची रवानगी केली.

वत्सराज उदयन विंधारण्यामध्यें भिल्लांच्या पल्लींत असतांना तेथेंच त्याच्याकडे उज्जयिनीहून चंडमहासेनाचा प्रतीहारी आला. त्यानें वत्सराजाला चंडमहासेनाचा असा निरोप कळविला कीं, “ आपणाला आमचे जामात करावयाचे याच हेतूनें आम्हीं उज्जयिनीस आणलें, आणि मुलीचें व आपलें परस्परांवर प्रेम जडावें म्हणून मुलीला शिष्या -या नात्यानें आपल्या स्वाधीन केली. मुलीचें व आपलें परस्परांवर प्रेम

जडलें हें पाहून आम्हांला आनंदच झाला. आतां मुलगी आपणास अर्पण करावयाची असें आम्हीं मनांत आणलें. परंतु आपण मानी असल्यामुळें येथें आपणाला मुलगी अर्पण केल्यास आपणाला तो अपमान वाटेल कीं काय अशी आमच्या मनांत शंका आली; आणि आपणापाशीं हा विषय कसा काढावा हें आम्हांला एक कोडेंच होऊन बसलें. त्यानंतर आपणाकडून जी कृति झाली तिच्यामुळें हें कोडें आपोआपच सुटलें हें कळविण्यास संतोष वाटतो. आतां लवकरच युवराज गोपालक यांस आम्हीं कौशांबीस पाठविणार आहोंत. तो मुलीचें आपणास विधिपूर्वक दान करील."

हा निरोप ऐकून वत्सराज आणि वासवदत्ता या दोघांनाहि आनंद झाला. रुमण्वानानें पाठविलेल्या सैन्याबरोबर तीं कौशांबीस गेलीं. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं राजपुत्र गोपालक हा उज्जयिनीहून मोठ्या लव्याजम्यानिशीं कौशांबीस आला आणि त्यानें अवंतिराजकन्या वासवदत्ता ही वत्सराज उदयनाला विधिपूर्वक अर्पण केली.

उदयन आणि वासवदत्ता यांचा विवाह होऊन वासवदत्ता ही पौरवराज्याची महाराणी झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं सांकृतायनी नांवाची एक संन्यासिनी पंडिता उज्जयिनीहून येऊन वासवदत्तेपाशीं राहिली. उदयनविषयक नाटकांपैकीं प्रियदर्शिका नांवाच्या नाटकांत ही पंडिता दाखविलेली आहे.

## ८—पारसीकांची स्वारी.

प्रद्योत आणि पौरव यांच्यांत सोयरीक होऊन स्नेहभाव उत्पन्न झाल्यामुळें पौरवराज्याची एक बाजू सुरक्षित झाली. अशाच रीतीनें

मगधाच्या शैशुनागांशीं सोयरीक झाल्यास पौरवराज्याची आणखींहि एक बाजू सुरक्षित होईल, आणि पौरवांना आपलें गेलेलें चक्रवर्तिपद पुन्हां प्राप्त करून घेण्याच्या उद्योगाला निर्वेधपणें लागतां येईल, या विचारानें यौगंधरायण अमात्यानें वत्सराज उदयन आणि राणी वासवदत्ता यांना न कळवितांच मगधाचा शैशुनाग राजा क्षत्रौजा उर्फ महापद्म याच्या पद्मावती कन्येला वत्सराजासाठीं मागणी घातली! परन्तु मगधराजानें तिला मान्यता देण्याचें लांबणीवर टाकलें. जांवई म्हणून वत्सराज त्याला नापसंत नव्हता. परंतु वत्सराजाला कन्या देणें म्हणजे सवतीवर मुलगी देणें असल्यामुळें त्याच्या मनाचा निश्चय होत नव्हता. काय केलें असतां मगधराज आपली कन्या वत्सराजाला द्यावयास तयार होईल या विचारांत यौगंधरायण असतां एकाएकीं अशी परिस्थिति उत्पन्न झाली कीं तिच्यामुळें आर्यावर्तातील प्रमुख सत्ताधाऱ्यांना आपसांतले भेदभाव बाजूला ठेवून प्रबळ अशा एका परकीय सत्तेशीं झगडण्याकरितां आपली जूट बनविणें अवश्य झालें. अमात्य यौगंधरायणानें त्या परिस्थितीचा फायदा घेतला आणि आपलें उद्दिष्ट साधलें.

इराणचा हखामणी सम्राट् पहिला दारयवहु याच्या कारकीर्दीच्या आरंभीं पारसीकांचें साम्राज्य सिंधुनदाच्या पश्चिमतीराला भिडलें होतें. साम्राज्यांत ठिकठिकाणीं झालेलीं तोतयांचीं बंडें मोडून काढण्याच्या कामीं दारयवहूला आपल्या कारकीर्दीचीं पहिलीं तीन वर्षे खर्च करावीं लागलीं. दारयवहु तोतयांचीं बंडें मोडून तोतयांना सुळीं देत होता त्या वेळीं त्याचा बाप विश्तास्प हयात होता इतकेंच नव्हे तर सम्राट् बनलेल्या आपल्या पुत्राला तोतयांचीं बंडें मोडण्याचे कामीं तो ससैन्य

मदत करीत होता. तोतयांचा उच्छेद केल्यानंतर खिस्तपूर्व ५१७ ते ५१३ या पांच वर्षांच्या काळांत दारयवहूचें केव्हांतरी भारतवर्षाकडे लक्ष्य वेधलें व त्यावेळीं त्याचा बाप विश्तास्प हा नुकताच मरण पावलेला होता.

स्वतः दारयवहूनें भारतवर्षावर स्वारी केली नाहीं. आरुणि नांवाच्या आपल्या एका सेनापतीला भारतवर्षावर त्यानें ससैन्य रवाना केलें.

आरुणि हा गांधार देशाकडून भारतवर्षांत प्रविष्ट झाला. आज ज्या नदीला आपण झेलम असें म्हणतों तिला प्राचीनकाळीं 'आर्जीकीया' असें नांव होतें. आरुणीनें त्या नदीला दारयवहूचा बाप विश्तास्प याचें नांव दिलें आणि त्याच नांवाचें पुढें इकडे 'वितस्ता' असें रूपांतर झालें. मुलुख सर करीत करीत पंजाबांतून तो खालीं यमुनेपर्यंत आला. इकडील लोकांपैकीं कोणाला तो 'दारुणकर्मदक्ष' वाटला, तर कोणाला 'पापी राहूसारखा' वाटला.

यमुनानदीच्या कांठाशीं आल्यावर आरुणीची पुढें प्रद्योत, पौरव, इक्ष्वाकु आणि शैशुनाग या सत्ताधाऱ्यांशीं गांठ पडणार होती. आरुणीला आतांपर्यंत भेटलेल्या सत्ताधाऱ्यांसारखे हे सत्ताधारी लेंचेपेंचे नसून चांगले कणखर होते. आरुणि हें जाणून असला पाहिजे. येतांक्षणींच या सत्ताधाऱ्यांवर एकदम चाल करून जाण्याचें त्यानें टाळलें.

यमुनातीरीं शूरसेनांचें मथुरा हें ठिकाण होतें. आरुणीनें तें आपल्या ताब्यांत घेतलें. त्या ठिकाणाची त्यानें मजबुती केली आणि तेथें राहून त्यानें आपल्या पुढील उद्योगाची पूर्व तयारी चालविली. इकडे येतांना त्यानें आपणाबरोबर जेवढें सैन्य आणलेलें होतें तेवढें आतांपर्यंतच्या

त्याच्या उद्योगाला पुरेसें झालेलें असलें तरी पुढील उद्योगाला तें अपुरें पडेल असें त्याला वाटत होतें. स्वदेशांतून पुरेशा सैन्याचा पुरवठा होईलच अशी त्याला खात्री नव्हती. कारण, हखामणीसाम्राज्याचा मुलुख दिसायला कितीहि विस्तृत असला तरी त्याचा पुष्कळसा भाग वाळवंटमय होता. समुद्रांत जशीं बेटें तशीं त्या वाळवंटांत मधून मधून ओलवणें होतीं; आणि त्या ओलवणांतूनच काय ती मनुष्यवस्ती असे. आर्यावर्तातील सत्ताधाऱ्यांचीं राज्यें दिसायला लहान असलीं तरी तीं मनुष्यवस्तीनें गजबजलेलीं होतीं. वाळवंटमय मुलखांत आपल्या साम्राज्याचा पसारा घालून बसलेल्या हखामणींना त्या साम्राज्यांतील दूरदूरचे देश ताब्यांत राखण्यासाठीं नेहमींच जवळ भरपूर सैन्य ठेवावें लागत होतें. लोकवस्तीनें गजबजलेलें असें दूरचें आर्यावर्त काबीज करण्याच्या ईर्ष्येला बळी पडून तें सैन्य जर ते आरुणीच्या मदतीसाठीं भारतवर्षांत रवाना करते तर वाळवंटमय मुलखांत विस्तारलेलें त्यांचें साम्राज्य वादळांत सांपडलेल्या सिकतापर्वताप्रमाणें तेव्हांच उडून गेलें असतें. अशी परिस्थिति असल्यामुळें आरुणीला स्वदेशांतून मोठ्या प्रमाणावर लष्करी कुमक मिळण्यासारखी नव्हती. इकडे काबीज केलेल्या मुलखांतूनच सैन्यांत भरती करून 'हिंदाव'ची मोहीम पुरी करणें त्याला प्राप्त होतें. परंतु इकडील लोकांचा विश्वास संपादण्याऐवजीं आपल्या दारुणकर्मांमुळें इकडील लोकांच्या द्वेषाला मात्र तो पात्र होत होता.

मथुरा येथें सैन्यभरतीचें काम जोरांत चालू असतांनाच पारसीक-सेनापति आरुणि याजकडून पुढील अर्थाचे खलिते आर्यावर्तातील सत्ताधाऱ्यांकडे रवाना झाले:—

" मथुरा–स्कंधावारांतून.

ह्खामणी–कुलोत्पन्न विश्तास्प–पुत्र महापराक्रमी दारयवहु महाराज, जे राजांचे राजे, पार्स देशाचे प्रभु, आणि दस्यूंचे स्वामी आहेत, ज्यांचें एकछत्री माहाराज्य सिंधुनदापासून यवनदेशापर्यंत, आणि शकस्थानापासून कुशापर्यंत ( आफ्रिकेंतील सांप्रतच्या न्यूबिया प्रांतापर्यंत ) देवश्रेष्ठ अहुर मज्दाच्या कृपेनें पसरलेलें आहे, त्या महापराक्रमी दारयवहु महाराजांचे एकनिष्ठ आणि अत्यन्त आज्ञाधारक बद्धक, सेनापति आरुणि यांजकडून—

हिंदावांतील राजे रजवाडे आणि इतर सत्ताधारी यांस कळविण्यांत येतें कीं देवश्रेष्ठ अहुर मज्दानें संपूर्ण पृथ्वीचें राज्य महापराक्रमी दारयवहु महाराजांस दिलेलें असून त्या राज्याचा पूर्वभाग आपल्या स्वाधीन करून घेण्यासाठीं महाराजांच्या आज्ञेवरून आमचें हिंदावांत आगमन झालेलें आहे. तरी महाराजांच्या भूमीचा आजवर उपयोग घेणाऱ्या राजेरजवाडयांनीं आणि इतर सत्ताधाऱ्यांनीं त्या भूमीचा अतःपर उपभोग न घेतां ती भूमि महाराजांचे प्रतिनिधि जे आम्हीं, त्या आमच्या स्वाधीन विलंब न लावतां करणें यांतच त्यांचें कल्याण आहे. तरी त्यांनीं मथुरास्कंधावारांत स्वतः येऊन महाराजांची भूमि महाराजांस परत दिल्याचें लिहून द्यावें, आपणास महाराजांचे भृत्य असें म्हणवावें, महाराजांशीं आणि महाराजांच्या उत्तराधिकाऱ्यांशीं सदोदित निष्ठापूर्वक वागण्याची शपथ घ्यावी, आणि महाराजांचे प्रतिनिधि या नात्यानें आम्हीं आज्ञा करूं त्याप्रमाणें चालावें. असें केल्यास महाराज त्यांच्यावर प्रसन्न होऊन आपल्या विस्तीर्ण माहाराज्यांत त्यांना अधिकारी म्हणून नेमून त्यांचें ऊर्जित करतील. जे असें करणार

नाहींत ते आमच्या महापराक्रमी महाराजांचे शत्रु आहेत असें समजून त्यांच्यावर यत्किंचित् देखील दया न दाखवितां त्या सर्वांस त्यांच्या अनुयायांसह कापून काढण्यांत येईल. कळावें. "

आरुणीनें मथुरा हें ठिकाण काबीज केलें आणि त्याची तो मजबुती करूं लागला त्यावेळींच त्याच्या पुढील हेतूंची कल्पना आर्यावर्तांतील सत्ताधाऱ्यांना झालेली होती. त्याच्याकडून आलेले खलिते वाचून पाहिल्यावर तर त्यांची खात्रीच झाली. ते आरुणीला एक जुटीनें तोंड देण्याच्या तयारीला लागले. आर्यावर्तांतील सत्ताधाऱ्यांची आरुणीविरुद्ध जूट बनत असतांनाच अमात्य यौगंधरायणानें पौरव आणि शैशुनाग यांजमध्यें सोयरीक घडवून आणण्याचा अपला हेतु सिद्धीस नेला.

यौगंधरायणानें पूर्वी सेनापति रुमण्वानालाच तेवढा आपला हेतु कळवून त्याची त्या हेतूला मान्यता मिळविली होती. मगधराजानें मागणीला रुकार दिल्यानंतर वत्सराज उदयन आणि देवी वासवदत्ता यांना पौरव व शैशुनाग यांजमधील सोयरिकीची आवश्यकता आपण पटवून देऊं आणि त्यांची अनुकूलता संपादन करूं अशी त्याला उमेद होती. पण मगधराज रुकार देईना, अगर नकार देऊन दूताला परतहि पाठवीना ! मगधराजाकडून नकार येणें यौगंधरायणाला इष्ट नव्हतें. मगधराजाची कोणत्या प्रकारची समजूत झाली तर त्याच्याकडून चट्कन् रुकार येईल हें यौगंधरायणानें ताडलें. पारसीकांनीं पौरवराज्याच्या सीमेजवळच तळ ठोकल्यामुळें पौरवराज्याला पारसीकांपासून तत्काल भय होतें. त्यामुळें पौरव आणि शैशुनाग यांची ताबडतोब मैत्री होणें आणि त्या मैत्रीचें सोयरिकीच्या रूपानें लगेच दृढीकरण केलें जाणें

अत्यावश्यक होतें. हें साधण्यासाठीं यौगंधरायणानें एक कारस्थान रचलें. सेनापति रुमण्वान् त्या कारस्थानांत सामील झाला.

पारसीकसेनापति आरुणि याच्या आक्रमणाला पायबंद कसा घालावा हें ठरविण्याच्या निमित्तानें अमात्य यौगंधरायण यानें वासवदत्तेचा ज्येष्ठ भ्राता गोपालक याला उज्जयिनींहून तातडीनें कौशाम्बीस बोलाविलें. गोपालक कौशांबीस येतांच यौगंधरायणानें त्याची एकांतीं भेट घेऊन त्याला एकंदर परिस्थिति समजावून सांगितली. गोपालकाला ती पटली आणि तोहि यौगंधरायणाच्या कारस्थानांत सामील झाला. यौगंधरायणानें नंतर गोपालकाच्या मार्फत वासवदत्तेला आपल्या कार्याचें महत्त्व पटवून देऊन तिची संमति मिळविली.

यौगंधरायणानें आपल्या कारस्थानाचा वत्सराज उदयनाला बिलकुल सुगावा लागूं दिलेला नव्हता. वत्सराज उदयन आरुणीचा खलिता वाचून संतप्त झालेला होता. यमुना ओलांडून मथुरेवर स्वारी करण्याची भाषा तो बोलत होता. दारयवहूचे दास बनण्यास तयार नसलेल्या स्वातंत्र्यप्रिय भारतीयांना कापून काढण्याच्या इराद्यानें इकडे आलेल्या पारसीकसेनापतीला रणांत गांठून स्वतः त्याचें मस्तक धडावेगळें करण्याची प्रतिज्ञा वत्सराजानें केलेली होती. यौगंधरायण आणि रुमण्वान् या दोघांनीं त्याला आवरून धरलें होतें म्हणून बरें; नाहींतर आरुणीवर स्वतःच्याच तेवढ्या सैन्यानिशीं चालून जाण्यास त्यानें कमी केलें नसतें. तो जबर धाडशी होता. भय म्हणजे काय चीज असते हें त्याला ठाऊकच नव्हतें !

यौगंधरायणानें वत्सराजाला सांगितलें कीं "शत्रु आपल्या सीमेवरच येऊन बसल्यामुळें त्याचें व आपलें युद्ध जुंपण्यास आतां विलंब लागणार

नाहीं. परंतु या परदेशी शत्रूशीं लढण्यांत आम्हीं गुंतलेले आहोंत असें पाहून आमचे शेजारी शत्रु काय करतील याचा नेम नाहीं. त्यांची नीति विचित्र आहे. ते हीच संधि साधून आमच्या राज्याचे लचके तोडण्यास कमी करणार नाहींत. कोसलराज आपले जुने आप्त आहेत, त्यांचा व आपला आज तीन पिढ्या स्नेह आहे; ते या प्रसंगीं आपणाला साह्य करण्यास मागें पुढें पहाणार नाहींत. अवंतिराज तर देवींचे वडील. त्यांचेंहि आपणाला भरपूर साह्य होईल. परंतु काशीराज आणि मगधराज यांचा भरंवसा नाहीं. एकटा काशीराज आमचें कांहीं एक वांकडें करूं शकत नाहीं. खरी धास्ती अशी मगधराजाचीच वाटते. म्हणून आरुणीशीं गांठ घालण्यापूर्वी मगधाकडील आपल्या सरहद्दीचा पक्का बंदोबस्त करणें अवश्य आहे. यासाठीं महाराजांना माझी अशी नम्र विनंति आहे कीं आरुणीच्या हालचालींवर नजर राखण्यासाठीं रुमण्वान् यांना अंतर्वेदींत ठेवून आपण लावाणकास जाऊं व तिकडील सरहद्दीचा स्वतःच्या नजरेखालीं पक्का बंदोबस्त करूं. मगधराजाला संशय येऊं नये म्हणून मृगयेच्या निमित्तानें तिकडे जाणें बरें. देवी, देवींचे बंधु आणि नर्मसुहृद् वसंतक यांनाहि आपणाबरोबर घ्यावें असें मला वाटतें. मृगयेच्या निमित्तानें सरहद्दीवरील जंगलांत संचार करतां येऊन जंगलांतील वाटांच्या बंदोबस्ताची तजवीज करतां येईल. देवी, देवींचे बंधु व वसंतक ही मंडळी बरोबर असल्यानें वत्सराज केवळ आठ पंधरा दिवस विश्रांति घेण्याच्या हेतूनेंच लावाणकास आलेले आहेत असें मगधराजाला वाटेल.''

यौगंधरायणाची ही सूचना वत्सराजाला पसंत पडली. आरुणीच्या हालचालींवर नजर देण्यासाठीं रुमण्वानाला अन्तर्वेदींत ठेवून वत्सराज आणि यौगंधरायण हे आपणाबरोबर वासवदत्ता, गोपालक व वसंतक

यांना घेऊन लावाणक गांवीं गेले. त्यांच्या परिवारांत लष्करी अधिकारी असे कोणीच दिसत नव्हते.

लावाणकांत जाऊन पोंचल्यावर अमात्य यौगंधरायणाच्या कारस्थानाला खरी सुरवात झाली. वत्सराज मृगयेसाठीं म्हणून जंगलांत गेलेला असतां लावाणकमधील राजवाड्याला आग लावण्यांत आली, आणि देवी वासवदत्ता त्या आगींत जळून मेली अशी बातमी पसरवण्यांत येऊन मगधराजाच्या कानीं ती बातमी जाईल अशी व्यवस्था केली गेली.

वासवदत्ता मरण पावली असें कळतांच मगधराज क्षत्रौजा आपली कन्या पद्मावती ही वत्सराजाला द्यावयास तयार झाला.

राणी वासवदत्ता सुखरूप होती. वाड्याला आग लावण्यांत आली त्यावेळीं ती वाड्यांत नव्हती. तिनें राणीचा वेष टाकून ब्राह्मण–स्त्रीचा वेष धारण केला होता आणि ती मगधदेशांत आपल्या भावी सवतीजवळ जाऊन राहिली होती. यौगंधरायणानेंच तिला तिकडे पोंचविलें होतें. तेथे ती आपणाला आवंतिका (म्हणजे अवंतिदेशांतली) असें म्हणवीत होती. पद्मावतीजवळ राहून पद्मावतीच्या स्वभावाचें तिने निरीक्षण केलें आणि पुढील आयुष्यांत हिचें व आपलें पटायला कांहीं हरकत नाहीं इतकी आपली खात्री करून घेतली.

वत्सराजाला यांतलें कांहींच ठाऊक नव्हतें. तो शिकारीहून परत आला तेव्हां वासवदत्ता जळून मेल्याचें त्याला कळविण्यांत आलें. तें ऐकून तो दुःखी झाला. यौगंधरायण त्याचें समाधान करूं लागला. असें चाललें असतां मगधराजाकडून एके दिवशीं दूत आला आणि त्यानें वत्सराजांना आपली कन्या द्यावयास मगधराज तयार आहेत असें यौगंधरायणाला सांगितलें.

यौगंधरायणानें वत्सराजाला तें कळविलें आणि म्हटलें कीं, " महाराजांना देवी वासवदत्ता वारल्यामुळें किती दुःख होत आहे हें मी जाणतों. परंतु राजाचा मुकुट धारण करणाऱ्या व्यक्तींचीं राज्यविषयक जीं कर्तव्यें आहेत तीं पार पाडलींच पाहिजेत. तीं पार पाडतांना वैयक्तिक सुखांना आणि दुःखांना बाजूलाच ठेवलें पाहिजे. ज्यांत चक्रवर्ति भरत, गांगेय भीष्म, राजा युधिष्ठिर असे थोर थोर पुरुष होऊन गेले तो पौरव राजवंश पुढें चालला पाहिजे आणि तो चालण्यासाठीं महाराजांनीं आपल्या द्वितीय विवाहाला संमति देणें हेंच योग्य होईल असें मला वाटतें. आरुणिसारखा प्रबळ शत्रु पौरवराज्याच्या सीमेवर येऊन बसला आहे. त्याचा निःपात करण्यासाठीं मगधराजाची मदत मिळाली तर तीहि आपणाला हवीच आहे. मगधराज आपला आप्त झाला म्हणजे आपणाला तो मदत केल्यावांचून राहणार नाहीं. पौरव राज्याचें तेणें करून हितच होणार आहे. महाराजांना मी अधिक कांहीं सांगावें असें नाहीं. महाराज सर्व जाणतातच. "

" ज्यांत पौरवराज्याचें हित असेल तें मला अप्रिय असलें तरी राज्यहिताकडे लक्ष्य देऊन मी मोठ्या आनंदानें करीन. " वत्सराज म्हणाला, " पण आर्य यौगंधरायण, एक मात्र तुम्हांला मी सांगतों, देवी वासवदत्तेला मी विसरणें केव्हांहि शक्य नाहीं. "

यौगंधरायणानें मगधराजास कळविलें कीं " मगधराजकन्येचें पाणिग्रहण करण्यासाठीं आजपासून सातव्या दिवशीं वत्सराज राजगृहाला येतील. आपण सर्व सिद्धता करावी. वत्सराज विवाहविधि संपतांच स्वराज्यांत परत येतील. पारसीक शत्रु समीप असल्यामुळें त्यांना राजगृह येथें अधिक काळ रहातां येण्यासारखें नाहीं. "

सातव्या दिवशीं वत्सराज यौगंधरायणासह राजगृहास गेला आणि तेथें वत्सराज आणि पद्मावती यांचा विवाह झाला. विवाह पार पडतांच यौगंधरायणानें मगधराजाकडून अग्निसमक्ष अशी शपथ घेवविली कीं " वत्सराजाशीं मी इतःपर वैर करणार नाहीं. "

विवाह झाला त्याच दिवशीं वत्सराज आणि यौगंधरायण हे पद्मावतीला घेऊन राजगृहाहून निघाले. पद्मावतीबरोबर आवंतिकाहि निघाली.

लावाणकाला येऊन पोंचतांच आवंतिका ही राणी वासवदत्ता म्हणून प्रकट झाली ! वत्सराज आश्चर्यचकित झाला. पद्मावतीला आपणाकडे कनिष्ट राणीचें पद आलें म्हणून वाईट वाटावयाचें, परंतु तसें तें वाटलें नाहीं. वासवदत्तेवर तिचें प्रेम जडलें होतें. तिला ती आपल्या वडील बहिणीप्रमाणें मानूं लागली.

आपल्याकडे आपल्या मुलीपाशीं आवंतिका म्हणून जी तरुण मुलगी राहिली होती ती वत्सराजाची स्त्री वासवदत्ता होती व लावाणकास जातांच ती प्रकट झाली हें मगधराजाला कळतांच या मंडळीनें आपणाला फसवलें हें तो समजून चुकला. परंतु मुलीचें लग्न होऊन गेल्यामुळें त्याला त्या बाबतींत आतां कांहीं करतां येण्यासारखें नव्हतें. वत्सराजाला त्यानें कळविलें कीं " आमची फसगत झाली ! आपणाला मुलगी दिली म्हणून पश्चात्ताप करण्याची पाळी आम्हांवर आणूं नका ! इतकें तरी आतां करा म्हणजे पुष्कळ झालें ! "

पण मगधराजाला पडलेली काळजी त्याच्या मुलीनेंच दूर केली. पद्मावतीनें मगधराजाला कळविलें कीं " आपण व्यर्थ कष्टी होऊं नका. आर्यपुत्रांचें माझ्यावर प्रेम आहे आणि वासवदत्ताहि माझ्याबरोबर अगदीं सख्ख्या बहिणीप्रमाणें वागते. "

हें कळतांच मगधराज संतुष्ट झाला आणि "वासवदत्तेलाहि मी आपली कन्याच समजतों !" असें म्हणाला.

अशा रीतीनें मगधराजाला आपलासा करून घेतल्यावर आरुणीच्या पारिपत्याचा प्रश्न यौगंधरायणानें तांतडीनें हातीं घेतला. 'मगधराजाला आम्हीं आपलासा करून घेतला आहे' असें त्यानें चंडमहासेनाला कळविलें.

चंडमहासेनाकडून उत्तर आलें कीं "आतां वेळ गमावूं नका. लवकर उद्योगाला लागा."

गंगायमुनांमधील प्रदेशामध्यें आरुणीला शक्य तितकें आंत ओढून घ्यावें, त्यानें भारतवर्षांतील जे लोक आपल्या नोकरीला ठेवलेले आहेत त्यांना फितूर करावें आणि मग त्याच्यावर एकदम सर्व बाजूंनीं हल्ला करून त्याचा फडशा उडवावा असा त्याच्याविरुद्ध जूट करणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा विचार ठरला.

आरुणि हा पौरव राज्याच्याच सीमेवर तळ देऊन राहिल्यामुळें पुढें होणारें युद्ध हें मुख्यत्वेंकरून आरुणि आणि वत्सराज उदयन यांजमधील युद्ध होतें आणि त्या युद्धांत भाग घेणारे इतर सत्ताधारी हे वत्सराजाचे साह्यकर्ते होते. वत्सराजाकडे इतर राजांचें पुढारीपण अशा रीतीनें आपोआपच येत होतें. यौगंधरायणाला तें इष्ट होतें आणि वत्सराजाकडे एकदां आलेलें पुढारीपण पुढेंहि टिकवून धरावयाचें हा त्याचा डाव होता.

यौगंधरायणाचे आणि चण्डमहासेनाचे हुशार हेर आरुणीच्या देशी सैन्यांत फितुरी पेरूं लागले. मगधराज आपलें सैन्य सिद्ध करूं लागला. चण्डमहासेनानें आपल्या सैन्याची सिद्धता केली. कोसलराजानेंहि आपलें सैन्य हालविलें.

मगधराज कोसलराज आणि वत्सराज यांचीं गजदळें मोठीं होतीं. अवंतिराजाचें अश्वदळ मोठें होतें. आरुणिपाशींहि अश्वदळ मोठें होतें. गजदळ त्याच्यापाशीं मुळींच नव्हतें म्हटलें तरी चालेल.

आपल्या सैन्यांत शत्रूंनीं फितूर पेरला असेल अशी आरुणीला कधीं शंकादेखील आली नाहीं. हखामणी सम्राटांच्या सेनासागरांत भारतीय, ग्रीक, पारसीक, बावेरुवीय, माद, पार्थव, अर्मिनीय वगैरे भिन्न भिन्न राष्ट्रांतलेच लोक होते. त्यांनीं हखामणींना आजवर जे विजय मिळवून दिले त्या विजयांच्याच धुंदींत अजुन सेनापति आरुणि होता. भारतीय राजांच्या गजदळांची त्याला मुळींच भीति वाटत नव्हती. आतांपर्यंत त्याचा हत्तींशीं जो थोडा बहुत संबंध आला तो पंजाबांतील हलक्या प्रतीच्या हत्तींशीं आला; आणि तेवढ्यावरूनच गजदळांविषयीं त्यानें आपलें मत बनविलेलें होतें.

आपण ज्या राजेरजवाड्यांकडे आणि इतर सत्ताधाऱ्यांकडे खलिते रवाना केले; त्यांतील एकदेखील आपल्या स्कंधावारांत येऊन हजर झाला नाहीं म्हणून सेनापति आरुणि संतप्त झाला. आर्यावर्तांतले सर्व सत्ताधारी त्याला भयंकर राजद्रोही वाटले. या भयंकर राजद्रोह्यांचें पारिपत्य करणें हें दारयवहू महाराजांचा एकनिष्ठ बद्रक या नात्यानें आपलें पवित्र कर्तव्य होय असें त्याच्या मनानें घेतलें. या भयंकर राजद्रोह्यांपैकीं प्रत्येकाला जिवंत पकडून त्याचे मी नाककान कापीन, त्याचे डोळे फोडीन, जीभ छाटीन, आणि त्याच्याच नगरांत त्याच्या प्रासादापुढें त्याला मी सुळी देईन अशी त्यानें प्रतिज्ञा केली. हखामणी सम्राटांपूर्वींचे असुर राजे अपराध्यांना जिवंत सोलीत असत. हखामणी सम्राटाशीं द्रोह करणारांना ती आसुरी शिक्षा दिल्यास वावगें होणार

नाहीं असेंहि एकवार त्याच्या मनांत आलें. पण असली शिक्षा देण्याचा अधिकार आपणास नाहीं या जाणीवेनेंच तो त्या शिक्षेचें पुनरुज्जीवन करण्यास धजला नाहीं.

पारसीकसेनापति आरुणीचा लष्करी तळ आणि पौरवराज्य यांच्या दरम्यान यमुनानदी होती. पौरवराजा हा एक बडा गवय्या आहे असें आरुणीनें ऐकलें होतें. गवय्या हा लढवय्या क्वचितच असतो असा त्याचा समज होता. तथापि पौरवराजाचा सेनापति जर चांगला हुशार असला तर आपणाला तो लवकर दाद देणार नाहीं; म्हणून पौरवराज्याच्या लष्करी सामर्थ्याची प्रथम थोडी चांचणी घेऊन पहावी असा त्यानें विचार केला.

त्यानें आपल्या सैनिकांच्या टोळ्या पौरवराज्यांत लूटफाट करण्यासाठीं पाठविण्यास सुरवात केली. त्या टोळ्यांनीं पौरवराज्यांत शिरून कोठें लुटालूट केली, कोठें मारहाण चालविली आणि कोठें रक्तपातहि केला. तथापि त्या टोळ्यांना म्हणण्यासारखा प्रतिकार असा कोणीच केला नाहीं. पारसीकसैनिकांना पाहून पौरवराज्यांतले रहिवासी पळ काढीत नि रानावनांतून दडून बसत. पारसीकसैनिकांच्या कोठें कोठें पौरव-सैनिकांबरोबरदेखील चकमकी झाल्या. परंतु प्रत्येक चकमकींत पारसीक सैनिकच विजयी झाले आणि पौरवसैनिक जीव घेऊन पळण्याच्या कामांत मात्र पटाईत दिसले !

यमुनाकांठानजीकच्या पौरव मुलखांत धुमाकूळ घालून परत येणाऱ्या पारसीकटोळ्यांचे नायक वेळोवेळीं सेनापति आरुणीकडे जे वृत्तांत सादर करीत त्यांवरून त्या पारसीकसेनापतीचा असा ग्रह झाला कीं पौरवराज्यांतले लोक पांचनदांइतपतदेखील शूर नाहींत.

" त्यांना आपण तेव्हांच जिंकूं ! " आरुणि उल्हासून म्हणाला " आणि आमचा खलिता न मानणाऱ्या त्यांच्या गवयी राजाला त्याला बदसल्ला देणाऱ्या त्याच्या प्रधानाला नि सेनापतीला पौरवांच्य राजधानींत राजवाड्यापुढें सुळीं देऊं ! असें केलें म्हणजे हिंदावांतील सगळ्या राजांना आमची चांगलीच दहशत बसेल आणि लोटांगण घालीत ते आपसुख आमच्यापुढें येतील ! "

आपल्या गैरहजेरींत उज्जयिनीच्या राजानें मथुरेवर हल्ला करण्याचे धाडस केलेंच तर त्याची खोडकी जिरविण्यासाठीं म्हणून आरुणीनें कांहीं सैन्य मथुरानगरीपाशीं ठेवून दिलें, त्याच्यावर आपला एक भरवशाचा अधिकारी नेमला, आणि बाकीचें सर्व सैन्य आपणाबरोब घेऊन त्यानें यमुनानदी ओलांडली. पौरवांचा अंतर्वेदींतील मुलु काबीज करीत करीत मोठ्या झपाट्यानें तो आग्नेयीस चालला लवकरच तो कौशांबीवर येऊन थडकणार असा सुमार दिसूं लागला परंतु पार्सदेशाच्या महापराक्रमी महाराजाचा तो हावभरी सेनापति जसजसा पुढें जात होता तसतसा तो आणि त्याचे सैनिक हे शत्रूंच्य जाळ्यांत अधिकाधिक गुंतत होते.

अवंतिराज्य आणि मथुरेच्या शूरसेनांचें राज्य यांच्या दरम्यान अरण्य होतें. आरुणि अंतर्वेदींत घुसला तेव्हांपासूनच अवंतिराजाचे सैन्य सेनापति शालंकायनाच्या नेतृत्वाखालीं त्या अरण्यांतून हलके हलके मथुरेकडे सरकत होतें. आरुणि पूर्वेकडील राजांशीं लढण्यांत गुंतलेला असतांना मथुरा येथील त्याच्या ठाण्याचा पार विध्वंस करावा सिंधुपलीकडील पारसीकसाम्राज्य व आरुणि यांजमधील दळणवळण तोडावें, आणि मथुरेंत पुन्हा शूरसेनांची स्थापना करावी अस

अवंतिराज चंडमहासेन याचा डाव होता. त्याचा हा डाव वत्सराज, मगधराज आणि कोसलराज या तिघांनाहि पसंत होता.

अंतर्वेदींत कौशांबीच्या वायव्येस कांहीं कोसांच्या अंतरावर वत्सराजानें सोयीस्कर असें एक ठिकाण पाहून ठेवलें होतें. पारसीक-सेनापतीला फसवून त्या ठिकाणीं आणतां आलें तर तेथें तो आणि त्याचें सैन्य यांचा पूर्णपणें फडशा पाडतां येईल अशी वत्सराज उदयनाला खात्री वाटत होती.

पारसीकसेनापतीला त्या ठिकाणीं आणण्याचें काम वत्सराज उदयनाचा सेनापति रुमण्वान् यानें आपल्या आंगावर घेतलें होतें, आणि तें काम तो मोठ्या कुशलतेनें बजावीत होता.

वत्सराज उदयनानें पसंत करून ठेवलेल्या ठिकाणाच्या आग्नेयीस वत्सराजाचें शेलकें सैन्य होतें आणि तें सारें खास वत्सराजाच्या हुकमतीखालीं होतें, त्या ठिकाणच्या ईशान्य बाजूला मगधराजाचें सैन्य होतें. त्या सैन्यावर मगधाचा युवराज बिंबिसार ऊर्फ दर्शक हा मुख्य अधिकारी होता. त्या ठिकाणाच्या वायव्येस गंगेपलीकडे कोसलराजाचें सैन्य होतें. या तीन सैन्यांच्या मध्यें पारसीकसेनापतीला त्याच्या सैनिकांसह ओढून आणण्याची कामगिरी रुमण्वानाला पार पाडावयाची होती.

रुमण्वानानें आपले सैनिक पारसीक सेनापतीच्या तोंडावर ठेवले होते. कोठेंहि गाडून उभे न राहतां धांवती लढाई देत देत आरुणीला सारखें पुढें पुढें ओढीत आणावयाचें हें त्याचें काम होतें; आणि हें काम ते समाधानकारक रीतीनें करून दाखवीत होते. पारसीक-सेनापति आरुणि हा त्यांच्याकडून पुढें पुढें ओढला जात असतांना

असें समजत होता कीं आपण पौरवराजाच्या शेंदाड शिपायांना पिटाळीत चाललों आहोंत आणि लवकरच पौरवराजधानीवर पारसीकांचा विजयी झेंडा फडकावयास लावण्याचें श्रेय आपणास लाभणार आहे !

कोसलराजाचें सैन्य गंगापार ज्या ठिकाणीं होतें त्या ठिकाणाच्या पुढें आरुणि निघून जातांच तें सैन्य गंगा तरून अंतर्वेदींत आलें आणि त्यानें आरुणीचा मागें जाण्याचा मार्ग अडवून धरला.

इष्ट त्या ठिकाणापर्यंत आरुणि पुढें ओढला जातांच रुमण्वानानें पूर्वीं ठरल्याप्रमाणें वत्सराज आणि मगधाचा युवराज यांजकडे स्वार पिटाळून त्यांना कळविलें कीं पारसीक शत्रु इष्ट त्याच स्थानीं प्राप्त झालेला आहे. त्याच्या पदरीं असलेले सर्व भारतीय सैनिक आपणाला अनुकूल आहेत. युद्धाला आरंभ होतांच ते आपणाला मिळतील आणि पारसीकांवर हत्यार चालू करतील. भारतवर्षाला राहूप्रमाणें ग्रासणाऱ्या या परकीय शत्रूचें पारिपत्य करण्याचा समय हाच आहे.

याप्रमाणें सूचना मिळतांच वत्सराज आणि मगधाचा युवराज हे आपापल्या सैन्यासह पारसीकांवर चाल करून निघाले.

रुमण्वानाच्या सैनिकांना आतां आपली युद्धपद्धति बदलणें अवश्य झालें होतें. रुमण्वानाचें सैन्य पळत पळत लढण्याचें सोडून रणांत आतां गाडून उभें राहिलें होतें आणि शत्रूशीं प्राणपणानें लढत होतें. ज्यांना आपण पळपुटे समजत होतों तेच लोक आतां आपणाबरोबर निकरानें लढावयास उभे राहिले आहेत असें दिसतांच आरुणीला मोठें आश्चर्य वाटलें. तितक्यांतच त्याचे भारतीय सैनिक त्याच्यावर

उलटले आणि त्याच्या परदेशी सैनिकांवर तुटून पडले. त्याच्या सैन्याच्या उजव्या बगलेवर वत्सराजाचा हल्ला झाला आणि डाव्या बगलेवर मगधाच्या युवराजाचा हल्ला झाला.

आपणाला शत्रूंनीं फसविलें, स्वतःला मोठे हुशार समजणारे आपण शत्रूंकडून फसविले गेलों, आणि संकटांत सांपडलों, याची आरुणीला आतां जाणीव झाली. तथापि तो डगमगून जाणारा नव्हता. आपल्या पारसीकादि परदेशी सैनिकांना तो धीर देऊं लागला आणि शत्रूंबरोबर स्वतः लढूं लागला.

एकाएकीं त्याच्यासमोर वत्सराजाचा 'विजयकुंजर' नामक हत्ती आला.

"दारुणकर्मदक्ष आरुणे!" हत्तीवरील हौद्यांत सज्जचाप असलेला वत्सराज त्याला म्हणाला, "उभा रहा! उभा रहा!"

"तूं कोण आहेस?" आरुणीनें त्याला विचारलें.

"पौरवांचा राजा उदयन म्हणतात तो मी!" वत्सराज उत्तरला.

"तूं लढवय्या नाहींस! गवय्या आहेस!" आरुणि म्हणाला, "गवय्यांबरोबर आपण लढत नसतों!"

"माझ्या राज्यावर तूं चाल करून आलास!" वत्सराज म्हणाला, "माझ्या शेकडों लोकांचे तूं नाहक प्राण घेतलेस! आणि माझ्याबरोबर लढत नाहीं म्हणतोस? हें तुझें म्हणणें कोण ऐकेल? तूं लढ अगर नको लढूं, आम्हीं पौरव या संपूर्ण भारतवर्षाचे पुरातन काळापासून देवनिर्मित रक्षक आहोंत. भारतवर्षाची यत्किंचित् देखील कोणीं आगळिक केलेली आम्हांला खपत नाहीं. आगळिक करणाराचें शासन करणें हें आम्हीं आमचें पवित्र कर्तव्य समजत आलेले आहोंत. तूं या भारतवर्षाची नुसती आगळिक नव्हे, तर घोर असे अनेक अपराध

कलेले आहेस, आणि त्या घोर अपराधांबद्दल तुला देहान्त प्रायश्चित्त देण्यासाठीं मी येथें प्राप्त झालेला आहें, समजलास ? माझ्या हातून आज तूं जिवंत सुटूं शकत नाहींस ! ”

आरुणि यावर कांहीं बोलला नाहीं. एक तीक्ष्ण बाण त्यानें वत्सराजावर उत्तरादाखल सोडला ! वत्सराजाच्या कवचावर आदळून तो बाण भूमीवर पडला.

“ गवय्याशीं न लढण्याचा तुझा निश्चय तूं मोडलास तर ! ” वत्सराज हंसून म्हणाला, आणि आरुणीवर त्यानें शरवृष्टि चालू केली.

वत्सराज आणि आरुणि यांच्या युद्धांत वत्सराजानें अखेरीस तीक्ष्ण धारेचा एक अर्धचंद्र बाण सोडून त्या पारसीकसेनापतीचा शिरच्छेद केला व आपली प्रतिज्ञा शेवटास नेली.

संस्कृत भाषेमध्यें असुरवाचक असे जे शब्द आहेत त्यांतील ‘ पूर्वदेव ’ आणि ‘ सुरद्विष् ’ हे शब्द पारसीकांना लागू पडणारे आहेत. पारसीक लोक प्राचीन काळीं ईश्वरास ‘ देव ’ (दएव) असें म्हणत असत. पुढें त्यांच्यावर असुरोपासक असुर लोकांचें वर्चस्व झालें. त्या वर्चस्वामुळें पारसीकांनीं ईश्वरास ‘ देव ’ म्हणण्याचें सोडून दिलें आणि ‘ अहुर मज्द ’ म्हणजे ‘ असुर महस् ’ असें ते ईश्वराला म्हणूं लागले. देवाला ‘ असुर ’ म्हणावयास सुरवात केल्यामुळें त्यांच्या भाषेंत देव शब्दाला राक्षस असा अर्थ प्राप्त झाला ! पुढील काळांतील खिस्ती आणि महंमदी संप्रदायांच्या लोकांप्रमाणें धर्मप्रसारार्थ दुसऱ्या लोकांचें स्वातंत्र्य नष्ट करण्याचा नाद पारसीकांना लागलेला नव्हता. आपल्या सम्राटाची मर्जी एवढेंच भारतवर्षावर त्यांनीं स्वारी करण्याला कारण होतें. परंतु सम्राटाची मर्जी राखण्यासाठीं त्यांनीं भारतवर्षावर

केलेली स्वारी त्यांना पुरी भोंवली. अंतर्वेदींतील लढाईच्या घनचक्रींत त्यांचा सेनापतीच मारला गेला आणि शत्रूंकडून त्यांची लांडगेतोड करण्यांत आली. रणांतून पळ काढून ज्यांनीं मागें मथुरेकडे जाण्याचा प्रयत्न केला त्यांना वाटेंत कोसलराजाच्या लोकांनीं धरून कापून काढलें.

अन्तर्वेदीमध्यें पारसीकांचा संहार होत असतां तिकडे अवंतिराजाच्या सेनापतीनें पारसीकांच्या मथुरा या लष्करी केंद्रावर हल्ला चढविला आणि तेथील सैनिकांचा फडशा उडविला. मथुरेंत पुन्हा शूरसेनांची स्थापना झाली.

तथापि एवढ्यानेंच पारसीकांचा पुरता बंदोबस्त होण्यासारखा नव्हता. सिंधुनदापासून यमुनेपर्यंत त्यांनीं जो मुलुख काबीज केलेला होता त्या मुलखांतील त्यांचा अंमल पार उखडून टाकणें, तिकडील पूर्वीच्या राजघराण्यांची त्यांच्या पूर्वपदावर पुन्हा स्थापना करणें आणि त्यांना आपल्या संरक्षणाखालीं घेणें अवश्य होतें. हें करण्यासाठीं वत्सराज उदयन आणि त्याचे साह्यकर्ते यांना पंजाबाकडे वळावें लागलें. उदयनानें तेथील जुन्या सत्ताधारी घराण्यांचा उद्धार करून त्यांना संरक्षणाची हमीं दिली व पंजाबावर आपलें वर्चस्व स्थापलें. वत्सराज उदयनाचा हाच उत्तरदिग्विजय होय.

उदयन–पद्मावती–विवाह आणि उदयनानें केलेला आरुणीचा वध या उदयनचरित्रांतील प्रसंगांवर ‘ स्वप्नवासवदत्त ’ नामक विख्यात नाटकाची उभारणी झालेली आहे. भास कवि हा या नाटकाचा कर्ता होय. भास कवीच्या एकंदर नाटकांमध्यें ‘ स्वप्नवासवदत्त ’ हें नाटक उत्कृष्ट म्हणून समजण्यांत येतें.

# ९–उदयनाचा दिग्विजय

पारसीकांच्या स्वारीचा पुरता बन्दोबस्त करण्याच्या उद्योगांतच वत्सराज उदयनाच्या आधिराज्याचा उदय झालेला होता; आणि उत्तर दिशा त्यानें जिंकलेली होती. तथापि आपल्या प्रभूनें एवढ्यावरच संतुष्ट न राहतां पूर्व, दक्षिण आणि पश्चिम या दिशा देखील जिंकाव्या व धर्मराज युधिष्ठिराप्रमाणें भारतचक्रवर्ति व्हावें अशी अमात्य यौगन्धरायणाची इच्छा होती. परंतु यौगन्धरायणाची ही इच्छा पूर्ण होणें वत्सराजाचे श्वशुर अवंतिराज आणि मगधराज यांच्या अनुकूलतेवरच अवलंबून होतें. कारण अवंतिराज आणि मगधराज हेच दोघे विशेष प्रबल असे सत्ताधारी होते. ते दोघे एक झाल्यास त्यांच्यापुढें इतरांचें कांहीं चालण्यासारखें नव्हतें. ही वस्तुस्थिति यौगंधरायण जाणून होता.

पारसीकांच्या स्वारीचें संकट सर्वांवरच असल्यामुळें पारसीकांचें पारिपत्य करण्याच्या कामीं उदयनाच्या श्वशुरांनीं उदयनाला साह्य केलें यांत कांहींच नवल नव्हतें. तसें ते न करते तरच नवल होतें. उदयनानें उत्तर दिशा आपल्या वर्चस्वाखालीं आणली म्हणूनदेखील त्यांना वाईट वाटण्याचें कारण नव्हतें. पंजाबाकडे त्यांचे कसलेच हितसंबंध नव्हते. आपल्या जांवयानें पांचनदांना आपल्या संरक्षणाखालीं घेऊन त्या बाजूकडे म्लेच्छांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांना तोंड देण्याची नसती जबाबदारी मात्र आपल्या शिरावर घेतली असेंच उदयनाच्या उत्तरदिग्विजयासंबंधीं त्यांचें मत झालेलें असेल! उदयनानें पूर्व, दक्षिण आणि पश्चिम या दिशा जिंकावयास निघणें हें मात्र त्यांच्या हितसंबंधांच्या आड येणारें होतें. अवंतिराज दक्षिणापथांतील

अश्मकांवर आपलें वर्चस्व स्थापण्याच्या उद्योगांत होता आणि पश्चिमेस सिंधुनदापर्यंत त्याला आपल्या आधिराज्याचा विस्तार करावयाचा

१ अश्मक हे ' सकलदक्षिणापथेश्वर ' शातवाहनांपूर्वीचे दख्खनचे राजे होत. ते कौरव-पांडवांच्या वेळीं होते आणि उदयनाच्या वेळींहि होते. त्यांच्या राज्याला ' अश्मकविषय ' असें म्हणत. अश्मकविषय म्हणजे स्थूल मानानें आजचा महाराष्ट्र होय. डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर या विद्वान् संशोधकांच्या मतें वाल्मीकिरामायणांत रावणाची बहीण शूर्पणखा हिची जहागीर म्हणून जनस्थानांत जी एक राक्षसवसाहत दाखविलेली आहे त्या वसाहतींतील लोकांतून पुढील काळांत ' अश्मक ' हें राजघराणें निघालें. त्याचे राक्षसी आचारविचार सुटलेले असल्यामुळें त्याची कोणीं राक्षसांत गणना केली नाहीं. रामायणाच्या उत्तरकांडांत राक्षसांसंबंधींच्या कित्येक प्राचीन आख्यायिका संग्रहीत झालेल्या आहेत. त्या विचारांत घेतां डॉ. केतकरांचें मत बरोबर दिसतें. त्या आख्यायिकांवरून लंकेंत प्रथम सालकटंकट राक्षस राज्यकर्ते होते. ते शत्रूपुढें निभाव लागत नाहीं असें पाहून समुद्रापलीकडे निघून गेले. नंतर कांहीं काळानें त्यांच्यांतला सुमाली नामक एक राक्षस समुद्रापलीकडून लंकेंत अगर मलबारांत परत आला व लंकेंत पुन्हा राक्षसराज्य स्थापण्याच्या उद्योगाला लागला. त्याच्या कन्येचा पुत्र रावण यानें लंकेंत पुन्हा राक्षसराज्याची स्थापना केली. या रावणाला शूर्पणखा नांवाची बहीण होती. रावणानें तिच्या नवऱ्याशीं युद्ध करून त्याला युद्धांत मारलें, त्याचें मथुरेचें ( म्हणजे मदुरेचें ) राज्य आपल्या राज्यांत सामील केलें व बहिणीला दूर जनस्थानची जहागीर देऊन ठेवलें. या जहागिरीच्या बंदोबस्तासाठीं जें सैन्य होतें तें खास रावणाचेंच होतें. शूर्पणखेचें नव्हतें. लंकेंतून निघून गेलेले सालकटंकट राक्षस समुद्रापलीकडे अरबस्थान व सोमालीलंड येथें गेलेले असले पाहिजेत. तिकडून इकडे परत आलेला सुमाली म्हणजे वस्तुतः एखादा सोमाली असला पाहिजे. रावणानें लंकेंत राक्षसराज्याची पुन्हा स्थापना केली तेव्हां त्याच्या मदतीला समुद्रापलीकडून पुष्कळ राक्षस आलेले होते. त्यांतच अश्मकांचे पूर्वज असावेत, व त्यांची नेमणूक पुढें जनस्थानांत झाली. आफ्रिकेंतील अबीसीनिया देशांतले आजचे ' अहेरिक ' व इकडे होऊन गेलेले अश्मक हे मूळात एकच असले पाहिजेत.

होता. मगधराजाला अंग, वंग, पौण्ड्र, ओड्र आणि विदेह हे देश आपल्या वर्चस्वाखालीं आणावयाचे होते. या दोघां बलिष्ठ राजांना अनुकूल करून घेतां आलें तरच वत्सराजाचा दिग्विजय पूर्ण होऊं शकेल हें यौगंधरायण ओळखून होता. त्यानें असा विचार केला कीं अवंतिराज आणि मगधराज या दोघांपुढें वत्सराजाच्या दिग्विजयाची संपूर्ण योजना मांडावयाची आणि त्या दोघांचें तिच्यासंबंधीं काय म्हणणें पडतें हें पहावयाचें. या संबंधांत कोसलराजाचेंहि मत अजमावण्याचें त्यानें ठरविलें. कारण जुन्या समजुतीप्रमाणें ऐल आणि ऐक्ष्वाक या दोन वंशांतलेच पुरुष काय ते चक्रवर्ति पदाचे अधिकारी समजले जात. वत्सराज उदयनाचा मूळ पुरुष पूरु हा ऐल वंशांतला असल्यामुळें वत्सराज उदयनदेखील ऐल वंशांतलाच होता आणि त्यामुळें त्यानें चक्रवर्ति व्हावयाचें मनांत आणलें तर त्या पदाला तो अनधिकारी आहे असें इतर राजांना म्हणतां येण्यासारखें नव्हतें. कोसलचा राजा प्रसेनजित् याची गोष्ट तशी नव्हती. तो ऐक्ष्वाक म्हणजे इक्ष्वाकूच्या वंशांतला असल्यामुळें त्याला स्वतःला चक्रवर्ति होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतां येण्यासारखी होती, आणि तशी तो ती बाळगता तर वत्सराज उदयनाला चक्रवर्ति पद प्राप्त करून घेण्याच्या मार्गांत तो एक प्रतिस्पर्धी म्हणून आडवा येता. यासाठीं त्याचेंहि मत अजमावण्याची अमात्य यौगंधरायणाला आवश्यकता वाटली. कोसलराज, अवंतिराज आणि मगधराज या तिघांना वत्सराजाच्या दिग्विजयाची योजना कळवून त्यांचें तिच्या संबंधींचें मत काढून घेण्यासाठीं यौगंधरायणानें तिघांकडे तीन हुशार दूत रवाना केले.

कोसलराजानें कळविलें कीं, “ भारतवर्षांतील जुनीं राजघराणीं

सारखीं मावळत आहेत, आणि नवीं नवीं घराणीं सारखीं उदय पावत आहेत. ऐक्ष्वाक आणि ऐल हीं दोनच प्राचीन राजघराणीं आजवर टिकाव धरून राहिलेलीं आहेत. त्यांची परस्परांशीं स्पर्धा असावी हें मला योग्य वाटत नाहीं. चक्रवर्तीपदाची इच्छा मी धरली तरी ती सफल होणें दुरापास्त आहे हें मी पूर्णपणें जाणतों. अवन्तिराज, मगधराज यांच्यासारखे प्रबळ राजे ज्यांचे आप्त आहेत त्या वत्सराजांनीं चक्रवर्तिपदाची इच्छा धरली तर ती मात्र सफल होणें शक्य आहे. तरी आपल्या प्रबल आप्तांना अनुकूल करून घेऊन त्यांनीं ती अवश्य सफल करावी. नुकताच पारसीकांनीं इकडे येऊन जो धूमाकूळ घातला त्यावरून आपणाला जर कांहीं बोध घेतां येण्यासारखा असेल तर तो हाच कीं परकीय आक्रमणाला तोंड देण्यासाठीं भारतवर्षांतील सर्व क्षत्रियांची एका पुढाऱ्याच्या नेतृत्वाखालीं जूट झाली पाहिजे. सर्व क्षत्रियांचे पुढारी व्हावयाला ऐल हेच सर्वतोपरी लायक आहेत. चक्रवर्ति जरासंध हा ऐलच होता. त्याच्यामागून चक्रवर्ति झालेला पंडुपुत्र युधिष्ठिर हादेखील ऐलच होता, आणि युधिष्ठिर वनवासांत असतांना चक्रवर्तिपदाचा उपभोग घेणारा धार्तराष्ट्र दुर्योधन हाहि पण ऐलच होता. शाकलाधिपांच्या आगमनापर्यंत भारतचक्रवर्तिपद ऐलांकडेच होतें. शाकलाधिपांचा उच्छेद करून आपलें चक्रवर्तिपद पुन्हा संपादन करण्यासाठीं ज्यांनीं स्वतःच्या प्राणाचा बलि दिला ते बृहद्रथपुत्र सहस्रानीक महाराज ऐलच होते. वत्सराज उदयन हे त्यांचेच पराक्रमी पौत्र आहेत. भगवान् विष्णूनें पापी राहूचा त्याचप्रमाणें वत्सराजांनीं पारसीकसेनापति दारुणकर्मदक्ष आरुणि याचा शिरच्छेद करून आपला पराक्रम सर्व जगाला दाखविलेला आहे. भारतचक्रवर्ति

व्हावयाला वत्सराजच सर्वस्वी योग्य असे आहेत. पूर्वदिग्विजयाच्या कामीं वत्सराजांना अवश्य तें साहाय्य करावयास मी सिद्ध आहें."

अवंतीच्या चण्डमहासेनानें कळविलें कीं, "वत्सा वासवदत्ता आमची लाडकी; द्रुपदकन्या याज्ञसेनीप्रमाणें भारतसम्राज्ञी होण्याचें भाग्य जर तिला लाभलें तर आम्हांला त्यांत आनंदच आहे. ऐल किंवा ऐक्ष्वाक यांनाच तेवढा चक्रवर्तिपदाचा अधिकार आहे, इतरांना तो नाहीं असें मात्र आम्हांला वाटत नाहीं. राज्य काय किंवा साम्राज्य काय, जो संपादील त्याचें आहे. मग तो ऐल किंवा ऐक्ष्वाक, असो वा नसो! वत्सराज उत्साही आहेत; उत्साही पुरुषांना असाध्य असें कांहींच नाहीं; साम्राज्यलक्ष्मी उत्साही पुरुषांच्याच भजनीं असते; म्हणून चक्रवर्तिपद संपादन करण्याचा उद्योग वत्सराजांनीं अवश्य हातीं घ्यावा. त्या उद्योगांत आमचें त्यांना साह्य होईलच. मात्र वत्सराजांच्या साम्राज्यांत आमच्या आजच्या मांडलिकांवर आमचाच ताबा रहावा आणि दक्षिणापथांतील कृष्णानदीपर्यंतचा प्रदेश हा आमच्या वर्चस्वाचें क्षेत्र म्हणून समजण्यांत यावा."

मगधाच्या क्षत्रौजानें कळविलें कीं "पारसीकसेनापतीला रणांगणांत समोरासमोर गांठून आमच्या जामातांनीं त्याचा शिरच्छेद केला या त्यांच्या अतुलपराक्रमामुळें भारतवर्षाचे ते आजच चक्रवर्ति झालेले आहेत. चक्रवर्तिपद संपादण्यासाठीं त्यांना आणखीं दिग्विजय करण्याची आवश्यकता आहेच असें नाहीं. आतां इतकें खरें आहे कीं तरुण मंडळी ही हौशी असते; आणि आमचे जामात तरुण असल्यामुळें हौशी असणें स्वाभाविक आहे. दिग्विजयाच्या मिषानें भारतवर्षांत प्रवास करण्याचीच जर त्यांची हौस असेल तर

ती वावगी आहे असें कोण म्हणेल ? ती त्यांनीं खुशाल पुरवून घ्यावी असेंच आम्हीं म्हणूं ! याकामीं त्यांना आमच्याकडून जें साह्य लागेल तें देण्यास आम्हीं तयार आहों. त्यांना चक्रवर्ति म्हणून अभिषेक होतांच आम्हीं आमच्या मांडलिकांसह त्यांना सार्वभौम म्हणून मान देऊं आणि सार्वभौम या नात्यानें त्यांनीं केलेल्या आज्ञा मनःपूर्वक पाळूं. यांत अंतर होणार नाहीं. आमचे जामात सार्वभौम झाल्यानंतर त्यांच्या साम्राज्याचे राज्यव्यवस्थेच्या सोयीसाठीं वेगवेगळे भाग करण्यांत येतीलच. त्यांतील महत्त्वाच्या अशा एका भागावर आमच्या शैशुनाग घराण्यांतील राजपुत्राची सम्राटांचा अधिकारी म्हणून नेमणूक व्हावी हें आमचें म्हणणें मान्य करण्यांत आलें म्हणजे आमच्या जामातांच्या साह्याला आम्हीं केव्हांहि तयार आहोंत असें समजून चालावें."

अमात्य यौगंधरायणानें कोसलराज, अवंतिराज, आणि मगधराज या तिघांकडून आलेल्या उत्तरांचा नीट विचार केला. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं या तिघांच्या म्हणण्याला मान्यता देऊन आणि त्यांची मदत घेऊन प्रथम दिग्विजयाचें काम उरकून घ्यावें. आपल्या महाराजांना एकदां चक्रवर्ति म्हणून अभिषेक झाला म्हणजे पौरवांची वरिष्ठ सत्ता खंबीर करण्याच्या उद्योगाला लागतां येईल, आणि एकदां ती सत्ता खंबीर झाली म्हणजे मग दुसऱ्या कोणाला कोणत्याहि प्रकारची गडबड करतां येणार नाहीं.

यौगन्धरायणाच्या सूचनेवरून सेनापति रुमण्वानानें पौरव सैन्याची सिद्धता केली. कोसल, मगध व अवन्ति येथील सैन्यें वत्सराजाच्या मदतीला आलीं.

आपलें आणि आपल्या आप्तांचें सैन्य बरोबर घेऊन वत्सराज उदयन

दिग्विजयासाठीं बाहेर पडला. काशीचा राजा संधि साधून पौरवराज्याला वारंवार उपद्रव देत असल्यामुळें वत्सराजाचा काशीराजावर विशेष राग होता. त्यानें प्रथम काशीराज्यावरच स्वारी केली. काशीराज युद्धाला उभा राहिला. परंतु वत्सराजाबरोबर असलेल्या प्रचंड सैन्यापुढें त्याच्या सैन्याचा निभाव लागला नाहीं. अखेरीस तो वत्सराज उदयनाला शरण आला. उदयनाला त्यानें करभार दिला आणि त्याचें सार्वभौमत्व मान्य केलें. *

वत्सराज उदयन काशीवरून पुढें पूर्वेस कामरूप देशापर्यंत दिग्विजय करीत गेला. कामरूप देशावरून तो खालीं वंग देशांत आला. वंग देशाच्या समुद्रकिनाऱ्यावर त्यानें आपला विजयस्तंभ उभारला. येथपर्यंत कोसलराजाचें सैन्य त्याच्या बरोबर होतें. पूर्वदिग्विजय पूर्ण झाल्यामुळें तें आतां परत स्वदेशीं गेलें. वत्सराजानें पौरव, आवंत्य व मागध सैन्यांसह पुढें कलिंगदेशाकडे कूच केलें आणि कलिंगदेशांतील राजांना शरण यावयास लावून त्यांच्यापासून कर म्हणून हत्ती घेतले. पूर्वसमुद्राला अनेक मुखांनीं मिळणारी गोदावरी नदी उतरून त्यानें दक्षिणेकडील चोलमंडलांत प्रवेश केला. चोलराजधानी कावेरी नदीच्या दक्षिणेस सांप्रतच्या त्रिचनापल्लीजवळ होती. वत्सराजानें कावेरी ओलांडून चोल राजाला जिंकलें आणि तो पश्चिमसमुद्राकडे वळला. मुरला नदीच्या प्रदेशांतील लोकांना नमवून दक्षिणापथांतून तो उज्जयिनीस आला. ज्या

---

* उदयनाचा मांडलिक बनून काशीराजानें या वेळीं आपला बचाव केला खरा, पण जित्याची खोड मेल्याखेरीज कधींच जात नसते. पुन्हा त्यानें आपले पूर्वीचे दुष्ट चाळे सुरु केले. तेव्हां वत्सराजानें काशीराज्य खालसा केलें. काशीराज्याच्या मुलखाची वत्सराज, कोसलराज आणि मगधराज या तिघांत वांटणी झाली.

उज्जयिनींत मागें तो बन्दिवान् होऊन आलेला होता त्याच उज्जयिनींत आतां त्यानें राजाधिराज या नात्यानें प्रवेश केला. त्याच्या दोन्ही राण्या, वासवदत्ता व पद्मावती या त्यावेळीं उज्जयिनींतच होत्या. वासवदत्ता आपल्या माहेरीं आलेली होती आणि येतांना आपल्या सवतीला तिनें आपल्या वडिलांची ऐश्वर्यसंपन्न राजधानी दाखविण्यासाठीं बरोबर आणलें होतें.

उज्जयिनीमध्यें चण्डमहासेनानें केलेला सत्कार स्वीकारून वत्सराज उदयन पश्चिमदिग्विजयाला निघाला. त्यानें लाटदेशाच्या राजाला आपला मांडलिक बनविलें आणि सिन्धुदेशावर स्वारी करून तेथील राजांना आपल्या वर्चस्वाखालीं आणलें.

अशा रीतीनें संपूर्ण दिग्विजय करून वत्सराज उदयन कौशाम्बीस परत आला आणि भारतचक्रवर्ति या नात्यानें त्यानें पुन्हां आपणाला अभिषेक करून घेतला. त्याप्रसंगीं त्यानें राणी वासवदत्तेचा बंधु गोपालक याला विदेहदेशाचा अधिकारी नेमलें आणि पद्मावतीचा बंधु बिंबिसार याला चेदिदेशाचा अधिकारी केलें. परंतु बिंबिसार त्या अधिकारावर फार दिवस राहिला नाहीं. बिंबिसाराचा पिता क्षत्रौजा हा ख्रिस्तपूर्व ५१२ या वर्षीं मृत्यु पावला आणि त्यामुळें बिंबिसार हा चेदिदेशाचा अधिकारी न राहतां मगधाचा राजा झाला.

## १०—उदयनाचें साम्राज्य

भारतवर्षांतील प्राचीन काळचीं साम्राज्यें म्हणजे मुख्यतः परकीयांच्या आक्रमणांपासून स्वतःचा बचाव करतां यावा या उद्देशानें अस्तित्वांत आलेले राज्यसंघ होत. संघामध्यें जितकीं अधिक राज्यें

सामील असतील तितकें तें साम्राज्य मोठें असे. सर्वांत बलिष्ठ असा राजा या ‘ साम्राज्य ’ संज्ञक राज्यसंघाचा पुढारी असे, व त्यालाच सार्वभौम, सम्राट्, चक्रवर्ति अगर राजाधिराज असें म्हणत. त्यानें आपली बलिष्ठता इतर राजांना जिंकून सिद्ध केलेली असे. आपली बलिष्ठता सिद्ध करण्यासाठीं एखाद्या चक्रवर्तिपदेच्छु राजानें बाहेर पडणें या प्रकारालाच दिग्विजयार्थ निघणें अशी संज्ञा होती. या दिग्विजयामध्यें मारीन किंवा मरेन अशा प्राणपणानें युद्धें क्वचितच होत. दिग्विजयाला निघालेला राजा बलिष्ठ आहे असें पाहून कांहीं राजे युद्धाचा प्रसंग न आणतांच त्याचें वर्चस्व कबूल करीत आणि त्याला करभार देत. कांहीं राजे त्याच्याशीं युद्ध करून तो खराच बलिष्ठ आहे अशी आपली खात्री करून घेत आणि नंतर त्याचें वर्चस्व कबूल करून त्याला करभार देत. अशा रीतीनें हे ‘ साम्राज्य ’ नामक राज्यसंघ तयार होत. संघाचा नेता असणारा राजा हा सम्राट्, आणि संघांतील इतर राजे हे त्याचे मांडलिक, अशी स्थिति होती. मांडलिक राजे सम्राटाला करभार देत आणि युद्धांत त्याला ससैन्य मदत करीत. संघांतील प्रत्येक राज्य आपला कारभार स्वतंत्रपणें चालवी. अन्तर्गत कारभाराच्या बाबतींत वरिष्ठ सत्तेचें त्याच्यावर दडपण नव्हतें. संघांतील एखादा राजा संघांतून फुटून निघण्यासाठीं टपलेला, वारंवार वरिष्ठ सत्तेवर उलटणारा, नेहमीं विरुद्धपक्षाशीं कारस्थानें करून संघावर बाहेरून संकटें आणणारा असा निघाला तरच त्याचें राज्य खालसा करण्याची पाळी सम्राटावर येई. सम्राट्पदाचा मान बहुत करून ऐल किंवा इक्ष्वाकुवंशांतील राजांकडे असे.

वत्सराज उदयनानें स्थापन केलेलें साम्राज्य हें याच नमुन्याचें

साम्राज्य होतें. उदयन हा पौरव होता. पौरव हे ऐल वंशांतलेच असल्यामुळें उदयनाला सम्राट्पद मिळाल्यास जुनी परंपरा मोडेल अशी हाकाटी कोणालाच करतां येण्यासारखी नव्हती. वास्तविक पाहिलें तर शाकलाधिप सम्राट् झाले त्या वेळींच जुनी परंपरा मोडली होती; आणि उदयन पौरव हा सम्राट् झाल्यानें जुनी परंपरा पुन्हा चालू होणार होती. शाकलाधिपांच्यापूर्वी पौरवच सम्राट् होते. यामुळें, आणि उदयनानें विशेषतः अवंतिपति व मगधराज या दोन प्रबळ शेजाऱ्यांशीं नातें जोडून त्यांना आपलेसे केल्यामुळें तो फारसे प्रयास न पडतां साम्राज्य स्थापन करूं शकला. पारसीकसेनापति आरुणि याला त्यानें कंठस्नान घातलें त्या वेळींच त्याचा पराक्रम जाहीर झालेला होता. त्यानंतर तो दिग्विजयाला निघाला तेव्हां त्याच्या पराक्रमाची आणखीं परीक्षा करण्याचें इतर राजांना तादृश कारण नव्हतें. त्यांनीं उदयनाचें वर्चस्व मान्य करून त्याला करभार दिला आणि उदयनसाम्राज्य अस्तित्वांत आलें. उदयनसाम्राज्य कितीहि विस्तृत असलें तरी त्यांत सम्राटाच्या खास मालकीचा असा मुलुख थोडाच होता. साम्राज्याचा एकेक विभाग म्हणजे एकेक राज्य होतें आणि त्या राज्याचा कारभार तेथील स्थानिक राजा स्वतंत्रपणें पहात होता. करभार आणि जरूर तर युद्धप्रसंगीं सैन्याची मदत यांपलीकडे त्या विभागांतून सम्राटाला दुसऱ्या कशाचीहि अपेक्षा करतां येण्यासारखी नव्हती. वत्सराज उदयनाशीं समकालीन असा जो हखामणी सम्राट् पहिला दारयवहु, त्याचें साम्राज्य वेगळ्या प्रकारचें होतें. त्यांत मांडलिक असा एकच राजा होता. हखामणी घराण्यांतला पहिला सम्राट् कुरु यानें आपलें राज्य वाढविण्याच्या उद्योगांत असतांना जिंकलेलीं राज्यें आपल्या

वर्चस्वाखालीं राखण्याचें सोडून तीं खालसा करण्याचा सपाटा लावला व त्याचेंच अनुकरण त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनीं केलें. हखामणी सम्राट् हे स्वतःला ‘ राजांचे राजे ’ म्हणवीत असले तरी वस्तुतः ते राजांचे राजे नव्हते. जिंकलेल्या राजांची बिरुदावलि स्वतःला लावण्याची त्यांना खोड होती. त्यांनीं जिंकलेला माद्भूपति हा राजांचा राजा होता. त्याचें बिरुद ‘ राजांचा राजा ’ हें हखामणींनीं धारण केलें इतकेंच. हखामणी हे सर्वराजोच्छेत्ते होते. जिंकलेल्या राजांचे मुलुख ते खालसा करीत असल्यामुळें त्यांचें साम्राज्य म्हणजे विस्तृत असें एक माहाराज्य होतें. त्या माहाराज्याचा एकेक विभाग म्हणजे एकेक सुभा होता. हखामणींनीं नेमलेले सत्रप नांवाचे अधिकारी त्या सुभ्यांचा कारभार पहात. हखामणी-साम्राज्याच्या धर्तीचें साम्राज्य स्थापन करण्याचा उद्योग वत्सराज उदयनाच्या पश्चात् इकडेहि करण्यांत आला, हखामणींचें अनुकरण इकडे प्रथम शैशुनाग करूं लागले, आणि शैशुनागांनीं आरंभिलेलें कार्य पुढें नंदांनीं पूर्ण केलें. हखामणींचें अनुकरण करण्याच्या प्रवृत्तीनें भारतवर्षानंतर चीन देशाकडे आपला मोर्चा वळविला.

वत्सराज उदयनानें केलेली साम्राज्य स्थापना म्हणजे पूर्वीच्या पौरव साम्राज्याचें पुनरुज्जीवन होतें; आणि पौरवसाम्राज्याचें पुनरुज्जीवन झालें यामुळेंच महाभारत या भारतवर्षाच्या राष्ट्रीय ग्रंथाची निर्मिति होऊं शकली.

आरंभीं हा ग्रंथ म्हणजे एक पद्यबद्ध बखर होती. तींत कौरव-पांडवांच्या युद्धाची हकीगत असून तिचें नांव ‘ जय ’ असें होतें. ‘ भाऊसाहेबांची बखर ’ आणि रघुनाथ यादवकृत ‘ पानिपतची बखर ’ या मराठींतील बखरींवरून प्राचीन काळांतील ‘ जय ’ नामक बखरीचें

स्वरूप कशा प्रकारचें असूं शकेल याची कांहींशी कल्पना होईल. या ‘ जय ’ नामक बखरींत ज्या योद्धयांचीं नांवें येत होतीं त्या योद्धयांची व त्यांच्या घराण्यांची माहिती ऐकण्याविषयीं लोक उत्सुक असल्यामुळें ती माहिती त्या बखरींतच समाविष्ट करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली व ‘ जय ’ बखर वाढविण्यांत येऊन तिला ‘ भारत ’ असें नांव देण्यांत आलें. हा प्रकार उदयनपूर्व काळांत—कदाचित् शाकलाधिप घराण्याच्याहिपूर्वी—घडून आला. भारत हा सुमारें चोवीस हजार श्लोकांचा ग्रंथ होता. वत्सराज उदयनानें पौरवसाम्राज्याची पुन्हा स्थापना केल्यानंतर या चोवीस हजार श्लोकांच्या भारतामध्यें अनेक उपाख्यानें व विविध विषयांची माहिती यांचाहि समावेश करण्यांत येऊं लागला. त्यामुळें चोवीस हजार श्लोकांचें भारत वाढतां वाढतां शेवटीं त्याचें लक्ष श्लोकात्मक ‘ महाभारत ’ बनलें आणि त्याला ज्ञानकोशाची कळा आली ! भारताचें महाभारत बनविण्याची क्रिया पुराणिकाच्या धंद्यावर निर्वाह करणाऱ्या सूतांच्या हातून मुख्यतः झाली. पुराणकथनप्रसंगीं चौकस श्रोत्यांना सांगावी लागणारी विविध प्रकारची अवांतर माहिती आपल्या संग्रहामध्यें कोठें तरी एके ठिकाणीं असावी या हेतूनें त्यांनीं हा उद्योग केला. एकदां सुरू केलेला उद्योग पूर्ण करावयाला त्यांना सुमारें अडीच शतकें लागलीं.

सूतांपाशीं अनेक पुराणांच्या पोथ्या असल्या पाहिजेत. त्या सोडून भारतांतच त्यांनीं इतकी विपुल माहिती समाविष्ट कां केली याचें कारण हें कीं पौरवघराण्यांतला वत्सराज उदयन दिग्विजय करून चक्रवर्ति झाल्यामुळें पौरवांचें नांव सर्वत्र गाजूं लागलें आणि त्या घराण्यांतील पूर्वींच्या दिग्विजयी वीरांची हकीगत सांगणाऱ्या भारताचें श्रवण

करण्याविषयीं लोकांची उत्सुकता वाढली. भारतश्रवणालाच जिकडे तिकडे एकाएकीं ऊत आला आणि भारतकथनप्रसंगींच विविध प्रकारची अवांतर माहिती श्रोत्यांना पुरविण्याची पाळी सूतांवर वारंवार येऊं लागली. त्यामुळें ते ती माहिती भारतांतच समाविष्ट करूं लागले. भारतवर्षाचा राष्ट्रीय ग्रंथ जो महाभारत, त्याच्या निर्मितीला अशा रीतीनें वत्सराज उदयनाचें साम्राज्य कारणीभूत झालेलें आहे. अर्थात् महाभारत ही वत्सराज उदयनाच्या साम्राज्याची भारत वर्षाला उदार देणगी आहे.

## ११—उदयनाचें उत्तर चरित्र

भारत वर्षावर हखामणींनीं रवाना केलेल्या सैन्याची पूर्णपणें वाताहात होऊन भारत वर्षांतील क्षात्रतेज उदयनसाम्राज्याच्या रूपानें परकीयांच्या आक्रमणाचा समाचार घेण्यासाठीं दंड ठोकून उभें राहिलें; यामुळें भारतवर्ष जिंकण्याची मनीषा हखामणींना सोडून दणें भाग पडलें. पुन्हा केव्हांहि ते भारतवर्षाच्या वाटेला गेले नाहींत. पुढें दारयवहूचा पुत्र क्ष्यार्षा ( झर्झिस, पहिला; कारकीर्द ख्रिस्तपूर्व ४८५ ते ४६५ ) याच्या वेळीं हखामणींच्या सैन्यानें पश्चिमेकडे ग्रीकांच्या हातचा भरपूर मार खाल्ला; आणि तेव्हांपासून हखामणीसाम्राज्याला उतरती कळाच लागली.

साम्राज्यस्थापनेनंतर चक्रवर्ति उदयन यानें पौरवराज्याचा आणि नूतन संपादित साम्राज्याचा सर्व मुलकी कारभार आपल्या यौगंधरायणादि अमात्यांवर टाकला व लष्करीदृष्टया आपलें साम्राज्य बलवान् करण्याचें काम तेवढें आपणाकडे ठेवून आपला काळ तो बागबगीचे तयार

करणें, फुलझाडें व फळझाडें यांच्यावर नाना प्रकारचे प्रयोग करून पहाणें यांमध्यें, आणि गायन, वीणावादन, काव्यशास्त्रविनोद, व मृगया यांत घालवूं लागला.

वासवदत्तेचा ज्येष्ठ भ्राता गोपालक हा विदेहदेशांत आपल्या अधिकाराच्या जागीं न राहतां कौशाम्बी येथें येऊन राहिला. तो अर्थशास्त्र जाणणारा होता. साम्राज्याची एकंदर व्यवस्था लावण्याला आणि पाहण्याला त्याच्यासारख्या अर्थशास्त्रज्ञाची गरज भासल्यामुळें अमात्य यौगन्धरायणानें त्याला कौशाम्बी येथें मुद्दाम बोलावून घेतलें होतें. कौशाम्बींत राहून गोपालक हा अमात्याचें काम करीत होता. तथापि त्याला अमात्य असें कोणी म्हणत नसे. त्याची पदवी विदेहराज अशी होती. प्रद्योत घराण्यांतला गोपालक हा कौशाम्बी येथें अमात्याचें काम करीत राहिलेला असल्यामुळेंच प्रद्योत हा पौरवराजाचा प्रधान होता अशी मराठेशाहीच्या काळांतील बखरलेखकांची समजूत झालेली दिसते.

मागें शाकलाधिपांच्या अमलाखालीं जेवढा प्रदेश होता तेवढा सारा आपल्या अमलाखालीं असावा असें उदयनाच्या मनांत होतें. शाकलाधिपांच्या घराण्यांतील सुमुंडीनें विद्याधरवेदि जिंकलेली होती. तेवढीच उदयनाच्या ताब्यांत आलेली नव्हती. विद्याधरवेदींतले पुष्कळसे विद्याधर उर्फ वाहीक लोक शाकलाधिपांच्या अमदानीमध्यें पंजाबांत येऊन राहिलेले होते. विद्याधरवेदीशीं त्यांचें दळणवळण असे. पंजाबावर आतां उदयनाची सत्ता असल्यामुळें ते पौरवराज्यांत येऊं लागले. उदयनाला रसाळ आणि अद्भुत अशा कथा ऐकण्याचा शोक होता. त्यामुळें वाहीक लोकांतील गोष्टीवेल्हाळांचें चांगलेंच फावलें.

त्यांच्या अद्भुतरम्य विद्याधरकथा उदयनाला प्रिय झाल्या; आणि तेव्हांपासून भारतवर्षांत विद्याधरकथांचा फैलाव व्हावयास सुरवात झाली.

विद्याधरकथांतला अद्भुतपणा काढून टाकला म्हणजे विद्याधर नांवांतली सगळी जादू एका क्षणांत नाहींशी होते आणि आपल्या डोळ्यांपुढें भारतवर्षाच्या वायव्यसरहद्दीवरील आजच्या लोकांशीं सदृश अशा एका जातीच्या लोकांचें चित्र उभें राहतें. वायव्यसरहद्दीवरील आजच्या लोकांचे जे जे कांहीं विशेष म्हणून सांगतां येतील त्यांतले बहुतेक त्या लोकांच्या ठिकाणीं होते. त्या लोकांतील कांहींचीं नांवें भारतीय पद्धतीचीं, कांहींचीं इराणी पद्धतीचीं तर कांहींचीं तुर्की पद्धतीचीं दिसतात. यावरून ते लोक मिश्र जातीचे होते असें अनुमान होतें. ते लोक पैशाची भाषा बोलत असत. ही पैशाची भाषा म्हणजे आजच्या उर्दू भाषेसारखीच एक भेसळ भाषा होती. या लोकांनीं व्यापलेला प्रदेश हा हिमालयांतला असल्यामुळें तो जिंकणें सोपें नव्हतें. विद्याधरवेदींत विद्याधरांखेरीज गंधर्व, असुर, यक्ष, राक्षस, गुह्यक आणि कूष्माण्ड या जातींचे लोकहि कमी अधिक प्रमाणांत रहात होते. यांतील गंधर्व हे विद्याधरांहून फारसे भिन्न नव्हते. असुर हे सुमुंडीच्या वेळीं आलेले होते. उदयनाच्या वेळीं ते बहुतेक विद्याधरांतच मिसळून गेलेले होते. यक्ष, राक्षस, गुह्यक व कूष्माण्ड या जाती उदयनकाळांत विद्याधरवेदीमध्यें राज्यकर्त्या नव्हत्या.

उदयनाच्या प्रतीहाराचें नांव नित्योदित असें होतें. नित्योदिताला एक पुत्र होता. त्याचें नांव गोमुख.

उदयनाच्या पुरोहिताचें नांव शांतिकर असें होतें. हा मूळचा पौरव राज्यांतला नसून पंजाबाच्या दक्षिणभागांतला होता व तिकडून

वत्सदेशांत येऊन तो उदयनाचा पुरोहित झालेला होता. त्याच्यापाशीं शांतिसोम आणि वैश्वानर या नांवांचे त्याचे दोन अल्पवयी पुतण्ये होते.

यौगंधरायणाला एक पुत्र होता. त्याचें नांव मरुभूति असें होतें.

रुमण्वानाला एक पुत्र होता. त्याचें नांव हरिशिख ऊर्फ विजयसेन असें होतें.

विनोदी वसंतकालाहि एक पुत्र होता. त्याचें नांव तपंतक असें होतें.

वत्सराज उदयनाला चक्रवर्ति म्हणून अभिषेक झाल्यानंतर लवकरच वासवदत्ता राणीपासून पुत्र झाला. त्याचें नांव अभिमन्यु असें ठेवण्यांत आलें. भारतीयुद्धांतील अभिमन्युपेक्षांहि या अभिमन्यूनें पुढें मोठा पराक्रम करून विद्याधरवेदि काबीज केली.

वत्सराज उदयनानें आपल्या एकुलत्या एक पुत्राच्या शिक्षणाकडे चांगलें लक्ष्य पुरविलें होतें. त्यानें राजधानीबाहेर सर्व प्रकारच्या सोयींनीं युक्त असें एक विद्यामन्दिर तयार करविलें. निरनिराळ्या विषयांत पारंगत असे आचार्य मिळविले आणि राजपुत्र अभिमन्यूला त्यांच्यासह त्या विद्यामंदिरांत ठेविलें. विद्यामंदिरांत व्यायामाची सोय होती, घोड्यावर बसणें, हत्ती चालविणें आणि रथ हांकणें; त्याचप्रमाणें घोड्यावरून, हत्तीवरून व रथावरून युद्ध करणें हें शिकविलें जात होतें. शस्त्रविद्या शिकविली जात होती, अस्त्रविद्या शिकविली जात होती, शास्त्रें शिकविलीं जात होतीं आणि कलाहि शिकविल्या जात होत्या. वत्सराज उदयन आणि वासवदत्ता व पद्मावती या दोघी राण्या राजपुत्राला भेटण्यासाठीं विद्यामंदिरांत वारंवार जात. विद्यामंदिरांतील सर्व शिक्षणक्रम पुरा होईपर्यंत राजपुत्राला राजधानींत आणावयाचें नाहीं असें उदयनानें ठरविलें होतें.

विद्याभ्यास पूर्ण झाल्यानंतर राजपुत्र अभिमन्यूला समारंभपूर्वक

राजधानीस आणण्यांत आलें आणि त्याला युवराजाचा अधिकार देण्यांत आला.

अभिमन्यूला युवराजाचा अधिकार देतांना युवराजाला मदत करणारे अधिकारीहि नेमण्यांत आले. गोमुख हा युवराजाचा प्रतीहार झाला; मरुभूति अमात्य झाला, हरिशिख ऊर्फ विजयसेन हा सेनापति झाला; तपंतक हा नर्मसचिव झाला आणि शान्तिसोम व वैश्वानर हे पुरोहित झाले. या सर्वांमध्यें नित्योदितपुत्र गोमुखावर अभिमन्यूची विशेष मर्जी होती. याचें कारण गोमुख हा आपल्याच कामांत तेवढा हुशार या वर्गांतला नसून चौरस होता हें होय.

युवराज अभिमन्यूचा कांहीं काळानें कोसलराज प्रसेनजित् याच्या भगीरथयशा नामक कन्येबरोबर विवाह झाला. मागें वत्सराज बृहद्रथ आणि कोसलराज कृतंजय हे जसे परस्परांचे व्याही झालेले होते तसेच वत्सराज उदयन आणि कोसलराज प्रसेनजित् हे आतां परस्परांचे व्याही झाले. कोसलराज प्रसेनजिताचे शैशुनाग हेहि सोयरे झालेले होते. प्रसेनजिताची एक बहीण मगधाचा शैशुनाग राजा बिंबिसार याला दिलेली होती. प्रसेनजिताला भगीरथयशेखेरीज आणखींहि एक कन्या होती. ती पुढें त्यानें बिंबिसार राजाचा पुत्र अजातशत्रु याला दिली. अजातशत्रु हा बिंबिसाराचा पुत्र असला तरी प्रसेनजिताच्या बहिणीचा पुत्र नव्हता. त्याचप्रमाणें प्रसेनजिताची बहीण हीदेखील बिंबिसाराची ज्येष्ठ राणी नव्हती. ती कोसलच्या राजघराण्यांतली होती म्हणून मगध देशांतले लोक तिला ‘कोसलदेवी’ असें म्हणत. तिचें स्वतःचें नांव अज्ञातच आहे.

युवराज असतांनाच अभिमन्यूनें विद्याधरवेदि काबीज केली.

भारतसम्राटाला परदेशी लोकांच्या स्वाऱ्यांपासून भारतवर्षाचा बचाव करण्यासाठीं विद्याधरवेदि या नांवानें ज्ञात असलेला हिमालयप्रदेश आपल्या ताब्यांत घेणें अवश्यच होतें. या विद्याधरवेदींत आजच्या नेपाळ संस्थानाचा उत्तरभाग, आजच्या काश्मीरसंस्थानाचा उत्तर व पूर्वभाग, कांग्रा, गढवाल आणि कुमाऊन यांतील हिमालयप्रदेश व आजच्या तिबेटाचा पश्चिमभाग एवढा भूभाग समाविष्ट होता. हा भूभाग आपल्या ताब्यांत घेऊन तेथील काटक व चपळ अशा पार्वतीय लोकांचें सैन्य तयार करणें आणि तें सदोदित सज्ज ठेवून भारतवर्षांत वायव्येकडून वारंवार घुसणाऱ्या परदेशी बुभुक्षितांविषयीं मनांत कोणत्याहि प्रकारच्या कोमल भावनांना थारा न देतां ते आततायी लेखून त्यांना सीमेवरच गांठणें, आणि पुढील तीन चार पिढ्यांच्या काळांत तरी ते पुन्हां स्वारी करून येण्याला समर्थ होऊं नयेत म्हणून त्यांचा कमालीचा संहार करून टाकणें हें भारतवर्षाचा संरक्षक या नात्यानें भारतसम्राट् म्हणविणाऱ्या प्रत्येक सत्ताधाऱ्याचें आद्यकर्तव्य होतें. हें आद्यकर्तव्य बजावण्याचे बाबतींत दुर्लक्ष्य करणारे भारतसम्राट् अन्य बाबतींत कितीहि थोर दिसत असले तरी भारतसम्राट् या मुख्य नात्यानें भारतवर्षाचे ते घोर अपराधीच ठरतील. अशा अपराध्यांत वत्सराज उदयनाची मात्र केव्हांहि गणना करतां येणार नाहीं. कारण दिग्विजय करून भारतसम्राटाचा मुकुट एकदां त्यानें आपल्या मस्तकावर चढविल्यानंतर भारतवर्षांतील लोकांतली क्षात्रवृत्ति मारून टाकण्याची, आणि क्षात्रतेज नष्ट झालेल्या दुबळ्यांवर अधिकार गाजविण्याची राष्ट्रघातक इच्छा तर त्यानें कधीं धरली नाहींच, पण पश्चिमेकडील पारसीक, आणि उत्तरेकडील तुराणी लोक भारतवर्षांत घुसूं लागलेच तर त्यांना आंत येऊं न देतां सीमेवरच

त्यांचा समाचार घेतां यावा अशा प्रकारची योजना त्यानें हातीं घेतली व आपल्या पुत्राकडून ती पूर्ण करविली. भारतचक्रवर्ति उदयनाची भारतवर्षाच्या बचावाविषयींची कळकळ यावरून दिसून येते. आपली योजना इष्ट फल देणारी अशी करण्याला अवश्य तितका काळ उदयन पुढें वांचला नाहीं, आणि उदयनाच्या पश्चात् शैशुनागांची स्वार्थसाधु वृत्ति बळावून ते पौरवसाम्राज्यांतून फुटून निघाले व बंडखोरी करूं लागले, यामुळें उदयनाची योजना सुपरिणामकारक झाली नाहीं हें खरें, पण त्याचा दोष उदयनाच्या माथीं मारतां येणार नाहीं. उदयनाच्या मृत्यूनंतर १६७ वर्षांनीं अलेक्झांडरची भारतवर्षावर स्वारी झालेली असतांना अलेक्झांडरला अडविण्यासाठीं पर्वतराज ऊर्फ पोरस झेलम नदीवर जाऊं शकला हें बव्हंशीं उदयनानें आपल्या हयातींत करून ठेवलेल्या योजनेचेंच फळ होतें असें दिसून येतें. पर्वतराज अलेक्झांडरला अडविण्याचे कामीं यशस्वी कां झाला नाहीं याचीं कारणें वेगळीं आहेत. त्यांचा संबंध उदयनाशीं पोंचत नाहीं.

विद्याधरवेदि म्हणून गणल्या गेलेल्या प्रदेशांत लहान थोर असे अनेक सत्ताधारी होते. त्यांचीं आपसांत भांडणें होतीं. विद्याधरवेदि काबीज करण्याच्या कामाला हात घालण्यापूर्वीं पौरवांनीं त्या सत्ताधाऱ्यांतले कित्येक सत्ताधारी आपलेसे केले होते. पौरवांच्या युवराजानें कित्येक सत्ताधाऱ्यांच्या मुलींशीं लग्नें करून त्यांना आपले निकटचे आप्त बनविलें होतें. यामुळें विद्याधरवेदीला पौरवांच्या प्रबल बाहूंचें जर रक्षण मिळेल तर चांगलें होईल असें उघडपणें प्रतिपादणाऱ्या लोकांचा एक वर्ग विद्याधरवेदींत निर्माण झालेला होता. विद्याधरवेदी काबीज करतांना पौरवांना या वर्गाची विशेष मदत झाली.

विद्याधरवेदीमध्यें तीन सत्ताधारी प्रबळ होते. कैलासाच्या उत्तरेकडील वेद्यर्धांत मंदरदेव नांवाचा सत्ताधारी प्रबळ होता आणि कैलासाच्या दक्षिणेकडील वेद्यर्धांत गौरीमुण्ड व मानसवेग हे सत्ताधारी प्रबळ होते. पौरवांचा विद्याधरवेदींत प्रवेश होणें त्यांना इष्ट वाटत नव्हतें. या तीन सत्ताधाऱ्यांचा उच्छेद केल्यावांचून पौरवांना विद्याधर-वेदीचा ताबा मिळणें अशक्य होतें.

गौरीमुंड हा दक्षिणेकडील राजा होता. त्याच्या राजधानीचें नांव गोविंदकूट असें होतें. मानसवेग ( मानसवेग=मानस सरोवरांचा प्रभु ) याच्या राजधानीचें नांव आषाढपुर असें असून तिबेटांतील आजच्या नारीखोरसूम नामक विभागावर त्याचा ताबा होता. मानस नांवाचीं प्रसिद्ध सरोवरें याच विभागांत आहेत.

अभिमन्यूनें पौरवसैन्य बरोबर घेऊन दक्षिणेकडून विद्याधरवेदीवर स्वारी केली. पौरवांना अनुकूल असलेले विद्याधर सत्ताधारी आपापल्या सैनिकांसह अभिमन्यूला येऊन मिळाले. गौरीमुंड आणि मानसवेग हे दोघे एक होऊन अभिमन्यूला अडवावयाला आले. परंतु युद्धांत ते दोघेहि ठार होऊन त्या दोघांच्या ताब्यांतला मुलुख अभिमन्यूला मिळाला.

अभिमन्यूनें त्यानंतर कैलासाच्या उत्तरेकडील मंदरदेवावर स्वारी केली. मंदरदेवाचा पराभव झाला. तो अभिमन्यूच्या हातीं सांपडला. अभिमन्यु त्याचा वध करणार होता. परंतु मंदरदेवाच्या बहिणीनें अभिमन्यूची प्रार्थना केल्यामुळें अभिमन्यूनें त्याला सोडून दिलें. बहिणीच्या रदबदलीमुळें आपले प्राण वांचले याची मंदरदेवाला शरम वाटली व तो तपोवनांत निघून गेला. अभिमन्यूनें आपणास अनुकूल असलेल्या अशा एका विद्याधराची मंदरदेवाच्या राज्यावर स्थापना

केली व त्याला आपला मांडलिक बनविलें. या विद्याधराचें नांव अमितगति असें होतें.

विद्याधरवेदीची उत्तरसीमा तुराणी सम्राटाच्या मुलखाला लागलेली होती. विद्याधरवेदींत अभिमन्यूला जे लागोपाठ विजय मिळाले त्यांमुळें त्याचा उत्साह वाढला. तुराणी साम्राज्यावर स्वारी करण्याची भाषा तो तरुण पौरव बोलूं लागला. परंतु त्याच्या मंत्र्यांनीं त्या बाबतींत त्याला उत्तेजन दिलें नाहीं. "आपणांस प्राप्त झालें आहे एवढें पुष्कळ आहे. अधिकाची हाव धरून सगळेंच गमावण्याची वेळ येईल !" असें ते म्हणाले. तेव्हां तुराणी साम्राज्यावर स्वारी करण्याचा विचार अभिमन्यूनें सोडून दिला.

विद्याधरवेदींतील सर्व सत्ताधाऱ्यांना आपल्या वर्चस्वाखालीं आणणारा असा पहिला वीरपुरुष म्हटला म्हणजे ऋषभ शाक्वर हा होय. हाच विद्याधरांचा पहिला चक्रवर्ति असें समजण्यांत येत असे. या ऋषभ शाक्वरानें रचलेल्या अशा एका सूक्ताचा ऋग्वेदामध्यें संग्रह करण्यांत आलेला आहे. ( ऋग्वेद, मंडल १०, सूक्त १६६. ) ऋषभाला तेथें 'वैराज्' म्हणजे वाहीक लोकांचा राजा असें म्हटलेलें आहे. सूक्ताच्या शेवटीं ऋषभानें आपल्या शत्रूंना अनुलक्षून पुढील अर्थाचे उद्गार काढलेले आहेत:—

**"जसे उच्चस्वरें भेक आक्रोशा करिती जळीं,**
**रहा करीत आक्रोशा मदंघ्रीच्या तसे तळीं ! !"**

सर्व शत्रूंना आपल्या पायाच्या टांचेखालीं दाबून आक्रोश करावयास लावणाऱ्या ऋषभानें विद्याधरचक्रवर्ति म्हणून आपणाला ज्या पर्वतावर अभिषेक करवून घेतला त्या पर्वताला पुढें ऋषभपर्वत असें नांव मिळालें.

पुढील काळांतला प्रत्येक विद्याधरचक्रवर्ति ऋषभपर्वतावरच आपणाला चक्रवर्तित्वाचा अभिषेक करवून घेत असे. संपूर्ण विद्याधरवेदि काबीज करणाऱ्या अभिमन्यूला विद्याधरवेदींतील या पूर्वपरंपरेला मान द्यावा लागला. ऋषभपर्वतावरच त्यानें विद्याधरचक्रवर्ति म्हणून आपणाला अभिषेक करवून घेतला. भारतचक्रवर्ति उदयनाचा पुत्र उदयनाच्या ह्यातींतच विद्याधरचक्रवर्ति झाला. त्यावेळीं त्याचें वय सुमारें १८।१९ वर्षांचें असेल.

विद्याधरचक्रवर्ति झालेल्या अभिमन्यूचे शांतिसोम आणि वैश्वानर हे पुरोहित होते. मरुभूति हा मुख्य अमात्य होता. हरिशिख ऊर्फ विजयसेन हा मुख्य सेनापति होता, तपंतक हा नर्मसुहृद् होता आणि गोमुख हा प्रतीहार होता.

भारतचक्रवर्ति उदयन हा आपल्या दोघी राण्या आणि यौगंधरायणादि अमात्य यांच्यासह विद्याधरवेदींत जाऊन विद्याधरचक्रवर्ति झालेल्या आपल्या पुत्राला भेटला. विद्याधरवेदि म्हणजे इहलोकचा स्वर्गच होय असें त्याला वाटलें. आपल्या पुत्राची राजधानी व एकंदर ऐश्वर्य पाहून तो संतुष्ट झाला. विद्याधरवेदींत कांहीं दिवस घालविल्यानंतर बरोबरच्या मंडळीसह तो कौशांबीस परत आला.

प्रयाणसमयीं चरणांवर मस्तक ठेवून नम्र झालेल्या आपल्या पुत्राला तो म्हणाला, “ वत्सा, हें स्वर्गतुल्य स्थान तूं आपल्या बाहुबलानें संपादन केलेंस यामुळें आपलें पौरव कुल धन्य झालें आहे. महर्षि कृष्ण द्वैपायन आजला प्रकट असते तर तुझ्या या पराक्रमावर दुसरें ‘ जय ’ नामक काव्य निर्माण करण्याची स्फूर्ति त्यांना झाली असती यांत संशय नाहीं. मीदेखील या विद्याधरभूमींत वास्तव्य केलें असतें.

परंतु चिरसहवासामुळें भारतभूमीकडे माझें मन ओढ घेतें आणि भारतभूमींतच आपलें आयुष्य घालवावें असें मला वाटतें. यासाठीं कौशाम्बीस मी परत जात आहें. येथें तुझ्यापाशीं तुझे बाळमित्र मरुभूति, विजयसेन, तपन्तक आणि गोमुख हे आहेतच. पौरव राज्यांतले सहस्रावधि सैनिकहि येथें तुझ्यापाशीं आहेत. यामुळें ही विद्याधरवेदि म्हणजे पौरवांची जणूं काय एक वसाहतच झालेली आहे ! त्यांच्यासह या विद्याधरवेदीचा उपभोग घेतांना आपले पराक्रमी पूर्वज गाण्डीवधारी वीर धनंजय यांना कुरुक्षेत्रावर यदुकुलोत्पन्न भगवान् वासुदेव यांनीं केलेला दिव्य उपदेश तूं केव्हांहि विसरूं नको असें माझें तुला आग्रहाचें सांगणें आहे. पौरव कितीहि ऐश्वर्यसंपन्न झाले तरी उदकांत राहून उदकापासून अलिप्त असणाऱ्या कमलासारखी त्यांची सदैव वृत्ति असली पाहिजे. तरच जगाला ते आदर्शभूत होतील. आपली पूर्वीची देवपरंपरा सोडून असुरपरंपरेंत प्रविष्ट झालेले आणि त्या परंपरेचा अभिमान बाळगणारे पर्शु आतां पारसीक या नांवानें प्रसिद्धीला येऊन पश्चिमेस आपलें माहाराज्य विस्तारून बसलेले आहेत. उत्तरेस ययातिपुत्र तुर्वशाचे वंशज बुभुक्षित लांडग्यांप्रमाणें वावरत आहेत. या दोघांची लोभी दृष्टि भारतवर्षाकडे वळल्यास त्यांना भारतरक्षक पौरवांकडून भारतवर्षाच्या सीमेवरच धारातीर्थी कंठस्नान घातलें जावें म्हणून या विद्याधरवेदींत तुझी स्थापना झालेली आहे असें त्वां समजून चालावें आणि आपलें पवित्र कर्तव्य निरलसपणें बजावीत रहावें. भगवान् कैलासनाथ, कौबेरीपति कुबेर, आणि पौरवकुलाच्या संरक्षक देवता तुझें सदैव कल्याण करोत ! ”

पुराणें उदयनपुत्र अभिमन्यूला ‘ वहीनर ’ असें म्हणतात. कथा-

सरित्सागरामध्यें अभिमन्यूला ‘नरवाहनदत्त’ असें म्हटलें आहे. ‘वहीनर’ म्हणजे वाहीक ऊर्फ विद्याधर लोकांचा ईश्वर; आणि ‘नरवाहनदत्त’ म्हणजे कुबेरानें दिलेला. अभिमन्यूचीं हीं उघड उघड बिरुदें दिसतात.*

चक्रवर्ति उदयन हा शिवभक्त होता. तथापि पौरव राजघराण्याच्या कुळाचारांत वासुदेव कृष्णाला महत्त्वाचें स्थान होतें, आणि कुळाचारांतील वासुदेव कृष्णाचें स्थान कायम ठेवूनच उदयनाला आपली शिवोपासना

---

* अभिमन्यूचें ‘ वहीनर ’ हें बिरुद जसें वाहीकांच्या भाषेंतलेंच वाटतें तसें ‘ नरवाहनदत्त ’ हें वाटत नाहीं. ‘ नरवाहनदत्त ’ हें अभिमन्यूच्या एखाद्या पैशाची बिरुदाचें केवळ संस्कृतीकरण असावें असा बळकट संशय येतो.

ज्या शब्दाचें संस्कृतीकरण केलें जातें त्या शब्दाचा उच्चार बऱ्याच अंशीं संस्कृतीकरणांत कायम रहातो; परंतु अर्थ कायम रहातोच असें नाहीं. कित्येक वेळां तो पार बदलतो. शेरबेग या नांवाचा अर्थ व्याघ्रराज असा आहे. याचें संस्कृतीकरण ‘ शरवेग ’ असें होईल. ‘ शरवेग ’ या संस्कृतीकरणांत ‘ शेरबेग ’ या मूळ नांवाचा उच्चार बऱ्याच अंशीं कायम राहिलेला दिसेल, परंतु अर्थमात्र पार बदलेल. ‘ शरवेग ’ नांवाचा अर्थ बाणाच्या वेगाप्रमाणें वेग असलेला असा होईल.

‘ नरवाहनदत्त ’ यांतील शेवटचें ‘ दत्त ’ हें पद ‘ दात ’ शब्दाचें संस्कृतीकरण असावें असा संशय येतो. ‘ दात ’ हा शब्द ‘ दत्त ’ या शब्दाचा नातलग नसून सेमिटिक लोकांतील ‘ दाविद ’ अथवा ‘ दाउद ’ या नांवांचा नातलग आहे. त्याचा अर्थ ‘ प्रिय ’ अगर ‘ लाडका ’ असा होईल. त्याच्याशीं अर्थदृष्टया आणि उच्चारदृष्टया सदृश असा संस्कृत शब्द म्हटला म्हणजे ‘ दयित ’ हा होय. ( असुर-वाचक ‘ दैत्य ’ हा शब्द या ‘ दयित ’ शब्दाचाच नातलग असणें संभवनीय आहे. ) उदयनपुत्र अभिमन्यु याचें संपूर्ण बिरुद ‘ वहीनरदात ’ असें, अगर अशासारखें असावें; आणि त्याचा अर्थ मूळांत ‘ वाहीकांच्या देवाचा लाडका ’ असा असावा. जिंकलेल्या वाहीकांना संतुष्ट राखण्यासाठीं त्यानें हें बिरुद धारण केलें. प्राचीनकाळचे भारतीय राजे आपणाला देवाचे लाडके म्हणवीत. अभिमन्यु वहीनरानंतर सुमारें दोनशें वर्षांनीं होऊन गेलेला अशोक मौर्य हा आपणाला ‘ देवानां प्रिय ’ म्हणजे देवांचा लाडका असें म्हणवीत होता हें प्रसिद्धच आहे.

चालविणें प्राप्त होतें. अलीकडील काळांत एखादा हिन्दु मनुष्य ख्रिस्ती अगर मुसलमान झाला म्हणजे एका क्षणांत तो आपली सर्व कुलपरंपरा टाकून सेमिटिक लोकांच्या पुराणांतील पहिल्या मानवी जोडप्याच्या संततींत दाखल होतो व ज्या लोकांशीं त्याच्या पूर्वजांचा वस्तुतः कांहीं संबंध नसतो त्या लोकांना तो आपले पूर्वज समजूं लागतो! यामुळें कादंबरीपेक्षांहि खोटा असा इतिहास तयार व्हावयाला सुरवात होते! प्राचीन काळीं असा प्रकार घडत नव्हता. प्राचीन काळांतील सामान्य लोकांनाच केवळ नव्हे, तर राजांना देखील आपले कुळाचार यथासांग पाळावे लागत. ते पाळून मग त्यांनीं कुलदेवतांखेरीज इतर देवतांना पाहिजे तर भजावें असा शिरस्ता होता. हा शिरस्ता सेमिटिक रक्ताच्या लोकांनीं गेल्या दोन हजार वर्षांत काढलेले वाळवंटी धर्मपन्थ प्रसारासाठीं इकडे आणीपर्यंत सुरळीतपणें चाललेला होता; आणि सेमिटिकांचे वाळवंटी पंथ इकडे आयात झाल्यानंतर देखील हा शिरस्ता पूर्णपणें असा कधींच मोडला गेला नाहीं. इतर देशांतील लोक ख्रिस्ती अगर मुसलमानी संप्रदायाचा स्वीकार करतेवेळीं आपली पूर्वपरंपरा आणि कुलाचार यांची होळी करून बसले. यामुळें मानवी समाजांचा प्राचीन इतिहास अभ्यासणाऱ्यांना भारतवर्षांत साधनसामुग्री जशी विपुल मिळूं शकते तशी ती इतर देशांत मिळूं शकत नाहीं.

उदयनानंतर सुमारें सवादोन शतकांनीं भारतवर्षांत बौद्ध संप्रदायाला सार्वभौम सत्तेचा पाठिंबा मिळाला आणि मुख्यतः त्या पाठिंब्यामुळेंच त्या संप्रदायाला एकाएकीं मोठा जोर चढला. तथापि बौद्ध बनलेल्या भारतीय कुटुंबांचे कुळाचार कायमच राहिलेले होते.

बौद्ध संप्रदायाचा प्रवर्तक शुद्धोदनपुत्र सिद्धार्थ हा चक्रवर्ति उदयनाच्या

वेळीं होता. उदयनाच्या आधीं जन्माला येऊन उदयनाच्या मागून तो मरण पावला. तो शाक्य जातीचा असून त्याच्या घराण्याचें नांव गौतम असें होतें. शाक्य हे लोक भारतवर्षाबाहेरच्या शक लोकांचे संबंधी होते. भारतवर्षांत ते बहुतकरून शाकलाधिपांच्या अमदानीमध्यें आले आणि हिमालयाच्या पायथ्या पायथ्यानें पुढें सरकत सरकत विदेह देशापर्यंत त्यांनीं मजल मारली. हे लोक संघ करून रहाणारे होते. त्यांच्या हकीगतींत त्यांच्या जातींतले जे कोणी राजे म्हणून दिसतात ते पुढील काळांतील मालोजी भोंसल्यासारखे अनेक गांवांचे पाटील भासतात! भारतवर्षांत शाक्य लोकांचें मातबर असें एखादें राज्य कोठेंच नव्हतें. त्यांच्यांतल्या कित्येक कल्पना आणि समजुती या सेमिटिक लोकांच्या कल्पना आणि समजुती यांच्याशीं सदृश होत्या. गौतमकुलोत्पन्न सिद्धार्थानें स्थापन केलेल्या बौद्ध संप्रदायांत त्या आढळून येतात. शाक्य लोकांत सख्खा भाऊ व सख्खी बहीण यांचें परस्परांशीं लग्न होऊं शके.

सिद्धार्थ हा खिस्तपूर्व ५५७ या वर्षीं कपिलवस्तु नगराजवळच्या लुंबिनी वनांत जन्मला. हखामणी सम्राट् पहिला कुरु हा त्या वेळीं नुकताच आपल्या बापाच्या राज्याचा मालक झालेला होता; आणि भारतवर्षांत कौशाम्बी येथें वसुदान सहस्रानीकाची पंजाबांतील असुरवंशी सत्ताधाऱ्यांचा उच्छेद करण्याची तयारी जारीनें चालू होती. सिद्धार्थानें खिस्तपूर्व ५२९ या वर्षीं गृहत्याग करून वनांत गमन केलें. त्या वेळीं कौशाम्बी येथें शार्ङ्गदेव शतानीक राज्य करीत होता. सिद्धार्थानें गृहत्याग केला त्याच वर्षीं हखामणी सम्राट् पहिला कुरु हा मध्य आशियांतील भटक्या लोकांशीं लढत असतां मारला गेला. खिस्तपूर्व ५२२ या वर्षीं

आपणाला पूर्ण ज्ञान झालें अशी सिद्धार्थाला खात्री पटून तो आपणाला ‘ बुद्ध ’ म्हणजे ज्ञानी असें म्हणवूं लागला आणि आपला शिष्यवर्ग निर्माण करण्याच्या उद्योगाला लागला. याच वर्षी इराणांत कुरुपुत्र बर्दियाचा तोतया गौमात मग याची धामधूम चालू होती व याच वर्षी हखामणी सम्राट् कंबुजिय यानें सूर्यादेशांत आत्महत्या केली. उदयन हा या वेळीं वत्सदेशाचा युवराज होता. बिंबिसार हा मगधाचा युवराज होता आणि प्रसेनसित् हा कोसलचा युवराज होता. आपणाला ‘ बुद्ध ’ असें म्हणवूं लागलेला सिद्धार्थ ख्रिस्तपूर्व ४७८ या वर्षी कुशनगराजवळच्या सालवनांत मृत्यु पावला. त्यावेळीं उदयनपुत्र अभिमन्यु वहीनर हा हिमालयांत आजच्या काश्मीरमध्यें राज्य करीत होता. उज्जयिनीमध्यें पालक प्रद्योत राज्य करीत होता. मगधदेशांत बिंबिसारपुत्र अजातशत्रु राज्य करीत होता आणि कोसलदेशांत प्रसेनजिताचा पुत्र क्षुद्रक ऊर्फ विदूदभ हा राज्य करीत होता. इराणांत त्यावेळीं पहिला दारयवहु याचा पुत्र पहिला क्ष्यार्षा ( झर्झिस ) याची कारकीर्द चालू होती. सिद्धार्थ हा गौतम बुद्ध म्हणून प्रसिद्ध आहे. तो मरण पावला त्यावेळीं चक्रवर्ति उदयनाच्या मृत्यूला पंधरा वर्षे झालेलीं होतीं आणि बिंबिसाराच्या मृत्यूला आठ वर्षे झालेलीं होतीं.

चक्रवर्ति उदयन आणि गौतम बुद्ध यांची भेट झालेली होती असें म्हणतात. त्या दोघांची भेट झालेली असणें अशक्य नाहीं. परंतु गौतम बुद्धाचा संचार मुख्यत्वेंकरून कोसल आणि मगध या देशांत असल्यामुळें कोसलचा राजा प्रसेनजित् आणि मगधाचे राजे बिंबिसार व अजातशत्रु यांच्याशीं त्याचा जसा विशेष निकटचा संबंध होता तसा तो चक्रवर्ति उदयनाशीं असेल असें वाटत नाहीं.

## १२—उदयनाचा अंत

उदयनानें सुमारें सत्तावीस वर्षे राज्य केलें. ख्रिस्तपूर्व ५२० ते ४९३ हा स्थूलमानानें त्याच्या कारकीर्दीचा काळ होता.*

अवंतीचा चंडमहासेन म्हातारा होऊन ख्रिस्तपूर्व ४९४ मध्यें मृत्यु पावला. त्याची पट्टराणी अंगारवती ऊर्फ शिवादेवी ही सती गेली. चंडमहासेनाच्या मागून सुमारें एक वर्षानें चक्रवर्ति उदयनानें आपली इहलोकची यात्रा संपविली.

चंडमहासेनाचा ज्येष्ठ पुत्र गोपालक हा बापाच्या पश्चात् अवंतीचा राजा व्हावयाचा. परन्तु कांहीं अन्तस्थ कारणामुळें दिवसेंदिवस तो विरक्त बनत चाललेला होता. त्यानें अवंतीच्या सिंहासनावर आरूढ होऊन अवंतिराज्याचीं सूत्रें हातीं घेण्याचें नाकारलें. तो कौशांबींतच चक्रवर्ति उदयनाचा सल्लागार म्हणून राहिला. उदयनानें त्यामुळें त्याचा धाकटा भाऊ पालक याची अवंतिराज्यावर स्थापना केली. चंडमहासेनाचा प्रधान भरतरोहक अजून हयात होता. तोच पालकाचाहि प्रधान झाला.

चक्रवर्ति उदयनाला मद्यप्राशनाचा नाद होता. अमात्य यौगंधरायणानें अनेक प्रसंगीं त्याची कानउघडणी केलेली असतांहि त्याचा तो नाद कमी झाला नाहीं. मद्यप्राशनामुळें उदयनाच्या हातून राज्यप्रकरणीं कांहीं प्रमाद झाले नाहींत हें खरें, पण मद्यामुळें त्याच्या शरीराला मात्र व्याधि जडली व शेवटीं तीच विकोपास जाऊन तिनें उदयनाची पन्नाशी पुरी होते न होते तोंच त्याचा बळी घेतला !

* मौज, दिवाळी अंक १९४१ मधील "वत्सराज उदयनाचा काळ" हा प्रस्तुत लेखकाचा लेख पहा. ( पृष्ठ ११५ ते १२३ ).

वासवदत्तेशीं विवाह झाल्यापासून चंडमहासेनाविषयीं उदयनाच्या मनांत आदर उत्पन्न झालेला होता. चंडमहासेनाला तो आपल्या पित्याच्या ठिकाणीं मानीत होता. तो मृत्यु पावला याचा उदयनाच्या मनावर फार परिणाम झाला व त्याला आधींच जडलेली व्याधि त्या स्थितींत बळावली. किती उपाय केले तरी ती हटण्याचें चिन्ह दिसेना. या दुखण्यांतून आपण आतां उठत नाहीं असें उदयनाच्या मनानें घेतलें.

तो हाडामासाचा क्षत्रिय होता. बिछान्यावर खितपत पडून मरणें हें त्याला कमीपणाचें वाटलें.

त्यानें आपले अमात्य, मंत्री, विदेहराज गोपालक आणि राण्या यांना आपल्या बिछान्याजवळ बोलावलें.

" झालें ! इहलोकांतलें माझें कर्तव्य संपलें ! " भारतचक्रवर्ति उदयन म्हणाला, " जनमेजय महाराजांच्या वेळीं पौरवांनीं गमावलेलें साम्राज्य मी पुन्हा संपादन केलें, भारतवर्षावर चालून आलेल्या पारसीकसेनापतीला स्वतःच्या हातानें कंठस्नान घातलें, पारसीकांची आणि तुरुष्कांची पापी दृष्टि भारवर्षाकडे वळण्यास इतउत्तर धजूं नये म्हणून माझ्या एकुलत्या एक पुत्राची भारतवर्षाच्या प्रवेशद्वारापाशींच स्थापना केली. भारतरक्षक देवतांनीं मजकडे सोपविलेलें कार्य एवढेंच असलें पाहिजे असें मला वाटतें; आणि म्हणूनच ज्ञाताच्या पलीकडील प्रदेशांतून अज्ञात अशा शक्ति मला आतां तिकडे येण्याविषयीं आज्ञापीत आहेत ! त्यांच्या आज्ञेचें उल्लंघन करण्याला मी मर्त्य समर्थ कसा असणार ? मला गेलें पाहिजे. अनाद्यनंत म्हणून समजल्या गेलेल्या कालालादेखील जो जरा आणतो, त्या भगवान् कालंजर देवाच्या पर्वतावरून खालीं उडी घेऊन मी देहपात करणार ! आर्य

यौगंधरायण, माझी निघण्याची तयारी करा! तुम्हीं लहानपणापासूनचे माझे मित्र; तरी एवढें हें शेवटचें मित्रकार्य कराच. नाहीं म्हणूं नका."

" प्रभूंची प्रकृति एवढी चिन्ताजनक आहे असें भिषग्वर्यांना वाटत नाहीं. " यौगंधरायणानें म्हटलें, " कुमार अभिमन्यु यांना विद्याधरवेदींतून इकडे बोलावून आणावें, पौरवराज्याचा आणि भारतचक्रवर्तित्वाचा त्यांना अभिषेक करावा आणि ते व त्यांचे अमात्य असणारे आमचे पुत्र यांच्यावर राज्य आणि साम्राज्य सोंपवून आपण सर्वांनींच तपोवनाचा मार्ग धरावा असें मला वाटतें. "

" विद्याधरवेदी ज्यानें जिंकली, " उदयनानें म्हटलें, " त्यानें ती आपल्या ताब्यांत ठेवण्यासाठीं सदोदित विद्याधरवेदींतच राहिलें पाहिजे. वेदकाळांतला ऋषभ शाक्वर हा विद्याधरवेदीचा पहिला चक्रवर्ति झाला. त्याच्यानंतर सर्वदमन, बंधुजीवक, विश्वन्तर आणि शाकलाधिपांच्या घराण्यांतला सुमुंडि अथवा सूर्यप्रभ* हे प्रसिद्ध विद्याधरचक्रवर्ति झाले. या सर्वांना विद्याधरवेदि ताब्यांत राखण्यासाठीं विद्याधरवेदींतच रहावें लागलेलें होतें असें मी ऐकलें आहे. कौशाम्बीचें राज्य चालविण्यासाठीं कुमाराला जर कौशाम्बीस बोलावलें तर विद्याधरवेदि त्याच्या हातची जाईल आणि भारतवर्षाचें प्रवेशद्वारदेखील बाह्य लोक बळकावून बसतील. हें प्रवेशद्वार ताब्यांत असल्यामुळेंच शाकलाधिपांसारखें भारतवर्षाच्या बाहेरचें असुर घराणें वाटेल तेवढ्या बाह्यांना भारतवर्षांत

* सुमुंडि ऊर्फ सूर्यप्रभ याच्यासंबंधीं विस्तृत विवेचन प्रस्तुत लेखकानें आपल्या ' सूर्यप्रभकथा आणि तींत गुंतलेला इतिहास ' नामक लेखमालेंत केलेलें असून ती लेखमाला ' ज्योत्स्ना ' मासिकांत प्रसिद्ध झालेली आहे. ( ज्योत्स्ना, अंक नोव्हेंबर डिसेंबर १९३८, व जान्युआरी ते एप्रिल १९३९ पहा. )

घेत राहून भारतवर्षाच्या छातीवर चारशें वर्षें पाय देऊन राहिलेलें होतें. त्यानेंच आमचें सार्वभौमत्व हिरावून घेतलेलें होतें. जें मागें झालें तें पुन्हा होऊं नये अशी जर आमची मनापासून इच्छा असेल तर आमच्या पूर्वजांच्या हातून घडलेले प्रमाद आपल्या हातून न घडतील अशी दक्षता आम्हीं ठेवली पाहिजे. कुमाराला विद्याधरवेदींतून वत्सदेशांत येऊन राहण्यासाठीं बोलावलें तरी तो तें कबूल करणार नाहीं. कारण, विद्याधरवेदि आणि भारतवर्षाचें प्रवेशद्वार स्वतःच्या हातीं राखण्याचें महत्त्व तो पुरेपूर जाणतो. त्याला इकडे केवळ भेटीसाठीं बोलावण्यांत देखील कांहीं अर्थ नाहीं. कारण तो इकडे येऊन पोंचण्याच्या आधींच माझी इहलोकची यात्रा संपलेली असेल. धीर देण्याच्या सदिच्छेनें भिषग्वर्य कांहींहि म्हणोत, माझी मनोदेवता मला स्पष्ट सांगत आहे कीं तूं आतां फार थोड्या दिवसांचा सोबती आहेस. म्हणून सर्व निरवानिरव करून मी पवित्र कालंजर पर्वतावरून देहपात करणार, आणि शिवलोक प्राप्त करून घेणार ! मी केलेली व्यवस्था माझ्या पुत्राला मान्य होईल अशी माझी खात्री आहे. ”

इतकें बोलून उदयन थोडा वेळ थांबला. नन्तर विदेहराज गोपालकाकडे वळून म्हणाला, “ गोपालक, आपणावर सख्ख्या भावाप्रमाणें मी प्रेम करीत आलेला आहें. साम्राज्याची घडी नीट बसविण्याचे कामीं आपण अहोरात्र कसे श्रम केले हें मला ठाऊक आहे. अवंतीचें श्रीमान् राज्य आपलें हक्काचें असतां तें स्वीकारण्याचें आपण नाकारलें. परंतु आतां हें पौरवराज्य मी आपल्या हातीं देत आहे याचा स्वीकार करा. हें नाकारूं नका ! माझ्या मागें देवी, अमात्य, मंत्री पौरव राज्यांतले लहान थोर अधिकारी आणि प्रजा या सर्वांचा योग्य

परामर्श आपणच घेऊं शकाल. आपणासारखे अर्थशास्त्री या राज्याच्या सिंहासनावर आरूढ झाल्यानंतर या राज्याची आर्थिक स्थिति नेहमींच भरभराटीची राहणार याविषयीं मला संशय नाहीं. कुमार अभिमन्यु माझ्या मागें भारतसम्राट् झाला म्हणजे त्याचे भारतवर्षांतले तुम्हीं प्रतिनिधि. तथापि वत्सदेशाचें हें राज्य तुमचें स्वतःचें. वत्सराज्याचा उपभोग घेऊन इकडे आर्यावर्तांत आणि दक्षिणेकडील अगस्त्यखंडांत भारतसम्राटाचे जे जे हितसंबंध आहेत त्यांचें तुम्हीं रक्षण करावें. वत्सराज्य आणि सम्राटाचें प्रतिनिधित्व तुमच्याकडे, विदेहदेशाची सुभेदारी तुमचे बंधु पालक यांच्या पुत्राकडे, आणि चेदिदेशाची सुभेदारी बिंबिसारपुत्र अजातशत्रूकडे अशी व्यवस्था मी करीत आहें. ही पार पाडण्याचें तुम्हीं सर्वांनीं मनावर घ्यावें असें माझें तुम्हांस सांगणें आहे."

"राज-राजाधिराज!" गोपालक डोळ्यांत आसवें आणून बोलला, "कौशाम्बीचें हें समृद्ध राज्य आणि भारतसम्राटांच्या प्रतिनिधीचें पद मला देऊन आपण मजवरील आपलें प्रेमच व्यक्त केलें आहे. परंतु काय असेल तें असो, राज्य, ऐश्वर्य आणि सुखोपभोग यांचा दिवसेंदिवस मला वीट येत चालला आहे. राज्यव्यवहारांत ज्याला अर्थ म्हणतात तो अनर्थसा वाटूं लागलेला आहे. तपोवनांत जाऊन तपस्वी व्हावें असें वारंवार मनांत येतें. केवळ आपल्या, आणि प्रिय भगिनी वासवदत्ता हिच्या प्रेमाखातर मी आजवर कसा तरी येथें राहिलों. उद्यां राहीनच असा भरंवसा नाहीं, अशा स्थितींत वत्सराज्य आणि भारतसम्राटाच्या प्रतिनिधीचें पद स्वीकारण्यास मी असमर्थ आहें हें कळविण्यास मला वाईट वाटतें."

"तुम्हांला काय वाटतें हें ऐकावयाला मला नको आहे!"

उदयन रागावून म्हणाला, " सम्राटाचा मुकुट अजून माझ्याच मस्तकावर आहे. तो जोंपर्यंत माझ्या मस्तकावरून निघून दुसऱ्या कोणाच्या मस्तकावर चढलेला नाहीं तोंपर्यंत माझें तुम्हांला सांगणें म्हणजे सम्राट् या नात्यानें मी तुम्हांला केलेली आज्ञा आहे. ती तुम्हांला पाळलीच पाहिजे. मी कोणाचा दुसरा एखादा अपराध सहन करीन, पण आज्ञाभंग हा अपराध प्रत्यक्ष माझ्या पुत्राचादेखील सहन करणार नाहीं ! "

" राज-राजाधिराजांच्या आज्ञेचा भंग करण्याच्या हेतूनें मी बोललों नाहीं, " गोपालक म्हणाला, " पण—"

" तुमचा पण नको नि बिण नको ! " चक्रवर्ति उदयन म्हणाला, " पण बिण जो काय तुमचा असेल तो आमच्या पश्चात् आमच्या पुत्राला कळवा ! आर्य यौगंधरायण, आम्हीं केलेली व्यवस्था पुत्राला कळविण्यासाठीं विद्याधरवेदींत आजच दूत रवाना होऊं द्या. आमच्या प्रयाणाची उद्यां तयारी ठेवा ! उद्यांपासून हे गोपालक तुमचे प्रभु ! माझ्यामागें देवींनीं पाहिजे तर विद्याधरवेदींत पुत्रापाशीं रहावें, पाहिजे तर येथेंच रहावें. "

'जिकडे आर्यपुत्र, तिकडे आम्हीं !' दोन्ही राण्यांनीं निश्चयाच्या स्वरानें सांगितलें. त्यांच्या सांगण्याचा खरा अर्थ काय हें उदयन मनांत समजला.

" आमचें सर्व आयुष्य प्रभूंच्या सेवेंत गेलें; " यौगन्धरायण हात जोडून म्हणाला; " प्रभूंवांचून आम्हांला एक क्षणभरदेखील चैन पडणार नाहीं. आमची स्थिति वेड्यासारखी होईल. म्हणून प्रभूंनीं आपणाबरोबर आम्हांलाहि न्यावें अशी माझी, रुमण्वान् सेनापतींची आणि वसन्तकाची प्रभुचरणीं प्रार्थना आहे. "

" जगणें अशक्य म्हणून मी मरणाला कवटाळीत आहें." उदयनानें म्हटलें; " देवींची अगर तुमची स्थिति कांहीं अशी नाहीं. तुम्हीं माझ्याबरोबर येण्याची इच्छा कां धरावी ? "

" इच्छा वगैरे मला कांहीं समजत नाहीं." वासवदत्ता राणी म्हणाली, " माझी आई इतकी वृद्ध झालेली, पण वृद्धपणींदेखील तिनें पुत्रादिकांचा मोह बाजूला ठेवून पतिसह गमन केलें. तिचेंच रक्त माझ्या नसानसांतून खेळतें आहे. जिकडे आर्यपुत्र तिकडे मी ! "

" आणि मी देखील ! " राणी पद्मावती म्हणाली.

" मी काय, रुमण्वान् काय, अगर वसंतक काय, " यौगंधरायण म्हणाला, " आम्हीं व्यक्तिनिष्ठ माणसें. ज्या व्यक्तीच्या ठिकाणीं आमची निष्ठा, त्या व्यक्तिप्रीत्यर्थच आमची बुद्धिमत्ता काम करावयाची, ती व्यक्ति गेली म्हणजे आमच्या बुद्धिमत्तेलाहि पक्षघात झालाच म्हणून समजावें. अशा स्थितींत त्या व्यक्तीच्या मागें जगांत दुर्धर जिणें कंठण्यापेक्षां त्या व्यक्तीबरोबरच परलोकवास पतकरणें चांगलें नव्हे का ? "

* * * *

दुसऱ्या दिवशीं वत्सराज उदयन, त्याच्या राण्या आणि यौगंधरायण रुमण्वान् व वसंतक हे सचिव, इतकी मंडळी कौशाम्बीहून कालंजर पर्वतावर जाण्यासाठीं निघाली. कौशाम्बीच्या नैऋत्येस सुमारें तीस कोस अंतरावर कालंजर पर्वत होता. कौशाम्बींतले हजारों नागरिक त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहिलेले होते.

यमुना नदी ओलांडून ही मंडळी कालंजर पर्वतावर तिसऱ्या दिवशीं जाऊन पोंचली. तेथें गेल्यावर प्रथम चक्रवर्ति उदयनानें घोषवती वीणेसह कालंजर पर्वतावरून खालीं उडी टाकून आपली इहलोकची

यात्रा संपविली. त्याच्या मागून राण्यांनीं पर्वतावरून खालीं उड्या टाकून प्राणत्याग केला. राण्यांच्या मागून आर्य यौगंधरायण, सेनापति रुमण्वान् व नर्मसचिव वसंतक यांनीं पर्वतावरून उड्या टाकल्या व परलोकवास पतकरला !

राजाच्या मृत्युप्रसंगीं राजाच्या मोठमोठ्या अधिकाऱ्यांनीं प्राणत्याग करण्याची चाल जपानांत आहे. चक्रवर्ति उदयनाच्या मृत्युप्रसंगीं घडलेला प्रकार पाहून जपानमधील त्या चालीची आठवण होते.

उदयनाच्या वेळीं जपानमध्यें जें राजघराणें राज्य करीत होतें तेंच आज देखील जपानवर राज्य करीत आहे ! जपानच्या राजघराण्याइतकें प्राचीन राजघराणें पृथ्वीच्या पाठीवर दुसरें नाहीं.

## १३—उपसंहार

उदयनाच्या मृत्युनंतर गोपालकानें कौशाम्बीचें राज्य आणि सार्वभौमाच्या प्रतिनिधीचें पद आपला कनिष्ठ बंधु पालक याच्या हवालीं केलें आणि आपण विरक्त होऊन असितपर्वतावरील कश्यपाश्रमांत जाऊन राहिला.

पालक प्रद्योताला कौशाम्बीच्या राज्याचा स्वामी आणि पौरव सार्वभौमांचा प्रतिनिधि म्हणून उदयनपुत्र अभिमन्यूनें मान्यता दिली. यामुळें पालक प्रद्योताचें वैभव फारच वाढलें. त्याच्या ताब्यांतील मुलुख आतां पूर्वेकडे शैशुनागांच्या मुलखाला भिडला. विदेह देशावर आपल्या घराण्यांतला पुरुष सुभेदार म्हणून नेमण्याचा अधिकार पालकाकडे आला आणि सार्वभौमांचा प्रतिनिधि या नात्यानें शैशुनागांवरहि त्याला वर्चस्व गाजविण्याची संधि लाभली. साम्राज्यसत्तेचें केंद्र आतां

कौशाम्बीहून उज्जयिनीकडे हाललें. अनेक प्राचीन कथांतून उज्जयिनी नगरी ही संपूर्ण भारतसाम्राज्याची राजधानी असल्याचें दृश्य दिसतें. तें अगदींच निराधार नाहीं हें यावरून दिसून येईल.

तथापि प्रद्योत हे सार्वभौम पौरवांचे प्रतिनिधि या नात्यानें भारतवर्षाचा कारभार पहात होते. भारतवर्षाचे मालक या नात्यानें पहात नव्हते हें लक्ष्यांत घेतलें पाहिजे. हें लक्ष्यांत घेतलें म्हणजे प्रद्योत घराण्याच्या अंतापर्यंत पौरवसाम्राज्य अस्तित्वांत होतें असें दिसून येतें.

निमिचक्राच्या वेळेपासून जिनें राजधानीचा मान भोगला त्या कौशाम्बी नगरीचें आणि कौशाम्बींतील नागरिकांचें आपुलकीच्या भावनेनें कौतुक करण्याला मात्र चक्रवर्ति उदयनाच्या मागें कोणी राहिला नाहीं.

ती बिचारी नगरी साम्राज्याच्या राजधानीचा मान तर गमावून बसलीच होती, पण साधा वत्सराज्याच्या राजधानीचा जुना मानदेखील तिला आपणाकडे राखतां आलेला नव्हता. कौशाम्बीचा राजा उज्जयिनीस होता आणि सम्राट् काश्मीरांत होता !

उदयनाच्या वेळीं पौरवसाम्राज्याची स्थापना झाली ती मुख्यतः प्रद्योत व शैशुनाग यांच्या मदतीमुळें झालेली होती. उदयनानंतरचा पौरवसम्राट् हिमालयप्रदेशांत असल्यामुळें त्याच्या दूरत्वाचा सगळा फायदा प्रद्योतांना मिळाला, किंवा पौरवांनींच एकट्या प्रद्योतांना तो दिला. यामुळें शैशुनाग राजा बिंबिसार हा आपल्या बहिणीच्या सावत्र मुलावर, म्हणजे उदयनाच्या पश्चात् सम्राट् झालेल्या अभिमन्यूवर रागावला. त्यानें पूर्वेकडे पौरवसम्राटांचे जे मांडलिक होते

त्यांजकडून स्वतःच खंडणी वसूल करण्यास सुरवात केली. त्यामुळें पौरवसम्राटाचा प्रतिनिधि या नात्यानें पालक प्रद्योताला बिंबिसार शैशुनागावर शस्त्र उपसणें प्राप्त झालें. प्रद्योत-शैशुनागांचा झगडा सुरू होण्याचें हें खरें कारण होय. हा झगडा पुढें कित्येक पिढ्या चालू होता व त्यांत अखेरीला प्रद्योत हरले.

पालकाचा ज्येष्ठ बंधु गोपालक याला एक पुत्र होता. तो म्हटला म्हणजे मृच्छकटिक नाटकाचा कर्ता ज्याला 'गोपालदारक आर्यक' असें म्हणतो तो होय. परंतु मृच्छकटिकाच्या कर्त्यानें गोपालदारक आर्यकाविषयीं स्वतःची गैरसमजूत करून घेतलेली आहे. भासकवीचें 'चारुदत्त' हें अपूर्ण नाटक 'दरिद्र चारुदत्त' या नांवाखालीं पुढें पूर्ण झालेलें होतें. मृच्छकटिकाच्या कर्त्यानें त्यांतच गोपालदारक आर्यकाचें कथानक घुसडून त्याचें मृच्छकटिक बनविलें. त्याला आर्यकाविषयीं मिळालेली माहिती अगदींच तुटपुंजी होती. नाटकांत तिचा उपयोग करण्यापूर्वीं त्यानें तिची चिकित्सा करण्याची देखील तसदी घेतलेली दिसत नाहीं. तो 'गोपालदायक आर्यक' म्हणजे गवळ्याचा मुलगा आर्यक असा अर्थ करतो आणि आर्यकानें पालक प्रद्योताला मारून अवंतिराज्य काबीज केलें असें दाखवितो. आर्यक हा गवळ्याचा पोर असता तर त्याला अवंतिराज्य मृच्छकटिककार दाखवितो तितक्या सुलभतेनें प्राप्त होण्याचा आणि नंतर तें पचण्याचा मुळींच संभव नव्हता. तो गोपालकपुत्र, म्हणजे प्रद्योत घराण्यांतलाच राजपुत्र असल्यामुळें, व अवंतीच्या गादीवर वडीलकीच्या नात्यानें त्याचा अधिक हक्क पोंचत असल्यामुळें अवंतिराज्यांतले पुष्कळ लोक, किंबहुना लष्करदेखील त्याला मिळून तो अल्पायासानें अवंतीचा राजा होऊं

शकला. ज्याला मारून त्यानें अवंतिराज्य घेतलें तो पालक प्रद्योत नव्हे. तो पालक प्रद्योताचा पुत्र अवंतिवर्धन ऊर्फ विशाखयूप होय. अवंतिवर्धन ऊर्फ विशाखयूप हा आर्यकाचा सख्खा चुलत भाऊ होता. त्याला मारून आर्यकानें त्यानें अवंतीचें राज्य काबीज केलें. आर्यकाला या कामीं शैशुनागांकडून देखील थोडी फार मदत मिळालेली असली पाहिजे. कारण प्रद्योतांत यादवी माजणें शैशुनागांच्या फायद्याचेंच होतें.

पुराणें आर्यकाला 'अजक' असें म्हणतात. त्याला तीं प्रद्योत घराण्यांतलाच मानतात. प्रद्योत घराण्याच्या राजनामावळींत अजकाचें स्थान तीं विशाखयूपानंतर असल्याचें दाखवितात.

चक्रवर्ति उदयनाच्या योजनेनुसार हिमालय प्रदेशामध्यें स्थायिक झालेल्या पौरव राजघराण्यांत एकंदर चार राजे झाले. ते हेः—
१ अभिमन्यु वहीनर, २ दंडपाणि ऊर्फ धनपाल, ३ भीम ऊर्फ निरामित्र, ४ क्षेमक ऊर्फ लक्ष्मीदेव. या चार पौरवराजांनीं हिमालयप्रदेशांत सुमारें पाउणशें वर्षें राज्य केलें.

ज्याच्यापासून ब्राह्मण व क्षत्रिय उत्पन्न झाले, आणि देव व ऋषि यांच्याकडून जो सत्कारला गेला, असा श्रेष्ठ पौरवराजवंश क्षेमकापर्यंत येऊन पोंचल्यावर कलींत संस्था पावला. ( म्हणजे कलियुगांत पौरव राजघराण्याचा नाश झाला ! )

ज्यानें पुरातनकाळापासून चालत आलेलें पौरव राजघराणें नाहींसें केलें तो पुरुष वीरसेन होय. वीरसेन हा शेवटल्या पौरव राजाचा अमात्य होता. बहुतकरून तो रुमण्वानाचा वंशज असावा. रुमण्वानाला हरिशिख नामक जो पुत्र होता त्याचेंच अन्य नांव विजयसेन असें होतें. हा हरिशिख ऊर्फ विजयसेन अभिमन्यु वहीनराचा सेनापति होता.

सेनापतींच्या ताब्यांत सर्व सैन्य असल्यामुळें त्यांना आपल्या राजाला मारून त्याच्या जागीं स्वतःच राजा होणें सुलभ असतें.

ज्यानें क्षेमक पौरवाला मारलें त्या वीरसेनाच्या बापाचें नांव शूरसेन असें होतें आणि आजाचें नांव वीरसेन असेंच होतें. क्षेमकाचा वध करणाऱ्या वीरसेनाचा आजा वीरसेन हा हरिशिख ऊर्फ विजयसेन याचा पुत्र असला पाहिजे.

रुमण्वानाचा वंशज शूरसेनपुत्र वीरसेन यानें खिस्तपूर्व ४२० चे सुमारास क्षेमक पौरवाचा वध करून पौरव राजघराणें नष्ट केलें आणि हिमालयप्रदेशांतलें पौरवराज्य बळकावून तो आपणाला 'वीरशाह' असें म्हणवूं लागला.

वीरशाह याचा पुत्र अनंतशाह, अनंतशाह याचा पुत्र हरीरूप; हरीरूपाचा पुत्र सुलोचन; आणि सुलोचनाचा पुत्र पर्वतराज ऊर्फ कुशशिाह होय. पर्वतराज यालाच ग्रीक लेखक 'पोरस' म्हणतात. 'पोरस' हें 'पूरु' नावाचें ग्रीक रूप आहे. पर्वतराज पौरवांचा राजा होता म्हणून ग्रीक लेखकांनीं त्याला 'पोरस' म्हटलें आहे, भारतवर्षाचा प्राचीन इतिहास निवेदन करणारे ग्रंथकार देखील पर्वतराजाला ग्रीक लेखकांप्रमाणें 'पोरस' असेंच म्हणतात! 'पोरस' हा भारतीय राजा असतां भारतवर्षाचा इतिहास निवेदन करणारे ग्रन्थकार त्याची पूर्वपीठिका सांगूं शकत नाहींत! मौर्यसाम्राज्य हेंच त्यांना भारतवर्षांतलें पहिलें साम्राज्य वाटतें! उदयनसाम्राज्याचा पत्ता त्यांना अजुन लागावयाचा आहे! उदयनसाम्राज्याचा त्यांना पत्ता लागेपर्यंत 'पोरस'च्या पूर्वपीठिकेसंबंधीं ते गाढ अज्ञानांतच राहणार!!!